वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. २४६ विभाग :- पाणी पुरवठा
दिनांक :-०२ /१२/ २०२०

प्रस्तावाचा विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिका बोळींज येथील मलनि:सारण केंद्रामधील सबस्टेशन, इलेक्ट्रीक पॅनल, पंपींग मशिनरी व इतर यांत्रिकी /विद्युत बाबींची देखभाल दुरुस्ती करणे कामी येणा-या अपेक्षित खर्चास प्रशासकिय व वित्तीय मंजूरी मिळणे.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई - विरार शहर महानगरपालिकेचे बोळींज येथे ३० द.ल.ली क्षमतेचे मलनि:सारण केंद्र असून सदर केंद्र व भुयारी गटार योजना सन २०१७ पासून कार्यान्वित करण्यात आली आहे. सदर योजना मा. आयुक्त तथा प्रशासक यांनी दिलेल्या निर्दशाप्रमाणे दि.१०/०९/२०२० रोजी पासून खात्यामार्फत चालविण्यात येत आहे.

विरार पुर्व / पश्चिम भागात ८१ कि.मी मल जल वाहिन्यां अंथरल्या असून त्यांच्या देखभाल दुरुस्तीकामी ३ कनिष्ठ अभियंता (ठेका) यांची दि.०३/०९/२०२० च्या आदेशान्वये नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच आस्थापना विभागामार्फत पंप ऑपरेटर, मदतनिस, ड्रायव्हर, फिटर, तारतंत्री या मनुष्यबळाचा पुरवठा करण्यात आला असून त्यांच्यामार्फत कामे सुरु करण्यात आली आहेत.

बोळींज येथील मलनि:स्सारण केंद्रामधे यांत्रिकी व विद्युत बाबींची वेळोवेळी देखभाल दुरुस्ती न केल्याने नादुरुस्ती झाली आहे. त्यामुळे सद्य:स्थितीत यांत्रिकी व विद्युत बाबींची देखभाल दुरुस्ती करणे आवश्यक असून सदरकामी देखभाल दूरुस्ती करीता कोणताही ठेका मंजूर नाही. त्यामुळे मलनि:स्सारण केंद्र येथील यांत्रिकी व विद्युतीय बाबींची देखभाल दुरुस्ती करणे करीता निविदा मागविणे आवश्यक आहे.

A) यांत्रिकी बाबी -

1.	Mechanical Coarse Screen/ Manual
2.	Mechanical Fine Screen/ Manual
3.	Raw sewage Pump Valve & Bypass Valve
4.	Mechanical Grit Separator Mechanism
	I) Classifier Mechanism
	II) Organic Return Pump
5.	Alum & poly dosing pump

6.	Air Blower
7.	Flash Mixer
8.	Raw sewage Transfer Pump
9.	Agitator for PE Tank / Alum Tank
10.	Gas Chlorination System
11.	Claritubeflocculator mechanism
12.	Sewage thicker dewatering unit/ Distributor pump
13.	Service water pump

B) विद्युतीय बाबी -

1.	Power Control center Panel (PCC)
2.	Synchronizing Panel
3.	APFC Panel
4.	LT & HT Cable
5.	Motor Control Center Panel (MCC)
6.	Street lights Fitting
7.	LDB & MDB panel
8.	22 Kv HT panel
9.	HT Battery panel
10.	Fine screen panel
11.	Mechanical Coarse screen panel

वरील नमुद यांत्रिकी व विद्युत बाबींचे दर हे मजीप्रा/ एम.आय.डी.सी. च्या दरसूचीमध्ये उपलब्ध नसल्याने बी/२ प्रकारची निविदा मागविणे आवश्यक आहे.

महापालिकेच्या सन २०२०-२१ च्या अर्थसंकल्पात **"यु आय डी एस एस टी/यु आय डी एस एस एम टी योजनेअंतर्गत भुयारी गटार व सॅनिटरी लॅन्डफिल साईट योजना खर्च "** या लेखाशिर्षावर रु. १७,०२,००,०००/- इतकी तरतूद करण्यात आली आहे. या भांडवली खर्चाचे लेखाशिर्षावर रक्कम रु. १६,४२,००,०००/- इतकी तरतुद उद्याप आहे. परंतू सदरचा खर्च हा महसुली खर्चाची बाब असल्याने सन २०२०-२१ या वर्षाच्या सुधारीत अर्थसंकल्पामध्ये "मलनि:स्सारण केंद्र देखभाल दुरुस्ती खर्च व इतर" या नावे नवीन लेखाशिर्ष तयार करणे व त्यात रु. १ कोटी इतकी तरतुद करण्याचे अधिन राहून सदरचा खर्च करणे शक्य होईल.

उपरोक्त कामी रक्कम रु. ६० लक्ष खर्च अपेक्षित असून सदरचा खर्च त्यातून भागविणे शक्य आहे.

तरी विषयांकीत कामी बोळींज येथील मलनि:सारण केंद्रामधील सबस्टेशन, इलेक्ट्रीक पॅनल, पंपींग मशिनरी व इतर यांत्रिकी /विद्युत बाबींची देखभाल दुरुस्ती करणे कामी बी/२ प्रकारची निविदा मागविण्यास व खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता आवश्यक आहे

सन २०२०-२१ व २०२१-२२ या द्विवार्षिक वित्तीय वर्षाकरीता वसई-विरार शहर महानगरपालिका बोळींज येथील मलनि:सारण केंद्रामधील सबस्टेशन, इलेक्ट्रीक पॅनल, पंपींग मशिनरी व इतर यांत्रिकी /विद्युत बाबींची देखभाल दुरुस्ती करणे कामी येणाऱ्या अनुषंगीक खर्चास व सदर कामी बी/२ प्रकारची निविदा मागविण्यास मा.आयुक्त तथा प्रशासक साो, यांच्या प्रशासकिय व वित्तीय मान्यतेस्तव सविनय सादर.

ठराव :- वरिल प्रमाणे सन २०२०-२१ व २०२१-२२ या द्विवार्षिक वित्तीय वर्षाकरीता वसई-विरार शहर महानगरपालिका बोळींज येथील मलनि:सारण केंद्रामधील सबस्टेशन, इलेक्ट्रीक पॅनल, पंपींग मशिनरी व इतर यांत्रिकी /विद्युत बाबींची देखभाल दुरुस्ती करणे कामी बी/२ प्रकारची ई-निविदा मागविण्यास तसेच होणाऱ्या रक्कम रु.६० लक्ष खर्चास मा. आयुक्त तथा प्रशासक साो, यांची प्रशासकीय व वित्तीय मान्यता असे.

(गंगाथरन डी.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. २४७ विभाग :- पाणी पुरवठा
दिनांक :- ०२/१२/ २०२०

प्रस्तावाचा विषय :- महानगरपालिकेत समाविष्ट गावांच्या वाढीव विकसीत भागाकरीता तसेच अमृत योजनेत अंतर्भुत न झालेल्या शिल्लक भागांकरीता पाणीपुरवठा होण्याच्या दृष्टीने विविध भागात जलवाहिन्या अंथरणेकामी तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकांना व येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणे बाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- महापालिका क्षेत्रातील समाविष्ट गावांना पाणी पुरवठा करण्याची जबाबदारी महानगरपालिकेची असल्याने अशा भागातील पाणी पुरवठ्याच्या दृष्टीने नविन जलवाहिन्या खरेदीकामी मा.महासभा ठराव क्र.२७ दि. १३/०२/२०१९ व मा.महासभा ठराव क्र. ३६ दि.१९/०१/२०२० अन्वये मान्यता देण्यात आली असून त्यानुसार पहिल्या टप्प्यातील पाईप खरेदीची कार्यवाही पुर्ण करून अंथरण्याची कार्यवाही पुर्ण झाली आहे. दुसऱ्या टप्प्यातील पाईप पुरवठ्यासाठी मे. जिन्दाल सॉ.ली. यांना दि.२९/१०/२०२० अन्वये खालील तपशीलाप्रमाणे पाईप पुरवठा कामी कार्यादेश देण्यात आला आहे.

अ.क्र.	पाईपचा प्रकार	व्यास	लांबी
1	DI K-9	100 mm	37710 Meter
2	DI K-9	150 mm	19738 Meter
3	DI K-9	200 mm	4490 Meter

वरील प्रमाणे पाईप पुरवठा करण्याची कार्यवाही दि.२३/११/२०२० पासून सुरु झाली असून येत्या दहा दिवसांत संपुर्ण पुरवठा मे.जिन्दाल सॉ.लि.यांच्याकडून होणार आहे. त्यामुळे सदर पाईप प्रभागांच्या आलेल्या मागणीनुसार अंथरुन घेणे आवश्यक आहे.

सन २०१९-२०, २०२०-२१ व २०२१-२२ या वित्तीय वर्षात महापालिका क्षेत्रात आवश्यकतेनुसार विविध व्यासाच्या जलवाहिन्या अंथरणे कामी मा.महासभा ठ.क्र.१६ दि.१९/०७/२०१९ अन्वये आर्थिक व प्रशासकीय मान्यता प्राप्त असून मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.२४४ दि.०५/०९/२०१९ अन्वये ८% जादा दराच्या निविदेस मंजूरी प्राप्त असून याकामी पॅनल तयार करण्यास मान्यता प्राप्त आहे. सदर पॅनल वरील ठेकेदार खालील प्रमाणे आहेत.

अ.क्र.	ठेकेदाराचे नाव	नियुक्ती आदेश क्र. व दिनांक
१	मे.नितिन जी. म्हात्रे	वविशम/शअ/पापू/५७७/२०१९ दि.०९/०९/२०१९
२	मे. राजू संभाजी बोरसे	वविशम/शअ/पापू/५७८/२०१९ दि.०९/०९/२०१९
३	मे.आर.जी.कन्स्ट्रक्शन	वविशम/शअ/पापू/५७९/२०१९ दि.०९/०९/२०१९
४	मे.रिलायबल कन्स्ट्रक्शन	वविशम/शअ/पापू/५८०/२०१९ दि.०९/०९/२०१९
५	मे. के.आर.कन्स्ट्रक्शन	वविशम/शअ/पापू/५८१/२०१९ दि.०९/०९/२०१९

महापालिकेस उपलब्ध होणारे पाईप मुख्यत: ज्या भागात उन्हाळ्या दिवसांत पाणी टंचाई सदृष्य परिस्थिती निर्माण होत आहे अशा भागात अंथरुन घेणे कामी खालील प्रमाणे सविस्तर अंदाजपत्रके तयार करण्यात आली असून सदर कामनिहाय्य ठेकेदारांना कार्यादेश देणे आवश्यक आहे. सदर गावांना जलवाहीनीद्वारे पाणी पुरवठा सूरु केल्यास महापालिका टँकरद्वारे करीत असलेल्या पाणी पुरवठयाच्या खर्चात मोठया प्रमाणावर बचत होणार आहे.

प्रभाग समिती "एफ"

अ. क्र.	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम	पाईप व्यास (मी.मी.)			पॅनलवरील ठेकेदार
			१००	१५०	२००	
१	वसई फाटा गडग्यापाडा येथे १५० मी.मी. व्यासाचे पाईप अंथरणे.	रु. ३,४७,८७२/-	००	८००	००	मे. राजू संभाजी बोरसे
२	संतोष भुवन रोड ते एम.बी.आर. पर्यंत १५० मी.मी. व्यासाचे पाईप अंथरणे.	रु. ४,१०,८८२/-	००	९३०	००	मे. रिलायबल कन्स्ट्रक्शन
३	बीलाल पाडा श्रीराम नगर येथे १०० मी.मी. व १५० मी.मी. व्यासाचे पाईप अंथरणे.	रु. १७,६८,३०५/-	१५११	२८७१.१०	००	मे. के.आर. कन्स्ट्रक्शन
४	कैरपाडा व बिलालपाडा येथे १०० मी.मी.,१५० मी.मी. व २०० मी.मी. व्यासाचे पाईप अंथरणे	रु. ३४,७४,५१८/-	२३२१	२५०४.७०	२१५५.५०	मे. आर.जी. कन्स्ट्रक्शन
५	भावशेत पाडा/ हावाई पाडा व तांडा पाडा येथे १०० मी.मी.,१५० मी.मी. व २०० मी.मी. व्यासाचे पाईप अंथरणे	रु. २८,२४,८४४/-	१३१८.२०	२४१२.३०	२५११.५०	मे.नितिन जी. म्हात्रे

प्रभाग समिती "जी"

अ. क्र.	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम	पाईप व्यास (मी.मी.)			पॅनलवरील ठेकेदार
			१००	१५०	२००	
६	वॉर्ड क्र. ११५ मधील कोल्ही येथे १५० मी.मी. व २०० मी.मी. व्यासाचे पाईप अंथरणे.	रू. ३१,४५,७६०/-	३२४०	२२९०	४८९	मे. रिलायबल कन्स्ट्रक्शन
७	वॉर्ड क्र. ८९ मधील चिंचोटी येथे १००, १५० व २०० मी.मी. व्यासाचे पाईप अंथरणे.	रू. २९,२७,१८२/-	२५३७	१९१८	७८०	मे. आर.जी. कन्स्ट्रक्शन
८	वॉर्ड क्र. ८९ मधील देवदळ येथे १००, १५० व २०० मी.मी. व्यासाचे पाईप अंथरणे.	रू. ११,०७,४१०/-	१४६३	५९५	००	मे. रिलायबल कन्स्ट्रक्शन
९	वॉर्ड क्र. ८९ व ११५ मधील कामण येथे १००, १५० व २०० मी.मी. व्यासाचे पाईप अंथरणे.	रू. ३०,२६,५३६/-	२७४०	१७९६	८३०	मे. के.आर. कन्स्ट्रक्शन
१०	वॉर्ड क्र. ९१ मधील राजीवली येथे १००, १५० व २०० मी.मी. व्यासाचे पाईप अंथरणे.	रू.३८,०१,८७८/-	१०००	७००	३९६०	मे. आर.जी. कन्स्ट्रक्शन

प्रभाग समिती "ए"

अ. क्र.	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम	पाईप व्यास (मी.मी.)			पॅनलवरील ठेकेदार
			१००	१५०	२००	
११	प्रभाग समिती ए मधील उमराळे येथे १०० व १५० मी.मी. व्यासाची पाईपलाईन अंथरणे	रू.११,६६,१३३/-	१२००	९००	००	मे.नितिन जी. म्हात्रे
१२	प्रभाग समिती ए मधील वटार येथे १०० व १५० मी.मी. व्यासाची पाईपलाईन अंथरणे	रू. १३८२९८१/-	२०००	५००	००	मे. आर.जी. कन्स्ट्रक्शन
१३	प्रभाग समिती ए मधील आगाशी येथे १०० व १५० मी.मी. व्यासाची पाईपलाईन अंथरणे	रू.१३,१९,९७६/-	१२००	९८३	००	मे. रिलायबल कन्स्ट्रक्शन
१४	प्रभाग समिती ए मधील राजोडी येथे १०० व १५० मी.मी. व्यासाची पाईपलाईन अंथरणे	रू.५,१३,२५२/-	८००	००	००	मे.नितिन जी. म्हात्रे

१५	प्रभाग समिती ए मधील बोळींज येथे १०० व १५० मी.मी. व्यासाची पाईपलाईन अंथरणे	रु.९,२८,६३५/-	५९२	८२२	००	मे. के.आर. कन्स्ट्रक्शन

प्रभाग समिती "ई"

अ. क्र.	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम	पाईप व्यास (मी.मी.)			पॅनलवरील ठेकेदार
			१००	१५०	२००	
१६	प्रभाग समिती ई मधील गोम्स, वंडाचौक, गास येथे १५० मी.मी. व्यासाची पाईपलाईन अंथरणे	रु.६,५४,६७४/-	००	१११५	००	मे. रिलायबल कन्स्ट्रक्शन

MJP मार्फत उसनवारी तत्वावर पाईप घेऊन अंथरावयाच्या कामांचा तपशील खालील प्रमाणे

अ. क्र.	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम	पाईप व्यास (मी.मी.)				पॅनलवरील ठेकेदार
			१००	१५०	२००	३००	
१७	वॉर्ड क्र. ५ मधील सातीवली आणि जुचंद्र येथे १५० व ३०० मी.मी. व्यासाची पाईपलाईन अंथरणे	रु. १३,१४,६३४/-	००	११६०	००	२८५	मे. रिलायबल कन्स्ट्रक्शन
१८	रानशेतपाडा मणीचापाडा ते रीचर्ड कंपाऊंड पर्यंत १५० मी.मी. व्यासाचे पाईप अंथरणे.	रु. १४,७४,६१८/-	००	२८७०	००	००	मे. राजू संभाजी बोरसे
१९	धानीव बाग येथे १००,१५० व २०० मी.मी. व्यासाचे पाईप अंथरणे.	रु. १२४११०५७/-	३२७९	८४९४	३१९२	००	मे. रिलायबल कन्स्ट्रक्शन
२०	नव जीवन आणि वलई पाडा येथे १००,१५० व २०० मी.मी. व्यासाचे पाईप अंथरणे.	रु. १०७१३२८/-	२०	८७५	२०५	००	मे. रिलायबल कन्स्ट्रक्शन
२१	डोंगरपाडा, श्रीराम नगर व धानीव बाग हरवटे एरीया येथे १५० व २०० मी.मी. व्यासाचे पाईप अंथरणे.	रु. ४८८५६४७/-	००	२७६०	१११०	००	मे. रिलायबल कन्स्ट्रक्शन

उपरोक्त तपशीलाप्रमाणे २१ कामांसाठी तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकांस व खर्चास आर्थिक व प्रशासकी मान्यता देण्याचे अधिकार मा.महासभा दि.१९/०७/२०१९ ठ.क्र.१६ अन्वये मा.आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका

यांना आहेत. सदर खर्च सन २०२०/२१ च्या अर्थसंकल्पातील विकास निधी अंतर्गत शहरांतर्गत जलवाहीनी व्यवस्था या लेखाशिर्षावरील तरतूद मधून भागविणे शक्य आहे.

तरी उपरोक्त २१ कामांकरीता तयार करण्यांत आलेल्या अंदाजपत्रकांना मान्यता मिळावी तसेच सदर कामे करुन घेण्यासाठी वरील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे पॅनल वरील मंजूर ठेकेदारांना कार्यादेश देण्यास व त्यानुसार येणा-या खर्चास आर्थिक प्रशासकीय मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

ठराव :- वरिल प्रमाणे महानगरपालिकेत समाविष्ट गावांच्या वाढीव विकसीत भागाकरीता तसेच अमृत योजनेत अंतर्भुत न झालेल्या शिल्लक भागांकरीता पाणीपुरवठा होण्याच्या दृष्टीने विविध भागात जलवाहिन्या अंथरणेकामी तयार करण्यात आलेल्या २१ कामांच्या अंदाजपत्रकांना तसेच पॅनल वरील मंजूर ठेकेदारांना कार्यादेश देण्यास व त्यानुसार येणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत असे.

(गंगाथरन डी.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.- पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. २४८

विभाग:- घरपट्टी विभाग
दिनांक:- 02/12/2020

प्रस्तावाचा विषय:- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या ऑनलाईन व ऑफ लाईन कर भरणा करणे करीता इंडीयन बँक (Indian Bank) मध्ये खाते कार्यान्वित करणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई-विरार शहर महानगरपालिके अंतर्गत विविध ऑनलाईन कर भरणा करणेकरीता IndusInd बँकेमार्फत पेमेंट गेटवे (Payment Gateway) सुरु आहे. तसेच रोखीने/धनादेशाने घरपट्टी /पाणीपट्टी वसूलीचा भरणा प्रभाग निहाय इंडसइंड बँक व एच.डी.एफ.सी बँक व ऑक्सिस बँकेंच्या खात्यामध्ये होत आहे. परंतू शासनाच्या निर्देशानुसार महापालिकेचे खाते हे शासकीय बँक मध्ये असणे गरजेचे आहे. दि. १४-१०-२०२० रोजीचा INDIAN Bank चा प्रस्ताव, दि. १५/१०/२०२० रोजीचा IDBI Bank चा प्रस्ताव व दि. ०६-११-२०२० रोजीचा Bank of Baroda चा प्रस्ताव प्राप्त झाला आहे. त्याअनुषंगाने मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्या मान्यतेने दि. १८-११-२०२० रोजीचा प्रशासकीय ठराव क्र.२३० अन्वये मंजूरी करुन प्रभाग सामिती ए, डी, ई, एच, आय करीता इंडीयन बँकेत खाते उघडणे करीता व प्रभाग समिती बी,सी,एफ,जी करीता बँक ऑफ बडोदा बँकेत खाते उघडणे करीता मंजूरी मिळाली आहे. त्या अनुषंगाने इंडीयन बँकेने करारनाम्याचा कच्चा मसुदा अंतिम करुन खाते उघडणेकरीता प्रकिया चालू केली असून सदर प्रक्रिया अंतिम टप्यात आहे. परंतु बँक ऑफ बडोदा सोबत वारंवार संपर्क केला असता सदर बँकेतर्फे कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. सद्यस्थितीत सदर कामी बँक खाते उघडून पेंमेंट गेटवे इंटिग्रेट करुन महानगरपालिकेचा कर भरणा राष्ट्रीयकृत बँकेत करुन घेणे कामी अडथळा निर्माण होत आहे. तरी बँक ऑफ बडोदा बँकेचा प्रस्ताव अमान्य करुन प्रभाग समिती ए, बी, सी, डी, ई, एफ, जी, एच व आय करीता इंडीयन बँक मध्ये खाते उघडणे करीता व महापालिकेस आवश्यक सेवा चालू करुन घेणेस मान्यतेस्तव सादर.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिकेतील मालमत्ता कर व पाणीपट्टी कर ऑनलाईन व ऑफ लाईन भरणा करणे करीता इंडियन बँक या राष्ट्रीयकृत बँकेत प्रभाग समिती ए, बी, सी, डी, ई, एफ, जी, एच व आय ची घरपट्टी व पाणीपट्टी कर कॅश, चेक, पेमेंट गेटवे इत्यादी द्वारे संकलन करण्यास व त्यासाठी लागणारे बँक खाते कार्यान्वित करणेकामी प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

(गंगाथरन डी.)
प्रशासक तथा आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

Rek8

वसई- विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), जि.- पालघर, पिन नं. 401 305
दूरध्वनी- 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. २४९

विभाग : वैद्यकीय आरोग्य
दिनांक : ४/४२/2020

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागास Inj.Remdesivir 100 mg विनानिविदा खरेदी करणेस प्रशासकिय मंजूरी मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात २ रुग्णालये, २२ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, ३ माताबाल संगोपन केंद्र व ९ दवाखाने कार्यरत आहेत. या सर्व विभागाचे कामकाज वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत पाहिले जाते. सद्यस्थितीत देशभरात कोरोना (COVID-19) या विषाणूच्या संसर्गाचा प्रादुर्भाव झपाटयाने वाढत आहे. या पार्श्वभूमीवर वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोरोना विषाणू संबंधी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेकरीता अलग कक्ष व विलगीकरण कक्ष स्थापन करण्यात आले असून कोरोना (COVID-19) या विषाणूच्या संसर्गात दिवसेंदिवस वाढ होत आहे. कौलसिटी रुग्णालय, वसई (प)., वरुण इंडस्ट्रियल ईस्टेट, वसई (पूर्व) व श्री जिवदानी देवी रुग्णालय, चंदनसार येथे कोविड-१९ रुग्णालय, अग्रवाल हॉस्पिटल-वसई पुर्व येथे विलगलीकरण कक्ष व म्हाडा बिल्डींग नं.१० येथे कोवीड केअर सेंटर स्थापन करण्यात आले आहे.

सद्यस्थितीत रुग्णालयामध्ये करोना बाधीत रुग्ण दाखल झाले आहेत. या रुग्णांच्या उपचाराकरीता लागणारी औषधे वेळोवेळी आवश्यकतेनुसार उपलब्ध करुन देतात. परंतु काही वेळा जीवनावश्यक असलेल्या औषधांचे दर ई-निविदेत मंजुर नसल्याने खरेदी करणे गैरसोयीचे होते. कोवीड रुग्णांकरीता जीवनावश्यक असणारे Inj.Remdesivir 100 mg ची आवश्यकता आहे. सदरचे औषध मे.सिपला लिमिटेड, मुंबई यांच्याकडे उपलब्ध असून याबाबतच्या दराचा व मागणीबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे

अ.क्र.	औषधाचे नाव	मुळ किंमत	सुधारित दर निश्चिती किंमत	मागणी	एकूण रक्कम (सर्व करासहित)
1	Inj.Remdesivir 100 mg	4,000	2182.88	1 x 1000	2182880
				Total	21,82,880/-

कोरोना संसर्गित रुग्णांकरीता सदर इंजेक्शन त्वरीत खरेदी करणे गरजेचे आहे. शासन मार्गदर्शन सुचनेनुसार औषधे व इतर तद्अनुषंगिक साहित्य तातडीने खरेदी कराव्या लागतात तरी सदरची औषधे स्थानिक पातळीवर खरेदी करणे योग्य होईल. वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागास तुर्तास 1000 नग Inj.Remdesivir 100 mg

खरेदी करणे कामी रु.२१,८२,८८०/- इतका खर्च अपेक्षित असून "रुग्णालय औषधी खरेदी" या लेखाशिर्षाखालील शिल्लक तरतुदीमधून सदरचा खर्च भागविता येणे शक्य होणार आहे.

ठराव :- सदरचे Inj.Remdesivir 100 mg -1000 नग विनानिविदा खरेदी करण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम सन १९४९ चे कलम ६७ (३) क अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार येणाऱ्या रक्कम रु.२१,८२,८८०/- (अक्षरी- एकवीस लाख ब्याऐंशी हजार आठशे ऐंशी रुपये मात्र) खर्चास प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे.

(गंगाथरन.डी)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई- विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), जि.- पालघर, पिन नं. 401 305
दूरध्वनी- 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. २५०

विभाग : वैद्यकीय आरोग्य
दिनांक :०४/१२/2020

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागास Tab. Favipiravir 200 mg विनानिविदा खरेदी करणेस प्रशासकिय मंजूरी मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात २ रुग्णालये, २२ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, ३ माताबाल संगोपन केंद्र व ९ दवाखाने कार्यरत आहेत. या सर्व विभागाचे कामकाज वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत पाहिले जाते. सद्यस्थितीत देशभरात कोरोना (COVID-19) या विषाणूच्या संसर्गाचा प्रादुर्भाव झपाटयाने वाढत आहे. या पार्श्वभूमीवर वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोरोना विषाणू संबंधी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेकरीता अलग कक्ष व विलगीकरण कक्ष स्थापन करण्यात आले असून कोरोना (COVID-19) या विषाणूच्या संसर्गात दिवसेंदिवस वाढ होत आहे. कौलसिटी रुग्णालय, वसई (प)., वरुण इंडस्ट्रियल ईस्टेट, वसई (पूर्व) व श्री जिवदानी देवी रुग्णालय, चंदनसार येथे कोविड-१९ रुग्णालय, अग्रवाल हॉस्पिटल-वसई पुर्व येथे विलगलीकरण कक्ष व म्हाडा बिल्डींग नं.१० येथे कोवीड केअर सेंटर स्थापन करण्यात आले आहे.

सद्यस्थितीत रुग्णालयामध्ये करोना बाधीत रुग्ण दाखल झाले आहेत. या रुग्णांच्या उपचाराकरीता लागणारी औषधे वेळोवेळी आवश्यकतेनुसार उपलब्ध करून देतात. परंतु काही वेळा जीवनावश्यक असलेल्या औषधांचे दर ई-निविदेत मंजुर नसल्याने खरेदी करणे गैरसोयीचे होते. कोवीड रुग्णांकरीता जीवनावश्यक असणारे Tab.Favipiravir 200 mg ची आवश्यकता आहे. वैद्यकीय उपचार देणेकामी प्रति रुग्णांस ३४ गोळयांची आवश्यकता भासत असून तुर्तास १००० रुग्णांकरीता सदरची औषधे मे.ग्लेनमार्क फार्मास्युटिकल्स लि., मुंबई या उत्पादीत कंपनीचे असून त्यांच्या अधिकृत वितरकाकडूने उपलब्ध करून घेणे गरजेचे आहे. याकामी अंदाजे रक्कम रु.८,४७,९६०/- इतका खर्च अपेक्षित आहे.

कोवीड संसर्गित रुग्णांची संख्या वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी कोवीड रुग्णांच्या उपचाराकरीता आवश्यक असलेले Tab.Favipiravir 200 mg हे औषध मे.ग्लेनमार्क फार्मास्युटिकल्स लि., मुंबई त्यांच्याकडील अधिकृत वितरकाकडून त्वरीत खरेदी करणे गरजेचे आहे. शासन मार्गदर्शन सुचनेनुसार औषधे व इतर तद्अनुषंगिक साहित्य तातडीने खरेदी कराव्या लागतात तरी सदर औषधे स्थानिक पातळीवर खरेदी करणे योग्य होईल. वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागास तुर्तास 34000 नग Tab. Favipiravir 200 mg खरेदी करणे कामी रु.८,४७,९६०/- इतका खर्च अपेक्षित असून

"रुग्णालय औषधे खरेदी" या लेखाशिर्षाखालील शिल्लक तरतुदीमधून सदरचा खर्च भागविता येणे शक्य होणार आहे. तरी सदरची औषधे विनानिविदा खरेदी करणेकामी प्रशासकिय मंजूरी मिळणेबाबतच्या मान्यतेस्तव सादर.

ठराव :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम सन १९४९ चे कलम ६७ (३) क अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार 34000 नग Tab. Favipiravir 200 mg विनानिविदा खरेदी करणेकामी येणाऱ्या रक्कम रु.८,४७,९६०/- (अक्षरी- आठ लाख सत्तेचाळीस हजार नऊशे साठ रुपये मात्र) खर्चास प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे.

(गंगाथरन.डी)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई- विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), जि.- पालघर, पिन नं. 401 305
दूरध्वनी- 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. २५१ विभाग : वैद्यकीय आरोग्य
दिनांक : ०७/१२ /2020

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागास Inj.Remdesivir 100 mg विनानिविदा खरेदी करणेस व आदेश देणेकामी वित्तिय मंजूरी मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात २ रुग्णालये, २२ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, ३ माताबाल संगोपन केंद्र व ९ दवाखाने कार्यरत आहेत. या सर्व विभागाचे कामकाज वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत पाहिले जाते. सद्यस्थितीत देशभरात कोरोना (COVID-19) या विषाणूच्या संसर्गाचा प्रादुर्भाव झपाटयाने वाढत आहे. या पार्श्वभूमीवर वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोरोना विषाणू संबंधी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेकरीता अलग कक्ष व विलगीकरण कक्ष स्थापन करण्यात आले असून कोरोना (COVID-19) या विषाणूच्या संसर्गात दिवसेंदिवस वाढ होत आहे. कौलसिटी रुग्णालय, वसई (प)., वरुण इंडस्ट्रियल ईस्टेट, वसई (पूर्व) व श्री जिवदानी देवी रुग्णालय, चंदनसार येथे कोविड-१९ रुग्णालय, अग्रवाल हॉस्पिटल-वसई पुर्व येथे विलगलीकरण कक्ष व म्हाडा बिल्डींग नं.१० येथे कोवीड केअर सेंटर स्थापन करण्यात आले आहे.

सद्यस्थितीत रुग्णालयामध्ये करोना बाधीत रुग्ण दाखल झाले आहेत. या रुग्णांच्या उपचाराकरीता लागणारी औषधे वेळोवेळी आवश्यकतेनुसार उपलब्ध करुन देतात. परंतु काही वेळा जीवनावश्यक असलेल्या औषधांचे दर ई-निविदेत मंजुर नसल्याने खरेदी करणे गैरसोयीचे होते. कोवीड रुग्णांकरीता जीवनावश्यक असणारे Inj.Remdesivir 100 mg – 1000 नगची आवश्यकता आहे. सदर Inj.Remdesivir 100 mg खरेदी करणेकामी प्रशासकिय ठराव क्र.२४९ दि. ०४/१२/२०२० अन्वये मंजूरी मिळालेली आहे. सदरचे औषध मे.सिपला लिमिटेड, मुंबई यांच्याकडे उपलब्ध असून याबाबतच्या दराचा व मागणीबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे

अ.क्र.	औषधाचे नाव	मुळ किंमत	सुधारित दर निश्चिती किंमत	मागणी	एकूण रक्कम (सर्व करासहित)
1	Inj.Remdesivir 100 mg	4,000	2182.88	1 x 1000	2182880
				Total	21,82,880/-

कोरोना संसर्गित रुग्णांकरीता Inj.Remdesivir 100 mg -१००० नग त्वरीत खरेदी करणे गरजेचे आहे. शासन मार्गदर्शन सुचनेनुसार औषधे व इतर तद्अनुषंगिक साहित्य तातडीने खरेदी कराव्या लागतात. तरी सदर औषधे यांना असलेल्या अधिकारान्वये स्थानिक पातळीवर खरेदी करणे योग्य होईल. वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागास तुर्तास 1000 नग Inj.Remdesivir 100 mg खरेदी करणे कामी रु.२१,८२,८८०/- इतका खर्च अपेक्षित असून "रुग्णालय औषधी खरेदी" या लेखाशिर्षाखालील नमुद शिल्लक तरतुदीमधून सदरचा खर्च भागविता येणे शक्य होणार आहे.

ठराव :- उपरोक्त औषधे विनानिविदा Inj.Remdesivir 100 mg खरेदी करणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम सन १९४९ चे कलम ५९ पोटकलम ५(२)(२) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार सदरची औषधे विनानिविदा खरेदी करणेकामी रक्कम रु.२१,८२,८८०/- (अक्षरी- एकवीस लाख ब्याऐंशी हजार आठशे ऐंशी रुपये मात्र) इतक्या खर्चास मे.सिपला लिमिटेड, मुंबई यांना पुरवठा आदेश देणेकामी वित्तिय मान्यता देण्यात येत आहे.

(गंगाथरन.डी)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पूर्व, जि. पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स-०२५०-२५२५१०७
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. २५२ **विभाग:- बोळींज**
दिनांक:- ०८/१२/२०२०

प्रस्तावाचा विषय:- दि.०१/०१/२०२१ ते दि. ३१/१२/२०२३ (३ वर्षे) करीता नंदाखाल तलावात मासे संवर्धन करून मासेमारी करीता ठेका पध्दतीने लिलाव करण्यासाठी ई-निविदा मागविणे व जाहीर नोटीस प्रसिध्द करणे करिता प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- सादर करणेत येते की, प्रभाग समिती अे, अंतर्गत नंदाखाल तलावाची मुदत दि. ३१/०५/२०१९ रोजी समाप्त झालेली असून मा. प्रभाग समिती सभा दि. २८/०२/२०१९ ठराव क्र.०६ अन्वये सदर तलाव दुरूस्ती करीता तलाव लिलाव स्थगित करणेत येऊन तलाव दुरूस्तीचे काम पुर्ण झाल्यानंतर तलाव लिलाव करणेचा ठराव मंजूर करणेत आल्यामुळे सदर तलाव लिलाव प्रक्रिया स्थगिती देणेत आली. परंतु सदर तलावाच्या बांधकामास अद्याप सुरूवात न झाल्याने महानगरपालिकेच्या उत्पन्नाची बाब विचारात घेता सदर तलाव लिलावाची प्रक्रिया करणे गरजेचे आहे. त्याबाबत लिलावाच्या रक्कमेची दि. ०१/०१/२०२१ ते दि.३१/१२/२०२३ या तीन वर्षाकरीता मागणी खालीलप्रमाणे.

अ.क्र.	ठिकाण	सन २०१७-१९ मुळ रक्कम (२ वर्षे)	१ जाने.२०२१ ते ३१ डिसें. २०२१ (१ वर्षे) (१०% वाढीसह)	१ जाने. २०२२ ते ३१ डिसें. २०२२ (१ वर्षे) (१०% वाढीसह)	१ जाने. २०२३ ते ३१ डिसें. २०२३ (१ वर्षे) (१०% वाढीसह)	१ जाने. २०२१ ते ३१ डिसें.२०२३ ची मागणी ३ वर्ष
१.	कोफराड	२०८१५०/-	११४४८३/-	१२५९३१/-	१३८५२४/-	३७८९३८/-

वरील प्रमाणे तलाव लिलाव माहे १ जानेवारी २०२१ ते माहे ३१ डिसेंबर २०२३ या तीन वर्षाकरीता मुळ रक्कम २०८१५०/- (२ वर्ष) या रक्कमेवर १०% वाढ करून रु. ३७८९३८/- रक्कम होत आहे. या रक्कमेवर ठेका पध्दतीने ई-निविदा व जाहिर नोटीस प्रसिध्द करून निविदा मागविणे व प्राप्त निविदा रक्कमेवर १८% GST व २% आयकर लावण्यास व त्यासाठी येणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यतेसाठी सादर.

ठरावाचा निर्णय:- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती अे, बोळींज कार्यक्षेत्रातील कोफराड तलावाचा मासेमारी संवर्धन व मासेमारी करीता सिलबंद निविदा प्रक्रियेने ठेका नियुक्त करण्यासाठी दि. ०१/०१/२०२१ ते दि. ३१/१२/२०२३ (३ वर्षे) या कालावधीमध्ये रू. ३७८९३८/- या मागणी रक्कमेवर सिलबंद निविदा मागविणेस व मंजूर रक्कमेवर १८% GST व २% आयकर आकारणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६७(३) (क) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार प्रभाग समिती अे, कार्यक्षेत्रातील कोफराड विभागात तलाव लिलाव ठेका नियुक्त करण्यासाठी दि.०१/०१/२०२१ ते दि.३१/१२/२०२३ (३ वर्षे) कालावधीसाठी रक्कम रूपये ३७८९३८/- मागणी रक्कमेवर सिलबंद निविदा मागविणे व मंजुर रक्कमेवर १८% GST व २% आयकर आकारणीस प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पूर्व, जि. पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स-०२५०-२५२५१०७
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. २५३ **विभाग:- बोळींज**
दिनांक:-०८/१२/२०२०

प्रस्तावाचा विषय:- दि. ०१/०१/२०२१ ते दि. ३१/१२/२०२३ (३ वर्षे) करीता उमराळे-करमाळे तलाव मासेमारी संवर्धन करून मासेमारी करीता ठेका पध्दतीने लिलाव करणेसाठी ई-निविदा मागविणे व जाहीर नोटीस प्रसिध्द करणे करीता प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- सादर करणेत येते की, वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती अे, बोळींज अंतर्गत विभाग उमराळे-करमाळे येथील उमराळे मोठे तलावाची लिलाव मुदत दि. ३१/०५/२०२० रोजी संपलेली असून सदर तलाव लिलावाची ई-निविदा प्रक्रिया करणे आवश्यक आहे. त्याकरीता लिलावाच्या रक्कमेची दि. ०१/०१/२०२१ ते दि. ३१/१२/२०२३ या तीन वर्षाकरीता मागणी खालीलप्रमाणे

अ.क्र	ठिकाण	सन २०१९-२० मुळ रक्कम	१ जाने. २०२१ ते ३१ डिसें. २०२१ मागणी रक्कम १ वर्ष (१०% वाढीसह)	१ जाने. २०२२ ते ३१ डिसें. २०२२ मागणी रक्कम १ वर्ष (१०% वाढीसह)	१ जाने. २०२३ ते ३१ डिसें. २०२३ मागणी रक्कम १ वर्ष (१०% वाढीसह)	१ जाने. २०२१ ते ३१ डिसें.२०२३ ची मागणी (३ वर्ष)
१.	उमराळे/करमाळे	२,२२,९००/-	२,४५,१९०/-	२,६९,७०९/-	२,७२,४०७/-	७,८७,३०६/-

वरील प्रमाणे तलाव लिलाव माहे १ जानेवारी २०२१ ते माहे ३१ डिसेंबर २०२३ या तीन वर्षाकरीता मुळ रक्कम २२२९००/- या रक्कमेवर १०% वाढ करून रु. ७८७३०६/- रक्कम होत आहे. या रक्कमेवर ठेका पध्दतीने ई-निविदा व जाहिर नोटीस प्रसिध्द करून निविदा मागविणे व प्राप्त निविदा रक्कमेवर १८% GST व २% आयकर लावण्यास व त्यासाठी येणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यतेसाठी सादर.

ठरावाचा निर्णय:- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती अे, बोळींज कार्यक्षेत्रातील उमराळे/करमाळे विभागातील तलावाचा मासेमारी संवर्धन व मासेमारी करीता ठेका नियुक्त करण्यासाठी दि. १ जानेवारी २०२१ ते माहे ३१ डिसेंबर २०२३ (३ वर्ष) या कालावधीसाठी रक्कम रू. ७,८७,३०६/- या मागणी रक्कमेवर ई-निविदा मागविणेस व मंजूर रक्कमेवर १८% GST व २% आयकर आकारण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६७ (३) (क) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार प्रभाग समिती अे, कार्याक्षेत्रातील उमराळे/करमाळे विभागात तलाव लिलाव ठेका नियुक्त करण्यासाठी दि. ०१/०१/२०२१ ते दि.३१/१२/२०२३ (३ वर्ष) कालावधीसाठी रक्कम रू. ७८७३०६/- मागणी रक्कमेवर ई-निविदा निविदा मागविणे व मंजूर रक्कमेवर १८% GST व २% आयकर आकारण्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

प्रभाग समिती (डी), आचोळे, नालासोपारा (पू)
ता.वसई, जि.पालघर

ठराव क्र. २५४ **दिनांक** ०८/१२/२०२०

विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (डी), नालासोपारा (पू) हद्दीतील आचोळे तलाव सन २०२१-२०२४ या तीन वर्षाकरीता मत्स्यसंवर्धनासाठी देणेकामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्ताव :- वसई - विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती (डी), आचोळे, नालासोपारा (पूर्व) अंतर्गत आचोळे तलाव मत्स्यसंवर्धनासाठी लिलाव पध्दतीने सन २०१४ ते २०१६ या दोन वर्षाकरीता रक्कम रु. ४,४५,५००/- इतक्या रक्कमेत देणेत आला होता. तद्नंतर सन २०१६ ते २०१८ या वित्तीय वर्षामध्ये तलाव मत्स्यसंवर्धनासाठी करणे बाबतचा प्रस्ताव सादर केला असता सदर तलावाचे गाळ काढणेचे काम करावयाचे असल्याने मा. प्रभाग समिती सभा दि. २९/०९/२०१६ ठराव क्र. २३ अन्वये सन २०१६-२०१८ या वित्तीय वर्षात तलाव मत्स्यसंवर्धानासाठी न देता स्थगित ठेवणेस मान्यता दिलेली आहे. तद्नंतर सन २०१८ ते सन २०२० पर्यंत तलाव मत्स्यसंवर्धनासाठीचा प्रस्ताव मा. प्रभाग समिती स्तरावर मंजूरीसाठी सादर करण्यात आला होता. परंतु बांधकाम विभागातून तलावातील गाळ काढण्याच्या निविदेची प्रक्रिया सुरु असल्याने सदर तलावाचा गाळ काढण्याचे काम पूर्ण होईपर्यंत सदर तलाव मत्स्यसंवर्धनाची निविदा प्रक्रिया करु नये असा निर्णय मा. प्रभाग समिती दि. २९/०१/२०१८ ठराव क्र. ९७ अन्वये पारित करण्यात आला होता. तरी सदर काम बांधकाम विभागातून पूर्ण झाले असल्याने तलाव मत्स्यसंवर्धनासाठी पुढील सन २०२१ ते २०२४ या तीन वर्षाकरीता निविदा प्रक्रिया करणे आवश्यक आहे. तथापि तलावाच्या लिलाव प्रक्रियेचा तपशिल खालीलप्रमाणे.

अ. क्र.	तलावाचे नाव	सन	मागील वर्षातील रक्कम	१०% वाढ करुन होणारी रक्कम	एकूण देयक
१	आचोळे तलाव	२०२१-२२	७,१७,४८३/-	७१,७४८/-	७,८९,२३१/-
२		२०२२-२३	७,८९,२३१/-	७८,९२३/-	८,६८,१५४/-
३		२०२३-२४	८,६८,१५४/-	८६,८१५/-	९,५४,९६९/-

उपरोक्त प्रमाणे प्राप्त दरावर शासकीय भरणा म्हणजे G.S.T. व I.T. मंजुर निविदा दरावर दराव्यतीरीक्त महानगरपालिकेकडे अतिरिक्त होणारी रक्कम ठेकेदाराने भरणे आवश्यक आहे.

निर्णय :- आचोळे तलाव ३ वर्षासाठी रक्कम रु. ९,५४,९६९/- (अक्षरी रक्कम रु. नऊ लाख चौपन्न हजार नऊशे एकोणसत्तर मात्र/-) मत्स्यसंवर्धनासाठी देण्यास G.S.T. व I.T. मंजुर निविदा दरावर दराव्यतीरीक्त महानगरपालिकेकडे अतिरिक्त होणारी रक्कम ठेकेदाराने भरणे आवश्यक आहे. कलम ६७ (३) क अन्वये असलेल्या अधिकारानुसार मी प्रशासकीय मान्यता देत आहे. या कामी ई-निविदा मागविण्यात याव्यात. यासाठी होणारे इतर अनुशांगिक खर्चास मंजुरी देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

प्रभाग समिती (डी), आचोळे, नालासोपारा (पू)

ता.वसई, जि.पालघर

ठराव क्र. २५५ **दिनांक** ०८/१२/२०२०

विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (डी), नालासोपारा (पू) हद्दीतील नागेला तलाव सन २०२१-२०२४ या तीन वर्षाकरीता मत्स्यसंवर्धनासाठी देणेबाबत.

प्रस्ताव :- वसई - विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती (डी), आचोळे, नालासोपारा (पूर्व) अंतर्गत नागेला तलाव मत्स्यसंवर्धनासाठी लिलाव पध्दतीने सन २०१८ ते २०२१ या तीन वर्षाकरीता रक्कम रु. १,७०,०००/- इतक्या रक्कमेत एकुण (१८% जी. एस. टी.) रु. ३०,६००/- असे एकत्र एकुण रक्कम रु. २,००,६००/- इतक्या रक्कमेस देण्यात आला होता. तद्नंतर मत्स्यसंवर्धनासाठी सन २०२१-२०२४ तीन वर्षांकरीता सदर तलाव मत्स्यसंवर्धनासाठी देणे आवश्यक असुन मागील मंजुर रक्कम रु. २,००,६००/- व त्यावर तीन वर्षाकरीता निविदा प्रक्रिया करणे आवश्यक आहे. तथापि तलावाच्या लिलाव प्रक्रियेचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ. क्र.	तलावाचे नाव	सन	मागील वर्षातील रक्कम	१०% वाढ करुन होणारी रक्कम	एकूण देयक
१	नागेला तलाव	२०२१-२२	२,००,६००/-	२०,०६०/-	२,२०,६६०/-
२		२०२२-२३	२,२०,६६०/-	२२,०६६/-	२,४२,७२६/-
३		२०२३-२४	२,४२,७२६/-	२२,२७३/-	२,६६,९९९/-

उपरोक्त प्रमाणे प्राप्त दरावर शासकीय भरणा म्हणजे G.S.T. व I.T. मंजुर निविदा दरावर दराव्यतीरीक्त महानगरपालिकेकडे अतिरिक्त होणारी रक्कम ठेकेदाराने भरणे आवश्यक आहे.

निर्णय :- नागेला तलाव ३ वर्षासाठी रक्कम रु. २,६६,९९९/- (अक्षरी रक्कम रु. दोन लाख सहासष्ट हजार नऊशे नव्यान्नव रुपये मात्र/-) मत्स्यसंवर्धनासाठी देण्यास G.S.T. व I.T. मंजुर निविदा दरावर दराव्यतीरीक्त महानगरपालिकेकडे अतिरिक्त होणारी रक्कम ठेकेदाराने भरणे आवश्यक आहे. कलम ६७ (३) क अन्वये असलेल्या अधिकारानुसार मी प्रशासकीय मान्यता देत आहे. या कामी ई-निविदा मागविण्यात याव्यात. यासाठी होणारे इतर अनुशांगिक खर्चास मंजुरी देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक

वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व जि. पालघर, पिन नं. ४०१ ३०५.
दुरध्वनी ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६ फॅक्स-०२५०-२५२५१०७.
ई मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्रं. २५६ विभाग :- अग्निशमन व आणीबाणी सेवा
दिनांक :-०८/१२/२०२०

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या अग्निशमन व आणीबाणी सेवा विभागाकरीता फोम टेंडर, वॉटर टेंडर, वॉटर ब्राऊजर, रॅपीड इंटरव्हेंशन व्हेईकल, अॅम्बुलंन्स, युटीलीटी वाहने खरेदी करणेस प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणे बाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- सविनय सादर करण्यात येते की, वसई विरार शहर महानगरपालिका अग्निशमन विभागाचे १) मुख्य अग्निशमन केंद्र, आचोळे, २) श्रीप्रस्थ अग्निशमन केंद्र, नालासोपारा (प.), ३) फुलपाडा अग्निशमन केंद्र, विरार (पूर्व), ४) बोळींज अग्निशमन केंद्र, विरार (प.), ५) सनसिटी अग्निशमन केंद्र, दिवानमान, वसई (प.), ६) तामतलाव अग्निशमन केंद्र, वसई गांव, ७) नवघर अग्निशमन केंद्र, वसई (पूर्व) अशी एकुण सात अग्निशमन केंद्रे कार्यरत आहेत तसेच १) पेल्हार, २) उमेळाफाटा, ३) जुचंद्र, ४) वालीव या ठिकाणी अग्निशमन केंद्रे प्रस्तावीत आहेत तसेच योग्य जागा उपलब्ध झाल्यानंतर आवश्यक ठिकाणी अग्निशमन केंद्रे उभारावयाची आहेत.

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये शहराचा विकास झपाटयाने होत असल्याने लोकसंख्या मोठया प्रमाणात वाढत आहे. नवघर (पूर्व), वालीव, गोखिवरे, गौराईपाडा, पेल्हार, कामण, विरार व पापडी हया भागात मोठया औद्योगिक वसाहती असुन आग लागण्याच्या दुर्घटना सातत्याने होत असतात तसेच महानगरपालिका हद्दीमधुन मुंबई-अहमदाबाद हा राष्ट्रीय महामार्ग जात असुन मोठया प्रमाणात वाहनाची वर्दळ असते. वाहन अपघात किंवा वायु / रसायन गळतीच्या दुर्घटना घडल्यास त्यासाठी लागणारी आवश्यक आधुनिक यंत्रणा व उपकरणे अग्निशमन विभागाकडे असणे आवश्यक आहे.

महानगरपालिका क्षेत्रालगत वाडा, भिवंडी, मिरा भाईंदर, तारापूर, पालघर, बोईसर इत्यादी ठिकाणी मोठया प्रमाणात औद्योगिक वसाहती आहेत. त्या भागातील आगीच्या वर्दी आल्यास अग्निशमन वाहने तातडीने पाठवावी लागतात. महानगरपालिका हद्दीत ७ रेल्वे स्टेशन (नायगाव, वसई रोड, नालासोपारा, विरार, वैतरना, जूचंद्र, कामण) आहेत. नदी, नाले, खाडी, समुद्र डोंगराळ प्रदेश जंगल इत्यादी असल्याने कुठल्याही स्वरुपाची नैसर्गिक आपत्ती किंवा मानव निर्मित आपत्ती निर्माण झाल्यास तत्काळ मदत कार्य उपलब्ध करुन देणे करीता अग्निशमन दल आधुनिक यंत्रसामुग्रीने सुसज्ज असणे गरजेचे आहे. महानगरपालिका क्षेत्रात इंडियन ऑईल या कंपनीचा मोठया प्रमाणात तेल साठा वसई स्टेशन लगत आहे तसेच औद्योगिक वसाहतीमध्ये खाद्य तेल साठा ठेवून वितरण करण्याचे कारखाने आहेत. औद्योगिक वसाहतीमध्ये रासायनिक सामुग्रीला आग लागल्यास फोम टेंडर या प्रकारच्या अग्निशमन वाहनांचा उपयोग होतो.

अग्निशमनाच्या नियमाप्रमाणे मोठया दुर्घटनास्थळी अग्निशमन वाहनाबरोबर रुग्णवाहीका पाठविणे अपेक्षित आहे. तसेच गंभीर स्वरुपात जखमी नागरिक किंवा अग्निशमन कर्मचारी यांना तातडीने इस्पितळात पोहोचविण्यास अत्याधुनिक कार्डीयाक रुग्णवाहीका व सामान्य रुग्णवाहीका असणे आवश्यक आहे.

आपल्या शहरात पाणीपुरवठा हा मर्यादित वेळेतच होतो महानगरपालिकेची फायर हायड्रंन्ट कुठेही उभारलेली नाही म्हणुन अग्निशमन दलाला पाणीपुरवठा करण्याकरिता वॉटर ब्राऊजर पाठवावा लागतो. सद्या सात उपकेंद्रात मिळुन केवळ दोन वॉटर ब्राऊजर असल्याने नविन वॉटर ब्राऊजर खरेदी करणे संयुक्तीक वाटते.

वसई विरार शहर महानगरपालिका सर्वसाधारण सभा ठराव क्रं. ११, दि.१९/०६/२०१७ अन्वये खालीलप्रमाणे वाहने व साधनसामुग्री खरेदी करणेस मंजुरी देण्यात आली होती.

अ.क्र.	वाहनाचा प्रकार	नग
१	इमरजंन्सी रेस्क्यु टेंडर / हॅझमॅट व्हॅन साहित्यासह	१
२	वॉटर बाऊजर साहित्यासह	४
३	रॅपीड इंटव्हेंशन व्हेईकल (जलद हस्तक्षेप वाहन)	२
४	रुग्णवाहीका	४
५	पॅरामेडीकल रुग्णवाहीका	२
६	वॉटर बाऊजर विथ टॉवर मॉनिटर	१
७	वॉटर टेंडर टाईप "बी" अग्निशमन वाहन	३
८	अग्निशमन व आपतकालीन विविध प्रकारची साधन सामुग्री	-

उपरोक्त तक्त्यातील अनु क्रं. १ वर नमूद इमरजंन्सी रेस्क्यु टेंडर / हॅझमॅट व्हॅन साहित्यासह व अनु क्रं. ६ वर नमूद वॉटर बाऊजर विथ टॉवर मॉनिटर तसेच अनु क्रं. ८ वर नमूद अग्निशमन व आपतकालीन विविध प्रकारची साधन सामुग्री आवश्यकतेनुसार खरेदी करण्यात आलेली आहेत.

वरील मंजूर ठरावात सद्याच्या परिस्थिती नुसार बदल करणे आवश्यक असुन त्याअन्वये चार वॉटर ब्राऊजर ऐवजी दोन फोम टेंडर आणि दोन वॉटर ब्राऊजर खरेदी करणे योग्य ठरेल.

अनु क्रं. ३ वर नमूद दोन नग रॅपीड इंटरव्हेंशन व्हेईकल (जलद हस्तक्षेप वाहन) अत्याधुनिक तंत्रज्ञानाने विकसीत असे आधुनिक यंत्र सामुग्रीने सुसज्ज असलेले तसेच प्रवाहित विद्युत दुर्घटना घडल्यास तातडीचे कामासाठी अत्यंत उपयुक्त ठरणारे असे रॅपीड इंटरव्हेंशन व्हेईकल (जलद हस्तक्षेप वाहन) अग्निशमन वाहन खरेदी करणे संयुक्तीक राहील.

मा.आयुक्त साो. यांनी दोन पॅरामेडीकल रुग्णवाहीका ऐवजी दोन कार्डीयाक रुग्णवाहीका तसेच चार सामान्य रुग्णवाहीका खरेदी करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत.

अग्निशमन दलातील सद्या वापरात असलेले अग्निशमन वाहने १) एम.एच.०४.ए.एम.०२२३ (वॉटर टेंडर), (सन २००६) २) एच.०४.एच.८०६० (वॉटर टेंडर), (सन २००८) ३) एम. एच. ४ एच ८०५९ (वॉटर टेंडर) (सन १९९६) या वाहनांचे शासन धोरणा नुसार आयुष्यमान संपत आलेले आहे सबब या तीन वाहनाऐवजी अनु क्रं. ७ वर नमूद तीन नग वॉटर टेंडर टाईप "बी" अग्निशमन वाहने साहित्यासह खरेदी करणे आवश्यक आहे.

एखाद्या दुर्घटनास्थळी मनुष्यबळ कमी पडल्यास कर्मचारी वर्ग साधन सामुग्रीसह मुख्य अग्निशमन केंद्रातुन तातडीने पाठविण्याकरिता तसेच मागील तीन वर्षात सर्प-९१३७, प्राणी -५५९ व पक्षी ७१७ यांची सुखरुप सुटका करुन जंगलात सोडण्यात आले आहे. ब-याच वेळा ही संख्या प्रती दिन ३० पर्यंत ही जाते. सर्पाची वर्दी पावसाळ्यात मोठया प्रमाणात असते व पकडलेले साप, प्राणी व पक्षी जंगलात सुखरुप सोडणेकरिता मुख्य अग्निशमन केंद्रातुन सध्या मोठया अग्निशमन वाहनातून त्याच दिवशी जंगलात सोडावे लागते यासाठी मनपास खर्च ही जास्त होतो व वेळही वाया जातो. साप सोडण्यास अग्निशमन वाहन गेल्यावर जर शहरात मोठी दुर्घटना घडली तर मोठया वाहनांची कमतरता भासु शकते याकरिता युटीलीटी वाहन असणे आवश्यक आहे.

उपरोक्त बाबींचा सर्वंकश विचार करुन खालील प्रकारची वाहने खरेदी करणे आवश्यक आहे.

अ. क्र.	वाहनांचा तपशील	प्रती नग अंदाजीत दर	खरेदीची संख्या	वाहनांची अंदाजित एकुण रक्कम
१	फोम टेंडर (अत्याधुनिक यंत्रसामुग्रीसह)	१,१०,००,०००/-	२	२,२०,००,०००/-
२	वॉटर टेंडर (अत्याधुनिक यंत्रसामुग्रीसह)	९५,००,०००/-	३	२,८५,००,०००/-
३	मिनी वॉटर टेंडर (यंत्रसामुग्रीसह)	६५,००,०००/-	१	६५,००,०००/-
४	वॉटर बाऊजर (अत्याधुनिक यंत्रसामुग्रीसह)	१,२५,००,०००/-	२	२,५०,००,०००/-
५	रॅपीड इंटव्हेंशन व्हेईकल (जलद हस्तक्षेप वाहन)	८०,००,०००/-	२	१,६०,००,०००/-
६	कार्डीयाक रुग्णवाहीका, अत्याधुनिक यंत्रसामुग्रीसह	२५,००,०००/-	२	५०,००,०००/-
७	रुग्णवाहीका (यंत्रसामुग्रीसह)	१५,००,०००/-	४	६०,००,०००/-
८	युटीलीटी व्हॅन	८,००,०००/-	२	१६,००,०००/-
		एकुण रक्कम		११,०६,००,०००/-

वसई-विरार शहर महानगरपालिकेचे क्षेत्र व लगतचा परिसर तसेच भविष्यातील होणारी लोकसंख्या वाढ याबाबींचा विचार केल्यास महानगरपालिकेस उपरोक्त वाहने खरेदी करणे आवश्यक असुन त्याकरिता रक्कम रुपये ११,०६,००,०००/- खर्च अपेक्षित आहे.

सदरची वाहने जरी आज मंजूर केली तरी प्रत्यक्षपणे निविदा प्रक्रिया होऊन वाहन बांधणी करुन महानगरपालिकेच्या ताब्यात येई पर्यंत किमान दिड वर्षाचा कालावधी लागेल. दरम्यानच्या काळात प्रस्तावीत नविन अग्निशमन केंद्र सुरु झाल्यानंतर वाहने अपूरी पडू नये म्हणून सदर प्रस्तावाची कार्यवाही आता सुरु करणे उचित होईल.

सदरची वाहने खरेदी करणे करीता वसई विरार शहर महानगरपालिकेच्या सुधारित अर्थसंकल्प २०१९-२०२० सह सन २०२०-२०२१ चा अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकामधील पान नं. १०२ वरील ८ नंबरचे लेखाशिर्ष **"विकास निधीअंतर्गत अग्निशमन वाहन व अग्निशमन यंत्रणा असलेली मोटारसायकल व उंच शिडीसह इतर साहित्य खरेदी"** यामध्ये रक्कम रुपये ४० कोटी तरतुद असुन सदर खर्च यामधून करता येईल.

तरी अग्निशमन विभागासाठी उपरोक्त अग्निशमन वाहने खरेदी करणेस येणा-या अंदाजित रक्कम रुपये ११,०६,००,०००/- खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ६७ (३) क अन्वये मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे प्रशासकीय व वित्तिय मंजुरीस्तव सादर.

ठराव :- प्रस्तावित केल्यानुसार वसई-विरार शहर महानगरपालिकेचे क्षेत्र व लगतचा परिसर तसेच भविष्यातील होणारी लोकसंख्या वाढ याबाबींचा विचार केल्यास अग्निशमन व आणीबाणी सेवा विभागाकरीता -

१. फोम टेंडर (अत्याधुनिक यंत्रसामुग्रीसह) - २ नग
२. वॉटर टेंडर (अत्याधुनिक यंत्रसामुग्रीसह) - ३ नग
३. मिनी वॉटर टेंडर (यंत्रसामुग्रीसह) - १ नग
४. वॉटर ब्राऊझर (अत्याधुनिक यंत्रसामुग्रीसह) - २ नग
५. रॅपीड इंटव्हेंशन व्हेईकल (जलद हस्तक्षेप वाहन) - २ नग
६. कार्डीयाक रुग्णवाहीका, अत्याधुनिक यंत्रसामुग्रीसह - २ नग
७. युटीलीटी व्हॅन - २ नग
८. रुग्णवाहीका - ४ नग

इत्यादी अद्ययावत अग्निशमन वाहने खरेदी करणे कामी येणा-या अंदाजीत रक्कम रुपये ११,०६,००,०००/- खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ६७ (३) क अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार सदर कामास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देण्यात येत आहे.

8/12/2020

आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पूर्व, जि. पालघर, पिन नं.४०१३०५
दूरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. २५७ विभाग : बांधकाम

दिनांक : ०८ / १२ /२०२०

प्रस्तावाचा विषय : वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "आय" विभागातील तलाव मासेमारी करीता उपलब्ध करुन देणेकामी दरपत्रक / ई निविदा प्रसिध्द करणे कामी प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकुर : वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती आय वसई क्षेत्रातील खालिल नमुद केलेले तलाव मत्स्यव्यवसायासाठी यापुर्वी ई-निविदाद्वारे देणेत आलेली होते ई निविदाद्वारे प्राप्त झालेली रक्कम त्या समोर नमुद केलेली आहे.

अ. क्र.	विभाग	तलावाचे नाव	मागील लिलावाची रक्कम
१	गिरीज	गिरीज टोकपाडा तलाव टोकपाडा गिरीज वसई	रु. ४९,५००/-
२	सालोली	बरमाळे तलाव सालोली वसई	रु. १,५१,५००/-
३	सालोली	गावज्योती तलाव सालोली, वसई	रु. ३१,५००/-
४	वसई	तामतलाव वसई मुख्य रस्त्यालगत, वसई	रु. १,५५,२४२/-
५	सांडोर	बाभोळा रेळबाव तलाव, वसई बंगली रस्त्यालगत, वसई	रु. ४३,९२३/-
६	चौबारे	चौबारे तलाव, चौबारे गांव, वसई	रु. ३७,९४०/-
७	कौलार बुद्रुक	देवाळे तलाव, देवाळे शाळेजवळ, वसई	रु. ८४,२५२/-
८	कौलार खुर्द	मोठामाळ तलाव, मर्सेस वसई	रु. १,५५,९९३/-
९	मुळगांव	मुळगांव केरेपोंडे तलाव मुळगांव वसई	रु. ७५,५५५/-
१०	सांडोर	सात्मे व्हिलेज, सांडोर बंगली रस्त्यावरुन सात्मेगांव, वसई	रु. १,३३,५००/-
११	उमेळा	उमेळा तलाव, उमेळा गांव वसई	रु. १,५०,०००/- दि. ३१/०५/२०२१ पर्यंत
१२	गिरीज	गिरीज तलाव गिरीज मुख्य रस्ता, वसई	रु. ३,३५,०००/-
१३	सालोली	उत्तळेश्वर तलाव सालोली गांव, वसई	रु. ३,४०,०७१/-
१४	वसई	पापडी तलाव पापडी नाक्याजवळ, वसई	रु. ५,००,०००/-

सदर सर्व तलावाची मुदत या पुर्वीच संपुष्टात आली होती. प्रभाग समिती आय व क्षेत्रिय कार्यालयाकडुन काही अडचणीमुळे तलावाची ई निविदा प्रक्रिया करणे राहुन गेली होती.

दरम्यान महानगरपालिका हद्दीतील सर्वच तलावाचे लिलावाची कार्यवाही संयुक्तरित्या एकत्रित स्वरुपात मुख्यालयाकडुन करणेचे निर्देश प्राप्त होऊन प्रभाग समितीच्या अखत्यारित तलावांची माहिती सादर करणेबाबत सुचित केल्याने सदर तलावाची माहिती मुख्य कार्यालयाकडे सादर करणेत आली होती. परंतु ई लिलावाची प्रक्रिया मुख्यालयातुन झाली नाही त्यामुळे पुन:श्च तलाव लिलावाची प्रक्रिया सर्व संबंधीत प्रभाग समिती स्तरावरुन करण्याच्या सुचना प्राप्तझाल्या असुन प्रभाग समिती आय वसई येथील उपरोक्त नमुद तलाव मत्स्यसंवर्धनासाठी दि. ०१/०१/२०२१ ते दि. ३१/१२/२०२४ या तीन वर्षाच्या कालावधीत खालील प्रमाणे आधारभुत किंमत निश्चित करणे आवश्यक आहे.

अ. क्र.	विभाग	तलावाचे नाव	मागील लिलावाची रक्कम	१०% वाढीव रक्कम	सन २०२१ ते सन २०२४ ची मागणी रक्कम
१	गिरीज	गिरीज टोकपाडा तलाव टोकपाडा गिरीज वसई	रु. ४९,५००/-	रु. ४,९५०/-	रु. ५४,४५०/-
२	सालोली	बरमाळे तलाव सालोली वसई	रु. १,५१,५००/-	रु. १५,१५०/-	रु. १,६६,६५०/-

३	सालोली	गावज्योती तलाव सालोली, वसई	रु. ३१,५००/-	रु. ३,१५०/-	रु. ३४,६५०/-
४	वसई	तामतलाव वसई मुख्य रस्त्यालगत, वसई	रु. १,५५,२४२/-	रु. १५,५२४/-	रु. १,७०,७६६/-
५	सांडोर	बाभोळा रेळबाव तलाव, वसई बंगली रस्त्यालगत, वसई	रु. ४३,९२३/-	रु. ४,३९२/-	रु. ४८,३१५/-
६	चौबारे	चौबारे तलाव, चौबारे गांव, वसई	रु. ३७,९४०/-	रु. ३,७९४/-	रु. ४१,७३४/-
७	कौलार बुद्रुक	देवाळे तलाव, देवाळे शाळेजवळ, वसई	रु. ८४,२५२/-	रु. ८,४२५/-	रु. ९२,६७७/-
८	कौलार खुर्द	मोठामाळ तलाव, मर्सेस वसई	रु. १,५५,९९३/-	रु. १५,५९९/-	रु. १,७१,५९२/-
९	मुळगांव	मुळगांव केरेपोंडे तलाव मुळगांव वसई	रु. ७५,५५५/-	रु. ७,५५६/-	रु. ८३,१११/-
१०	सांडोर	सात्मे व्हिलेज, सांडोर बंगली रस्त्यावरुन सात्मेगांव, वसई	रु. १,३३,५००/-	रु. १३,३५०/-	रु.१,४६,८५०/-
११	उमेळा	उमेळा तलाव, उमेळा गांव वसई	रु. १,५०,०००/- दि. ३१/०५/२०२१ पर्यंत	रु. १५,०००/-	रु. १,६५,०००/-
१२	गिरीज	गिरीज तलाव गिरीज मुख्य रस्ता, वसई	रु. ३,३५,०००/-	रु. ३३,५००/-	रु. ३,६८,५००/-
१३	सालोली	उत्तळेश्वर तलाव सालोली गांव, वसई	रु. ३,४०,०७१/-	रु. ३४,००७/-	रु. ३,७४,०७८/-
१४	वसई	पापडी तलाव पापडी नाक्याजवळ, वसई	रु. ५,००,०००/-	रु. ५०,०००/-	रु. ५,५०,०००/-

उपरोक्त तलावापैकी अनुक्रमांक १ ते १० तलावाचे लिलाव करीता दरपत्रके मागविणेस, अनुक्रमांक ११ सदर तलाव दि. ३१/०५/२०२१ पर्यंत लिलावत देण्यात आलेला आहे, अनुक्रमांक १२ ते १४ तलावाचे लिलावा करीता वृत्तपत्रात जाहीर ई निविदा प्रसिद्ध करुन निविदा मागविणेस तसेच मंजुर रक्कमेवर प्रतीवर्षी १०% वाढकरुन येणारी रक्कम या रक्कमेवर १८% GST आकारणेस व होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरीस्तव सादर.

ठराव निर्णय : वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'आय' कार्यक्षेत्रातील तलाव मासेमारीकरीता उपलब्ध करुन देणेकामी सन २०२१ ते सन २०२४ करीता उपरोक्त तलावाची आधारभुत किमतीनुसार दरपत्रके तसेच ई - निविदा प्रणालीव्दारे निविदा मागविणेस होणाऱ्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७(३)(क) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार दरपत्रके मागविणेस तसेच ई- निविदा मागविणेस होणाऱ्या खर्चास तसेच मंजुर रक्कमेवर १८ % GST आकारण्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पुर्व), जि. पालघर पिन नं 401305
दुरध्वनी - 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स - 0250-2525107
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. २५८ **विभाग : मुख्यालयलेखा विभाग**

दिनांक : ०८ / ४२ **/2020**

प्रस्तावाचा विषय :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 च्या प्रकरण 9 व कलम 94 मधिल तरतुदीनुसार सन 2019-2020 ची वार्षिक लेखा विवरणपत्रे मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्यापुढे सादर करणे.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेचा सन 2019-2020 च्या जमा - खर्चाचे वार्षिक लेखे आवश्यक सहपत्रासह सोबत सादर केले आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 94(3) प्रमाणे सर्व संबंधीतांकडे विवरणपत्राच्या प्रती पाठवणेकामी तव्दतच याबाबतच्या, प्रती प्रत्येक पृष्ठास रु 2/- प्रमाणे विक्रिसाठी उपलब्ध करणेस तसेच महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी प्रस्ताव मा. आयुक्त तथा प्रशासक यांना मान्यतेस्तव सादर.

ठरावाचा निर्णय :- सन 2019-2020 वित्तीय वर्षाचा जमा खर्चास वार्षिक लेखे व सहपत्रे मान्य करुन ठरावाचे प्रतीसह महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्दी करणे व प्रस्तावित प्रमाणे विक्रिसाठी उपलब्ध करणेस प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

प्रभाग समिती 'सी', चंदनसार, विरार (पूर्व).

प्रशासकीय ठराव क्र. २५९ दिनांक :- ९ /१२ /2020

प्रस्तावाचा विषय :- प्रभाग समिती 'सी' चंदनसार हद्दीतील तलावांचे लिलाव करणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यालयातील चंदनसार (सी) प्रभाग क्षेत्रातील खालील नमुद केलेले तलाव मत्स्य संवंर्धनसाठी दिनांक 01/09/2018 ते 31/08/2020 या दोन वर्षासाठी ई-निविदाद्वारे देण्यात आले होते. त्याद्वारे प्राप्त झालेली दोन वर्षाची रक्कम त्यांचे नावासमोर नमुद केलेली आहे.

अ.क्र.	विभाग	तलावाचे नांव	दोन वर्षांसाठी प्राप्त झालेली रक्कम
1	कोशिंबे	कोशिंबे तलाव	16800/-
2	दहिसर	दहिसर मोठा तलाव	16700/-
3	दहिसर	दहिसर तलोठी तलाव	10600/-
4	कसराळी	तलावपाडा गाव तलाव	6400/-
5	कसराळी	कसराळी गाव तलाव	39000/-
6	शिरगाव	शिरगाव लहान तलाव	17900/-
7	शिरगाव	शिरगाव मोठा तलाव	112500/-
8	चंदनसार	कोपरी तलाव	27100/-
9	चंदनसार	घाणीचा तलाव	227500/-
10	पेल्हार	सुकाळा तलाव	104000/-
11	कसराळी	तलावपाडा स्मशानभूमी मोरी	9100/-
12	कसराळी	कसराळी अप्रोज रोड मोरी	163000/-
13	कसराळी	कसराळी खान डोंगरी मोरी	16100/-
14	कसराळी	दहिसर स्मशान भूमी मोरी	22100/-

उक्त तलावांची मुदत संपुष्टात येणे पूर्वीच प्रभाग समिती "सी" कार्यालयाकडून माहे जून 2020 पासून निविदांच्या प्रक्रियेच्या अनुषंगाने प्रशासकीय वित्तीय मंजूरी तपासता मा. आयुक्त महोदय यांचे कडून मंजूर करुन घेण्यात आला होता व लिलाव प्रक्रियेची कार्यवाही सुरु करणेत आली होती. दरम्यान महापालिका हद्दीतील सर्वच तलावांच्या लिलाव प्रक्रियेची कार्यवाही संयुक्तरित्या एकत्रित स्वरुपात मुख्यालयाकडून करण्याचे निर्देश प्राप्त झाले. त्यानुसार सी प्रभाग समिती अखत्यारीतील तलावांची माहिती मुख्य कार्यालयाकडे निविदा करणेचे अनुषंगाने सादर करण्यात आली होती. परंतु तलावांच्या एकत्रित स्वरुपातील अपेक्षित निविदांची कार्यवाही मुख्यालयातून प्रस्तावित होती. त्यानंतर पुन:श्च तलाव लिलावांची प्रक्रिया प्रभाग समिती स्तरावर करण्याच्या सुचना प्राप्त झाल्या. त्या अनुषंगाने सी चंदनसार प्रभाग समिती येथील वर नमुद तलाव सन 2021 ते सन 2023 या तीन वर्षाच्या कालावधीसाठी मत्स्य संवंर्धनासाठी खालीलप्रमाणे आधारभूत किंमत निश्चित करणे आवश्यक आहे.

उपरोक्त नमुद केलेली तलाव लिलावांची रक्कम ही दोन वर्षासाठीची रक्कम असल्याने ती प्रत्येक वर्ष निहाय दर्शवून प्रत्येक वर्षात अपेक्षित 10 टक्के वाढ गृहीत धरुन लिलावाची आधारभूत किंमत निश्चित करणे आवश्यक आहे. परंतु सदर तलावांच्या यादीत नैसर्गिक पाण्याचा निचरा करणाऱ्या 04 उघाड्यादेखील समाविष्ट आहेत.

D/Sanjay Patil

सन 2021 ते सन 2023

अ. क्र.	विभाग	तलावाचे नांव	दोन वर्षांसाठी प्राप्त झालेली रक्कम	एक वर्षासाठी रक्कम	2021 (10% वाढ)	आधारभूत किंमत (2021)	2022 (10% वाढ)	आधारभूत किंमत (2022)	2023 (10% वाढ)	आधारभूत किंमत (2023)
1	कोशिंबे	कोशिंबे तलाव	16800	8400	840	9240	924	10164	1016	11180
2	दहिसर	दहिसर मोठा तलाव	16700	8350	835	9185	918	10103	1010	11113
3	दहिसर	दहिसर तलोठी तलाव	10600	5300	530	5830	583	6413	641	7054
4	कसराळी	तलावपाडा गाव तलाव	6400	3200	320	3520	352	3872	387	4259
5	कसराळी	कसराळी गाव तलाव	39000	19500	1950	21450	2145	23595	2359	25954
6	शिरगाव	शिरगाव लहान तलाव	17900	8950	895	9845	984	10829	1082	11911
7	शिरगाव	शिरगाव मोठा तलाव	112500	56250	5625	61875	6187	68062	6806	74868
8	चंदनसार	कोपरी तलाव	27100	13550	1355	14905	1490	16395	1639	18034
9	चंदनसार	घाणीचा तलाव	227500	113750	11375	125125	12512	137637	13764	151401
10	पेल्हार	सुकाळा तलाव	104000	52000	5200	57200	5720	62920	6292	69212
11	कसराळी	तलावपाडा स्मशानभूमी मोरी	9100	4550	455	5005	500	5505	550	6055
12	कसराळी	कसराळी अप्रोज रोड मोरी	163000	81500	8150	89650	8965	98615	9861	108476
13	कसराळी	कसराळी खान डोंगरी मोरी	16100	8050	805	8855	885	9740	974	10714
14	कसराळी	दहिसर स्मशान भूमी मोरी	22100	11050	1105	12155	1215	13370	1337	14707

तीन वर्षाच्या कालावधीसाठी प्रत्येक तलावाची आधारभूत किंमत.

अ.क्र.	विभाग	तलावाचे नांव	आधारभूत किंमत (सन 2021 ते सन 2023)
1	कोशिंबे	कोशिंबे तलाव	11180
2	दहिसर	दहिसर मोठा तलाव	11113
3	दहिसर	दहिसर तलोठी तलाव	7054
4	कसराळी	तलावपाडा गाव तलाव	4259
5	कसराळी	कसराळी गाव तलाव	25954
6	शिरगाव	शिरगाव लहान तलाव	11911
7	शिरगाव	शिरगाव मोठा तलाव	74868

D/Sanjay Patil

8	चंदनसार	कोपरी तलाव	18034
9	चंदनसार	घाणीचा तलाव	151401
10	पेल्हार	सुकाळा तलाव	69212
11	कसराळी	तलावपाडा स्मशानभूमी मोरी	6055
12	कसराळी	कसराळी अप्रोज रोड मोरी	108476
13	कसराळी	कसराळी खान डोंगरी मोरी	10714
14	कसराळी	दहिसर स्मशान भूमी मोरी	14707

उपरोक्त प्रमाणे प्राप्त दरांवर शासकीय भरणा म्हणजेच जी.एस.टी. व आय.टी. मंजूर दरांव्यतिरिक्त महानगपालिकेकडे अतिरिक्त भरणा करावयाचा आहे. त्यानुसार तलावांची वरील तक्त्यात दर्शविलेल्या आधारभूत किंमत निश्चित करुन त्या किंमतीनुसार सन 2021 ते सन 2023 या तीन वर्षाच्या कालावधीसाठी स्वतंत्ररित्या प्रत्येक तलावाच्या लिलावासाठी दरपत्रके मागविणेकामी आर्थिक व प्रशासकीय मंजूरीस्तव सादर.

प्रस्तावाचा निर्णय :- वरिल प्रस्तावानुसार प्रभाग समिती 'सी' चंदनसार अंतर्गत उपरोक्त तलावांपैकी नैसर्गिक पाण्याचा निचरा होण्यासाठी अस्तित्वात असलेल्या 04 ही मोऱ्या वगळून सन 2021 ते सन 2023 या तीन वर्षाच्या कालावधीसाठी खालील नमुद महानगरपालिकेच्या तलावांकरीता स्वतंत्ररित्या प्रत्येक तलावाच्या लिलावासाठी दरपत्रके मागविणेकामी आर्थिक व प्रशासकीय मंजूरी प्रदान करणेत येत आहे.

अ.क्र.	विभाग	तलावाचे नांव	आधारभूत किंमत (सन 2021 ते सन 2023)
1	कोशिंबे	कोशिंबे तलाव	11180
2	दहिसर	दहिसर मोठा तलाव	11113
3	दहिसर	दहिसर तलोठी तलाव	7054
4	कसराळी	तलावपाडा गाव तलाव	4259
5	कसराळी	कसराळी गाव तलाव	25954
6	शिरगाव	शिरगाव लहान तलाव	11911
7	शिरगाव	शिरगाव मोठा तलाव	74868
8	चंदनसार	कोपरी तलाव	18034
9	चंदनसार	घाणीचा तलाव	151401
10	पेल्हार	सुकाळा तलाव	69212

प्रशासक तथा आयुक्त
वसई-विरार शहर महानगरपालिका

D/Sanjay Patil

मुख्य कार्यालय, विरार
विरार (पूर्व),
ता. वसई, जि. पालघर - ४०१ ३०५.

दूरध्वनी : ०२५० - २५२५१०१ / ०२/०३/०४/०५/०६
फॅक्स : ०२५० - २५२५१०७
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

जावक क्र. : व.वि.श.म.
दिनांक :

वसई- विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं.४०१३०५
दूरध्वनी – ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स- ०२५०-२५२५१०७,
ई-मेल **vasaivirarcoporation@yahoo.com**

प्रशासकीय ठराव क्र.:- २६०

विभाग : जाहिरात विभाग
दिनांक : ९ / १२ /२०२०

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका जाहिरात विभागाचे नवीन दर निश्चित करुन प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत.

संदर्भ :- १) सर्वसाधारण सभा ठराव क्र.२३ दि.१९/१२/२०१३ अन्वये प्रस्तावास मंजुरी.
२) स्थायी समिती ठराव क्र.४८४ दि.१२/१/२०१८ अन्वये निविदेस मंजुरी.
३) मे. विजास डिजिटल इं. प्रा.लि. मुंबई यांस वविशम/साप्रवि/३३/२०१८- २०१९ नुसार दि.१७/०४/२०१८ कामाचा कार्यादेश.
४) वविशम यांचे दि.२४/०९/२०२०, दि.१९/१०/२०२०, दि.१८/११/२०२० रोजीची वसुली नोटीस.
५) वविशम जाहिरात विभाग, यांचा निविदा रद्द करणेबाबत प्रशासकीय ठराव क्र.२२८ दि. १८/११/२०२०.
६) ठाणे महानगरपालिका जाहिरात विभाग यांची दरसुची.
७) मिरा भाईंदर महानगरपालिका जाहिरात विभाग यांची दरसुची.

प्रस्तावाचा मजकुर :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २४४,२४५,३८६ अन्वये मुंबई प्रांतिक महानगरपालिका (जाहिरात व फलक नियंत्रण) नियम २००३ नुसार महानगरपालिका कार्यक्षेत्रातील आकाशचिन्ह व दृश्य भागातील जाहिराती यांचे नियंत्रण करणे, तसेच त्यांना कर /फी लावणे यांचे अधिकार प्राप्त आहेत. वरील संदर्भ क्र.१ अन्वये महापालिकेच्या जाहिरात धोरणास व त्याच्या अंमलबजावणीस मान्यता देण्यात आली आहे. संदर्भ क्रं.२ अन्वये मा. स्थायी समितीने जाहिरात निविदेस मान्यता दिलेली असून संदर्भ क्र.३ अन्वये निविदाधारकास कार्यादेश देण्यात आलेला असून सदर निविदा /करारनामा अनुषंगाने त्यांनी रु.१,४४,०८,०००/- जाहिरात शुल्काचा सनदी लेखापाल यांनी प्रमाणित केल्याप्रमाणे भरणा केलेला नाही.

तरी सदर निविदाधारकांस संदर्भ क्र.४ अन्वये जाहिरात शुल्क भरणेकरिता नोटीस बजविण्यात आले असून त्यांनी निविदेची रक्कम भरणा केली नाही, तसेच समाधानकारक खुलासा सादर केलेला नाही त्यामुळे संदर्भ क्र.५ अन्वये प्रशासकीय ठराव मंजुर करुन निविदाधारकाची निविदा रद्द करणेची कार्यवाही करणेत आली आहे.

मुख्य कार्यालय, विरार
विरार (पूर्व),
ता. वसई, जि. पालघर - ४०१ ३०५.

दूरध्वनी : ०२५० - २५२५१०१ / ०२/०३/०४/०५/०६
फॅक्स : ०२५० - २५२५१०७
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

जावक क्र. : व.वि.श.म.
दिनांक :

त्यामुळे जाहिरात दर निश्चित न झाल्यामुळे व निविदाधारकाकडून असलेले जाहिरात शुल्क भरणा होत नसल्याने जाहिरात विभागाकडून मिळणा-या उत्पन्नास मुकावे लागत असून महापालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे.

महापालिकेच्या क्षेत्रातील विविध भागात होर्डिंग्ज व अन्य प्रकारचे जाहिरातीचे विविध स्त्रोत उपलब्ध करणेकरिता व उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीने जाहिरातीचे दर मंजुर करुन घेणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने संदर्भिय क्र. ६ व ७ अन्वये ठाणे महानगरपालिका व मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे जाहिरातीचे मंजुर दर तुलनात्मकरित्या अवलोकन करुन वसई विरार शहर महानगरपालिका यांचे जाहिरातीचे दर पुढील प्रमाणे प्रस्तावित केले आहेत.

जाहीरात व आकाशचिन्हांबाबत जाहीरात दर तक्ता

अ.क्र	जाहिरातीचा प्रकार	मोजमाप	वसई विरार शहर महानगरपालिका नवीन सुधारित दर (रुपये. प्रति चौ. फुट प्रति महिना)	
			अप्रकाशित	प्रकाशित
१	मनपा जागेतील होर्डिंग्ज (जाहिरात फलक)	प्रति चौ. फुट	५०	६०
२	खाजगी जागेतील होर्डिंग्ज (जाहिरात फलक)	प्रति चौ. फुट	४०	५०
३	फ्लेक्स तात्पुरते/कापडी बॅनर्स (जास्तीत जास्त ०५ दिवसांसाठी)	५० चौ.फुटपर्यंत	१०० (प्रतिदिन)	२०० (प्रतिदिन)
		५० चौ.फुटपेक्षा जास्त	२०० (प्रतिदिन)	४०० (प्रतिदिन)
४	दिव्यांचे खांबावरील फलक (किऑक्स)	प्रति चौ. फुट	७५	१००
५	दुकानावरील जाहिरातीचे फलक	प्रति चौ. फुट	४०	५०
६	वाहनांवरील जाहिरात बॅनर व इलेक्ट्रीक होर्डिंग्ज LED	प्रति चौ. फुट	४०	५०
७	रोड शो/बलून	-	१५०० (प्रतिदिन)	२००० (प्रतिदिन)
८	कॅन्टीलीव्हर	प्रति चौ. फुट	७५	१००
९	कमानी	प्रति चौ. फुट	७५	१००
१०	प्रदुषण व वातावरण दर्शक फलक व जाहिरात फलक	प्रति चौ. फुट	४०	५०
११	भिंतीवरील जाहिरात	प्रति चौ. फुट	५०	६०
१२	युनिपोल	प्रति चौ. फुट	४०	५०
१३	ॲडपोल	प्रति चौ. फुट	४०	५०

मुख्य कार्यालय, विरार
विरार (पूर्व),
ता. वसई, जि. पालघर - ४०१ ३०५.

दूरध्वनी : ०२५० - २५२५१०१ / ०२/०३/०४/०५/०६
फॅक्स : ०२५० - २५२५१०७
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

जावक क्र. : व.वि.श.म.
दिनांक :

१) वरील नमुद केलेल्या दरामध्ये **प्रतिवर्ष १०%** वाढ करण्यात येईल.

२) दुकानामध्ये मुख्य/मोठे एका फलकाव्यतिरिक्त स्वत:ची व इतर कोणत्याही उत्पादकाची दुकानाचे फलकावर उत्पादकाची जाहिरात केलेली असल्यास त्यास जाहिरात फी प्रतिवर्ष १०% वाढ करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

वरील तक्त्यामध्ये नमुद दर हे ०३ वर्षाकरिता तयार करण्यात आलेले असून त्यामध्ये प्रतिवर्ष १०% वाढ करण्यात येईल. महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३८६ (२) व ७९ अन्वये मान्यतेस्तव सादर.

प्रस्तावाचा ठराव :- प्रस्तावित केल्यानुसार जाहिरात विभागाने वसई विरार शहर महानगरपालिका करिता तुलनात्मकरित्या तयार केलेले जाहिरातीचे दर मंजुर करण्यात येत आहे.

सत्य प्रत

महानगरपालिका सचिव
वसई-विरार शहर महानगरपालिका

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पुर्व)

ता.वसई, जि.पालघर

प्रशासकीय ठराव क्र. २६९ विभाग ः - सार्व.वाचनालय

दि.१०/१२/२०२०

प्रस्तावाचा विषय ः- सन २०२०-२१ वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिकेच्या सर्व सार्वजनिक वाचनालयांनसाठी लागणारी मराठी, हिंदी, इंग्रजी, गुजराती भाषेतील पुस्तके तसेच शैक्षणिक पुस्तके खरेदी करणेकामी विचार विनिमय करून निर्णय घेणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर ः-

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या सर्व सार्वजनिक वाचनालयांत मोठया प्रमाणात वाचकवर्ग येत असून वाचनालयात उपलब्ध करण्यांत येणा-या सन २०२०-२१ वर्षा करिता नविन प्रकाशित होणारी मराठी, हिंदी, इंग्रजी, गुजराती भाषेतील पुस्तकांचा तसेच शैक्षणिक पुस्तकांचा वाचकवर्ग मोठया प्रमाणात लाभ घेत असतात. वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वार्षिक अंदाजपत्रकात पुस्तक व ग्रंथ खरेदी (लेखा संकेतांक ५२१-४५१0,२२४२) या लेखा शिर्षातर्गत रक्कम रू. १५ लक्ष इतकी तरतूद करण्यांत आलेली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६६(२२) अन्वये ग्रंथालये, संग्रहालये व कलादालने, वनस्पती-संग्रहालये किंवा प्राणिसंग्रहालये स्थापन करणे, ती सुस्थितीत राखणे किंवा त्यांना मदत देणे आणि त्यांच्यासाठी इमारती खरेदी करणे किंवा बांधणे अन्वये तरतूद आहे सदर पुस्तके खरेदी करणेसाठी वृत्तपत्रात जाहिर ई - निविदा सुचना प्रसिध्द करून तसेच महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्दी देऊन सन २०२० -२१ वर्षाकरिता वार्षिक ई - निविदा मागवून मंजूर निविदाधारकाकडून ग्रंथ खरेदी केल्यास खरेदीच्या एकूण रक्कमेवर महानगरपालिकेस सवलत मिळणार आहे. मराठी, हिंदी, इंग्रजी, गुजराती भाषेतील पुस्तके तसेच शैक्षणिक पुस्तकांचे प्रकाशनाप्रमाणे सवलतीचे दर मागविल्यास महानगरपालिकेचा फायदा होणार आहे. तरी सन २०२०-२१ वर्षाकरिता वसई विरार शहर महानगरपालिकेच्या सर्व सार्वजनिक वाचनालयासाठी लागणारी मराठी, हिंदी, इंग्रजी, गुजराती भाषेतील पुस्तके तसेच शैक्षणिक पुस्तके खरेदी करणेकामी येणा-या रक्कम रू.६ लक्ष (अक्षरी रक्कम रू. सहा लक्ष मात्र) इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. आयुक्त तथा प्रशासक वसई विरार शहर महानगरपालिका यांच्याकडे मंजुरीस्तव सादर.

ठराव ः-

वरील विषयावर मा.आयुक्त साहेब प्रशासक व वसई विरार शहर महानगरपालिका यांचे सभागृहात सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यानुसार सन २०२०-२१ या वित्तीय वर्षाकरिता वसई विरार शहर महानगरपालिकेच्या सर्व सार्वजनिक वाचनालयाकरिता लागणारी मराठी, हिंदी, इंग्रजी, गुजराती भाषेतील पुस्तके तसेच शैक्षणिक पुस्तके खरेदी करणेकामी महानगरपालिकेच्या संकेस्थळावर तसेच वर्तमानपत्रामध्ये जाहिर ई - निविदा सुचना प्रसिध्द करून त्याद्वारे ई - निविदा मागवून जास्त सवलत देणा-या मंजूर निविदाधारकाकडून वर नमूद साहित्य खरेदी करणेकामी मा.आयुक्त प्रशासकीय मंजूरी देत आहे. तसेच सदरकामी होणारे देयक अदा करणेकरिता येणा-या अंदाजित रक्कम रू. ६ लक्ष (अक्षरी रक्कम रू. सहा लक्ष मात्र) इतक्या खर्चास वित्तीय मंजूरी देत आहे.

10/12/2020

आयुक्त तथा प्रशासक

वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महाागरपालिका
मुख्य कार्यालय,विरार पूर्व,जि.पालघर, पिा ं.४०१३०५
दुरध्वी- ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स -०२५०-२५२५१०७
ई-मेल - vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र :- 262

विभाग :- तलाव विभाग
दिनांक :- 11/12/2020

प्रस्तावाचा विषय :- दि. ०१/०१/२०२१ ते दि. ३१/१२/२०२३ (३ वर्षे) करीता प्रभाग समिती 'एफ' अंतर्गत तलाव मासेमारी संवर्धन करुन मासेमारी करीता ठेका पध्दतीने लिलाव करणेसाठी दरपत्रक मागविणेस व जाहीर नोटीस प्रसिध्द करणे करीता प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- सादर करणेत येते की वसई-विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती 'एफ'धानिव/पेल्हार अंतर्गत येणा-या तलावाची लिलावाची मुदत संपलेली असुन सदर तलाव लिलावाची दरपत्रक प्रक्रिया करणे आवश्यक आहे. त्याकरीता लिलावाच्या रक्कमेची दि. ०१/०१/२०२१ ते दि. ३१/१२/२०२३ या वित्तीय वर्षाकरीता मागणी खालीलप्रमाणे.

अ. क्र.	ठिकाण	सन२०१९-२० मुळ रक्कम	सन २०२०-२१ मागील रक्कम १०%वाढीसह	सन २०२१-२२ मागील रक्कम १०%वाढीसह	सन २०२२-२३ मागील रक्कम १०%वाढीसह
१	चांदिप, मोठा तलाव	६१००	६७१०	७३८१	८११९
२	चांदिप,लहान तलाव	३५००	३८५०	४२३५	४६५८
३	कशिद –कोपर,	९४००	१०३४०	११३७४	१२५११
४	शिरसाड, गांव तलाव	३८००	४१८०	४५९८	५०५७
५	शिरसाड, धारावी तलाव	१८३००	२०१३०	१११४३	१२२५७
६	शिरसाड,नाना सामंत	२१४००	२३५४०	२५८९४	२८४८३
७	पेल्हार वाकणपाडा	२०६००	२२६६०	२४९२६	२७४१८
८	धानिव बाग	३६५००	४०१५०	४४१६५	४८५८१

वरील प्रमाणे तलाव माहे ०१ जानेवारी २०२१ ते ३१/१२/२०२३ या तीन वर्षाचा लिलाव करणेस दरपत्रके मागविणेस तसेच मंजूर होणा-या रक्कमेवर १८%GST व २% आयकर घेण्यास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेस्तव सादर.

ठरावाचा निर्णय :- वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'एफ'धानिव/पेल्हार कार्यक्षेत्रातील तलावाचा मासेमारी संवर्धन व मासेमारी करिता ठेका नियुक्त करण्यासाठी दि.१ जानेवारी २०२१ ते सन माहे ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत (३ वर्ष) या कालावधीसाठी दरपत्रक मागविणेस व मंजूर रक्कमेवर १८%GST व २% आयकर आकारणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) (क) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार प्रभाग समिती 'एफ' कार्यक्षेत्रातील तलाव लिलाव ठेका नियुक्त करण्यासाठी दि. १ जानेवारी २०२१ ते सन माहे ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत (३ वर्ष) या कालावधीसाठी दरपत्रक मागविणे व मंजूर रक्कमेवर १८%GST व २% आयकर आकारणीस प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई- विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. २६३ विभाग :- पाणी पुरवठा
दिनांक :- 11 /12 / २०२०

प्रस्तावाचा विषय :- सन २०२०-२१ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकामधील पाणीपुरवठा विभागासाठीच्या तरतूदींच्या पूर्नविनियोजनास मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- उपरोक्त विषयान्वये उसगांव पाणी पुरवठा योजनेअंतर्गत उसगांव व शिरवली उदचंन केंद्र, तसेच पारोळ जलशुध्दीकरण केंद्र येथे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. मार्फत वीज पुरवठा केला जात आहे. सदर विजपुरवठा अनुषंगाने वीज देयकांचा खर्च भागविण्यासाठी सन २०२०-२१ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील पाणी पुरवठा विभागासाठीच्या "उसगाव योजना विद्युत देयके" या लेखाशिर्षांवर मुळ तरतूद रु.१५० लक्ष इतकी ठेवण्यात आली होती सदर तरतुद सद्य:स्थितीत अपुरी पडत आहे. त्यामुळे पुढील वीज देयकांचा खर्च भागविण्यासाठी लेखाशिर्षावर पुरेशी तरतूद पुर्नविनियोजन करणे आवश्यक आहे.

सन २०२०-२१ च्या अर्थसंकल्पात "उसगाव योजना विद्युत देयके" या लेखाशिर्षावर रु.१५० लक्ष तरतूद असून सदर लेखाशिर्षाअंतर्गत माहे एप्रिल २०२० ते माहे सप्टेंबर २०२० पर्यंत वीज देयकांपोटी रु. १,४०,९६,३५०/- इतका खर्च झाला असून रु.९,०३,६५०/- इतकी शिल्लक आहे. सदर लेखाशिर्षाअंतर्गत माहे नोव्हेंबर २०२० ते मार्च २०२१ या कालावधीकरीता रु.९५ लक्ष इतका खर्च अपेक्षित आहे. करीता सदर लेखाशिर्षावर अन्य लेखाशिर्षातून तरतूद पुर्नविनियोजन करणे आवश्यक आहे.

सन २०२०-२१ च्या अर्थसंकल्पात "पेल्हार पाणी पुरवठा योजना" या लेखाशिर्षावर रु.४०० लक्ष इतकी मुळतरतूद होती. यापुर्वी "उसगाव योजना जनित्र डिझेल" या लेखाशिर्षावर रु.३० लक्ष पुर्नविनीयोजीत करण्यात आले असून याच लेखाशिर्षावरुन "उसगाव योजना विद्युत देयके" या लेखाशिर्षावर रु. ९५ लक्ष तरतूद पुर्नविनियोजन केल्यास विद्युत देयके अदा करणेकामी गैरसोय टाळता येणे शक्य आहे.

तरी वरिल प्रमाणे सन २०२०-२१ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील "पेल्हार पाणी पुरवठा योजना " या लेखाशिर्षावरून रु.९५ लक्ष "उसगाव योजना विद्युत देयके" या लेखाशिर्षावर तरतूद पुर्नविनियोजन करणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०१ नुसार नमुना नं. १० मध्ये विवरणपत्र सोबत जोडून सादर करण्यात येत असून प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

ठराव :- वरिल प्रमाणे सन २०२०-२१ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील "उसगाव योजना विद्युत देयके" या लेखाशिर्षावर तरतुद अपुरी पडत असल्याने "पेल्हार पाणी पुरवठा योजना " या लेखाशिर्षावरून रु.९५ लक्ष "उसगाव योजना विद्युत देयके" या लेखाशिर्षावर तरतूद पुर्नविनियोजन करण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०१ नुसार सादर केलेल्या नमुना नं. १० मधील विवरणपत्रास व प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

11/12/2020

(गंगाथरन डी.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पूर्व, जि. पालघर, पिन नं.४०१३०५
दूरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. २६४ विभाग : बांधकाम

दिनांक : ११/१२/२०२०

१) प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती 'डी' मधील मजेठीया नाटयगृहाचे आंतरिक नक्षीकाम (इन्टीरीअर डिझाईन) बांधकाम करणे प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत.

२. अंदाजपत्रकीय रक्कम :- ३,६९,९३,१९९.००/-

३. प्रस्तावाची गरज :- प्रभाग समिती 'डी' कार्यक्षेत्रात मजेठीया पार्क येथे मजेठीया खुला रंगमंच असुन सदर रंगमंचाचे शेडचे तसेच स्ट्रक्चर व स्टेज इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले आहे. सदर रंगमंचाचा वापर खाजगी कार्यक्रम, शाळेचे उपक्रम,नाटक तसेच लग्न समारंभासाठी करता यावा यासाठी सदर रंगमंचाला आंतरिक नक्षीकाम करणे गरजेचे आहे. मा. आयुक्त सो. यांनी सदर जागेवर मा. शहर अभियंता तथा कार्यकारी अभियंता यांचे समवेत पाहणी करून नाटयगृहाचे इंन्टीरीअरचे काम पूर्ण करणेबाबत सुचना केलेल्या आहेत. त्यामुळे सदर ठिकाणी पाहणी करून अंदाजपत्रक तयार केले आहे.

४. कामाचे स्वरुप :- मजेठीया नाटयगृह इंन्टीरीअरचे काम करणे.

अंतर्गत कामे :- बांधकाम, रंगकाम, ॲकॉस्टिक वर्क, फर्नीचर, इन्टीरीअर वर्क इलेक्ट्रीक वर्क, वॉटर सप्लाय आणि ड्रेनेज सिस्टीम ,फायर सिस्टीम, साऊंड सिस्टीम, एअर कंन्डीशनीग इत्यादी

परिमाण :-

५. यापूर्वा सदर जागेवर झालेल्या कामाचा तपशिल :- माजेठीया नाटयगृह शेड व स्टेजचे बांधकाम झाले आहे .

६. जागेची मालकी :- व.वि.श.म.

७. विकास आराखडयातील आरक्षण :- अस्तित्वातील नाटयगृह

८. अर्थसंकल्पीय तरतूद :- अ) लेखाशिर्ष :- विकासनिधी अंतर्गत नाटयगृह व सभागृह बांधणे.

९. स्थावर मालमत्ता नोंदवही क्र. पृष्ठ क्र. अ.क्र. वर नोंद

तरी सदरची प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (अ) (क) नुसार मा. आयुक्त तथा प्रशासक हयांच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'डी' कार्यक्षेत्रातील मजेठीया नाटयगृहाचे आंतरिक नक्षीकाम (इन्टीरीअर डिझाईन) बांधकाम करणे कामी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ३,६२,३४,६३८.००/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहेत. त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रकास आवश्यक तात्रिंक मंजूरी घेऊन निविदेची कार्यवाही करणेस तसेच त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे.

11/12/2020

आयुक्त तथा प्रशासक

वसई विरार शहर महानगरपालिका

७७७-१

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पूर्व, जि. पालघर, पिन नं.४०१३०५
दूरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र.२६५ विभाग : आरोग्य
दिनांक : ११ /१२ /२०२०

विषय : प्रभाग समिती 'आय' कार्यालय क्षेत्रातील सर डि.एम.पेटीट रुग्णालयाच्या मागील बाजुस पाण्याच्या टाकीलगत रुग्णालय बांधणे याकामी प्राप्त निविदापैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणे बाबत.

अंदाजपत्रकीय रक्कम	:-	रु. ४,९०,७०,८६१/-
प्रशासकीय मान्यता	:-	मा. आयुक्त तथा प्रशासक ठराव क्र. १२५ दि. २३/०९/२०२०
तांत्रिक मंजुरी	:-	दि. २३/०९/२०२०
ई -टेण्डरींग निविदा सुचना प्रसिध्दी तारीख	:-	दि. २८/०९/२०२०
वृत्तपत्रातील निविदा प्रसिध्दी दि.	:-	दि. २९/०९/२०२०
वृत्तपत्राचे नांव	:-	१) दै. आपल महानगर २) दै. नवराष्ट्र ३) दै. मिड डे ४) फ्रि प्रेस जनरल ५) दै. प्रात:काल ६) दै. नवभारत ७) दै. महासागर
प्रिपरेशनची तारीख	:-	दि.२९/०९/२०२० ते दि.२३/१०/२०२०
विहीत मुदतीत ऑनलाईन प्रिक्रियेद्वारे प्राप्त निविदा	:-	०२
ई-टेण्डरींगद्वारे जाहीर फेर ई निविदा सुचना प्रसिध्दी तारीख	:-	दि. २६/१०/२०२०
वृत्तपत्रातील निविदा प्रसिध्दी दि.	:-	दि. २७/१०/२०२०
वृत्तपत्राचे नांव	:-	१) दै. आपल महानगर २) दै. नवराष्ट्र ३) दै. मिड डे ४) फ्रि प्रेस जनरल ५) दै. प्रात:काल ६) दै. नवभारत ७) दै. महासागर
प्रिपरेशनची तारीख	:-	दि. २७/१०/२०२० ते दि. १०/११/२०२०
विहीत मुदतीत ऑनलाईन प्रिक्रियेद्वारे प्राप्त निविदा	:-	०८
ई-टेण्डरींग द्वारे निविदा उघडण्याची दिनांक (प्रथम लखोटा)	:-	दि. ११/११/२०२०
ई-टेण्डरींग द्वारे निविदा द्वितीय लखोटा उघडण्याची दिनांक	:-	दि. २३/११/२०२०
प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी	:-	शहर अभियंता

प्राप्त निविदांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे :-

अ. क्र.	निविदाधारकाचे नाव	निविदा दर	निविदेचा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी असल्यास परफॉर्मन्स सिक्युरिटी बाबत धनाकर्ष तपशिल
१	बरकत कॉंट्रक्टर्स	अंदाजपत्रकीय दराने	-
२	साई कंस्ट्रक्शन	११.११% जास्त दराने	-
३	वैष्णवी कंस्ट्रक्शन	३.५०% कमी दराने	धनाकर्ष क्र.००२६०७दि. २७/११/२०२० पावती क्र. ८६१५२९ दि. २७/११/२०२०
४	आर ॲण्ड के इन्फ्रा.	०.७४% कमी दराने	-
५	मे. महेश विजय सातपुते	१.११% कमी दराने	-
६	आर ॲण्ड बी इन्फ्रा प्रोजेक्ट प्रायव्हेट लिमिटेड	१२.६०% जास्त दराने	-
७	शिवकृपा डेव्हलपर्स	२.११% कमी दराने	-

उपरोक्त तुलनात्मक तक्त्याचा अभ्यास करता **मे. वैष्णवी कंस्ट्रक्शन** यांची **३.५०% कमी** दराची निविदा प्राप्त झालेली आहे. सदर निविदांची तुलना केली असता **मे. वैष्णवी कंस्ट्रक्शन** यांच्या निविदेतील ३.५०% कमी दराची निविदा ही तुलनात्मकरित्या इतर निविदांच्या तुलनेत कमी आहेत.

दि. २७/११/२०२० रोजी अन्वये मा. निविदा समितीने **मे. वैष्णवी कंस्ट्रक्शन** यांच्या **३.५०% कमी** दराच्या निविदेच्या मान्यतेसाठी शिफारस केली आहे.

तरी **मे. वैष्णवी कंस्ट्रक्शन यांच्या ३.५०% कमी** दराच्या निविदेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३(क) अन्वये मा. आयुक्त तथा प्रशासक हयांच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

ठराव :- प्रभाग समिती 'आय' कार्यालय क्षेत्रातील सर डि.एम.पेटीट रुग्णालयाच्या मागील बाजुस पाण्याच्या टाकीलगत रुग्णालय बांधणे कामी **मे. वैष्णवी कंस्ट्रक्शन** हयांची **३.५०% कमी** दराची निविदा सर्वात कमी व वाजवी आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ७३(क) अन्वये या ३.५०% कमी दराच्या निविदेस संविदा करणेस व नामंजुर ठेकेदाराची इसारा रक्कम परत करणेस मान्यता देत आहे. तसेच त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगीक खर्चास मान्यता देत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार पूर्व, जिल्हा-पालघर पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. २६६ विभाग - सामान्य प्रशासन
दिनांक - ६३/६२/२०२०

प्रस्तावाचा विषय - वसई-विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती (ई) नालासोपरा कार्यक्षेत्रातील गास मोठा तलाव मत्स्यसंवर्धनासाठी सन २०२१ ते २०२३ (दि. १ जानेवारी २०२१ ते दि. ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत) या तीन वर्षाकरीता ठेका पद्धतीने देणेकामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकुर - सादर करणेंत येते की, वसई-विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती (ई) नालासोपारा कार्यक्षेत्रातील गास मोठा तलाव या तलावाची मत्स्यसंवर्धनाची मुदत दि. ३१/०५/२०२० पर्यंत संपलेली असल्याने पुढील सन २०२१ ते २०२३ (१ जानेवारी २०२१ ते ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत) या तीन वर्षाकरीता सदर तलावाच्या मागील मंजुर रक्कमेवर १०% वाढ करुन मत्स्यसंवर्धनासाठी ठेका पद्धतीने देणेकामी मा.स्थायी समिती सभा दि. ०२/०५/२०२० ठराव क्र. २९ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेंत आली. त्यानुसार महानगरपालिकेच्या NIC etendering portal (http://mahaetenders.gov.in) संकेस्थळावर तसेच दैनिक वर्तमानपत्रात जाहिर ई-निविदा सुचना प्रसिद्ध करुन दि. १५/०५/२०२० रोजीपर्यंत ई-निविदा मागविणेंत आल्या होत्या. मुदतीत तलावाच्या एकुण तीन ई-निविदा प्राप्त झाल्या व त्यानुसार प्रथम लखोटा उघडणेंत आला असून त्यास मान्यता तसेच दुसरा लखोटा उघडणेबाबत प्रस्ताव सादर करणेंत आला. परंतु मा.आयुक्त यांनी वरील सर्व प्रक्रिया रद्द करुन नव्याने सर्व ई-निविदा करणेकामी निर्देश देण्यात आले.

तरी गास मोठा तलाव मत्स्यसंवर्धनाकरिता सन २०२१ ते २०२३ (दि. १ जानेवारी २०२१ ते दि. ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत)या तीन वर्षांकरिता ठेका पद्धतीने देणेकामी सदर तलावाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	तलावाचे नाव	सन	मागील वर्षातील रक्कम	१०% वाढ करुन होणारी रक्कम	एकुण देयक
१.	गास मोठा तलाव	**सन २०२१** (दि. ०१/०१/२०२१ ते दि. ३१/१२/२०२१पर्यंत)	१८,११,५५०/-	१,८१,१५९/-	१९,९२,७०५/-
२.		**सन २०२२** (दि. ०१/०१/२०२२ ते दि. ३१/१२/२०२२ पर्यंत)	१९,९२,७०५/-	१,९९,२७०/-	२१,९१,९७६/-
३.		**सन २०२३** (दि. ०१/०१/२०२३ ते दि. ३१/१२/२०२३ पर्यंत)	२१,९१,९७६/-	२,१९,९९८	२४,१९,९७४/-

वरील सन २०१७ ते सन २०२० या तीन वर्षांतील मंजुर रक्कम रु. १०,१५,७८६/- इतक्या रक्कमेवर १०% वाढ करुन रक्कम रु. ११,१७,३६५/- एवढी किमान देकार निश्चित करुन सन २०२१ ते २०२३ (१ जानेवारी २०२१ ते ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत) या तीन वर्षांकरिता (प्रति वर्षी १०% वाढ करुन) ई-निविदा मागविणेकामी पुढील निर्णयास्तव सादर.

ठरावाचा निर्णय - वसई-विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती (ई) नालासोपारा कार्यक्षेत्रातील गास मोठा तलाव मासेमारी संवर्धन व मासेमारी करीता ठेका नियुक्त करण्यासाठी सन २०२१ ते २०२३ (दि. १ जानेवारी २०२१ ते दि. ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत) या कालावधीसाठी रक्कम रु. ११,१७,३६५/- या मागणी रक्कमेवर (प्रति वर्षी १०% वाढ करुन) ई-निविदा मागविणेस व GST व I.T. मंजूर निविदा दरावर दराव्यतिरिक्त महानगरपालिकेकडे अतिरिक्त होणारी रक्कम ठेकेदाराने भरणे आवश्यक आहे. कलम ६७(३) क अन्वये असलेल्या अधिकारानुसार मी प्रशासकीय मान्यता देत आहे. याकामी ई-निविदा मागविण्यात याव्यात. यासाठी होणारे इतर अनुशांगिक खर्चास मंजुरी देण्यांत येत आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार पूर्व, जिल्हा-पालघर पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. २६७ विभाग - सामान्य प्रशासन
दिनांक - ३१/१२/२०२०

प्रस्तावाचा विषय - वसई-विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती (ई) नालासोपरा कार्यक्षेत्रातील मालई तलाव मत्स्यसंवर्धनासाठी सन २०२१ ते २०२३ (दि. १ जानेवारी २०२१ ते दि. ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत) या तीन वर्षाकरीता ठेका पद्धतीने देणेकामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकुर - सादर करणेंत येते की, वसई-विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती (ई) नालासोपारा कार्यक्षेत्रातील मालई तलावाची मत्स्यसंवर्धनाची मुदत दि. ३१/०५/२०२० पर्यंत संपलेली असल्याने पुढील सन २०२१ ते २०२३ (१ जानेवारी २०२१ ते ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत) या तीन वर्षाकरीता सदर तलावाच्या मागील मंजुर रक्कमेवर १०% वाढ करुन मत्स्यसंवर्धनासाठी ठेका पद्धतीने देणेकामी मा.स्थायी समिती सभा दि. ०२/०५/२०२० ठराव क्र. २९ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेंत आली. त्यानुसार महानगरपालिकेच्या NIC etendering portal (http://mahaetenders.gov.in) संकेस्थळावर तसेच दैनिक वर्तमानपत्रात जाहिर ई-निविदा सुचना प्रसिद्ध करुन दि. १५/०५/२०२० रोजीपर्यंत ई-निविदा मागविणेंत आल्या होत्या. मुदतीत तलावाच्या एकुण तीन ई-निविदा प्राप्त झाल्या व त्यानुसार प्रथम लखोटा उघडणेंत आला असून त्यास मान्यता तसेच दुसरा लखोटा उघडणेबाबत प्रस्ताव सादर करणेंत आला. परंतु मा.आयुक्त यांनी वरील सर्व प्रक्रिया रद्द करुन नव्याने सर्व ई-निविदा करणेकामी निर्देश देण्यात आले.

तरी मालई तलाव मत्स्यसंवर्धनाकरिता सन २०२१ ते २०२३ (दि. १ जानेवारी २०२१ ते दि. ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत)या तीन वर्षांकरिता ठेका पद्धतीने देणेकामी सदर तलावाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	तलावाचे नाव	सन	मागील वर्षातील रक्कम	१०% वाढ करुन होणारी रक्कम	एकुण देयक
१.	मालई तलाव	**सन २०२१** (दि. ०१/०१/२०२१ ते दि. ३१/१२/२०२१पर्यंत)	१०,१५,७८६/-	१,०१,५७९/-	११,१७,३६५/-
२.		**सन २०२२** (दि. ०१/०१/२०२२ ते दि. ३१/१२/२०२२ पर्यंत)	११,१७,३६५/-	१,११,७३६/-	१२,२९,१०१/-
३.		**सन २०२३** (दि. ०१/०१/२०२३ ते दि. ३१/१२/२०२३ पर्यंत)	१२,२९,१०१/-	१,२२,९१०/-	१३,५२,०११/-

वरील सन २०१७ ते सन २०२० या तीन वर्षांतील मंजुर रक्कम रु. १०,१५,७८६/- इतक्या रक्कमेवर १०% वाढ करुन रक्कम रु. ११,१७,३६५/- एवढी किमान देकार निश्चित करुन सन २०२१ ते २०२३ (१ जानेवारी २०२१ ते ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत) या तीन वर्षांकरिता (प्रति वर्षी १०% वाढ करुन) ई-निविदा मागविणेकामी पुढील निर्णयास्तव सादर.

ठरावाचा निर्णय - वसई-विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती (ई) नालासोपारा कार्यक्षेत्रातील मालई तलावाचा मासेमारी संवर्धन व मासेमारी करीता ठेका नियुक्त करण्यासाठी सन २०२१ ते २०२३ (दि. १ जानेवारी २०२१ ते दि. ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत) या कालावधीसाठी रक्कम रु. ११,१७,३६५/- या मागणी रक्कमेवर (प्रति वर्षी १०% वाढ करुन) ई-निविदा मागविणेस व GST व I.T. मंजूर निविदा दरावर दराव्यतिरिक्त महानगरपालिकेकडे अतिरिक्त होणारी रक्कम ठेकेदाराने भरणे आवश्यक आहे. कलम ६७(३) क अन्वये असलेल्या अधिकारानुसार मी प्रशासकीय मान्यता देत आहे. याकामी ई-निविदा मागविण्यात याव्यात. यासाठी होणारे इतर अनुशांगिक खर्चास मंजुरी देण्यांत येत आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार पूर्व, जिल्हा-पालघर पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. २६८ विभाग - सामान्य प्रशासन
दिनांक - ३१/१२/२०२०

प्रस्तावाचा विषय - वसई-विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती (ई) नालासोपरा कार्यक्षेत्रातील शिरमोळी तलाव मत्स्यसंवर्धनासाठी सन २०२१ ते २०२३ (दि. १ जानेवारी २०२१ ते दि. ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत) या तीन वर्षाकरीता ठेका पद्धतीने देणेकामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकुर - सादर करणेंत येते की, वसई-विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती (ई) नालासोपारा कार्यक्षेत्रातील शिरमोळी तलाव हा सन २०१६ ते सन २०१८ या कलावाधीकरिता ठेका पद्धतीने मत्स्यसंवर्धनाकरिता देण्यात आला होता. सदर तलावांची मुदत ३१ मे २०१८ रोजी संपलेली होती. परंतु सन २०१८ मध्ये सदर तलावांची निविदा प्रक्रिया न झाल्याने पुढील सन २०१९ ते २०२१ या दोन वर्षाकरीता सदर तलावाच्या मागील मंजुर रक्कमेवर १०% वाढ करुन मत्स्यसंवर्धनासाठी ठेका पद्धतीने देणेकामी मा. प्रभाग समिती सभा दि. १५/०२/२०२० ठराव क्र. १८६ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेंत आली होती. त्यानुसार महानगरपालिकेच्या NIC etendering portal (http://mahaetenders.gov.in) संकेस्थळावर तसेच दैनिक वर्तमानपत्रात जाहिर ई-निविदा सुचना प्रसिद्ध करुन दि. १७/१७/२०१९ रोजीपर्यंत ई-निविदा मागविणेंत आल्या होत्या. परंतु मुदतीत तलावाची एकही निविदा प्राप्त न झाल्याने पुन:श्च दोन वेळा फेर ई-निविदा मागवूनसुद्धा सदर तलावाची एकही निविदा प्राप्त न झाल्याने शिरमोळी तलावाची ई-निविदा प्रक्रिया बंद करण्यात आली. परंतु सन २०२१ ते २०२३ (दि. १ जानेवारी २०२१ ते दि. ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत) या तीन वर्षांकरिता सदर तलाव ठेका पद्धतीने देणेकामी मा.आयुक्त यांनी वरील नव्याने सर्व ई-निविदा करणेकामी निर्देश देण्यात आले.

तरी शिरमोळी तलाव मत्स्यसंवर्धनाकरिता सन २०२१ ते २०२३ (दि. १ जानेवारी २०२१ ते दि. ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत)या तीन वर्षांकरिता ठेका पद्धतीने देणेकामी सदर तलावाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	तलावाचे नाव	सन	मागील वर्षातील रक्कम	१०% वाढ करुन होणारी रक्कम	एकुण देयक
१.	शिरमोळी तलाव	**सन २०२१** (दि. ०१/०१/२०२१ ते दि. ३१/१२/२०२१पर्यंत)	३,५३,०००/-	३५,३००/-	३,८८,३००/-
२.		**सन २०२२** (दि. ०१/०१/२०२२ ते दि. ३१/१२/२०२२ पर्यंत)	३,८८,३००/-	३८,८३०/-	४,२७,१३०/-
३.		**सन २०२३** (दि. ०१/०१/२०२३ ते दि. ३१/१२/२०२३ पर्यंत)	४,२७,१३०/-	४२,७१३/-	४,६९,८४३/-

वरील सन २०१६ ते सन २०१८ या तीन वर्षांतील मंजुर रक्कम रु. ३,५३,०००/- इतक्या रक्कमेवर १०% वाढ करुन रक्कम रु. ३,८८,३००/- एवढी किमान देकार निश्चित करुन सन २०२१ ते २०२३ (दि. १ जानेवारी २०२१ ते ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत) या तीन वर्षांकरिता (प्रति वर्षी १०% वाढ करुन) ई-निविदा मागविणेकामी पुढील निर्णयास्तव सादर.

ठरावाचा निर्णय - वसई-विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती (ई) नालासोपारा कार्यक्षेत्रातील शिरमोळी तलाव मासेमारी संवर्धन व मासेमारी करीता ठेका नियुक्त करण्यासाठी सन २०२१ ते २०२३ (दि. १ जानेवारी २०२१ ते दि. ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत) या कालावधीसाठी रक्कम रु. ३,८८,३००/- या मागणी रक्कमेवर (प्रति वर्षी १०% वाढ करुन) ई-निविदा मागविणेस व GST व I.T. मंजूर निविदा दरावर दराव्यतिरिक्त महानगरपालिकेकडे अतिरिक्त होणारी रक्कम ठेकेदाराने भरणे आवश्यक आहे. कलम ६७(३) क अन्वये असलेल्या अधिकारानुसार मी प्रशासकीय मान्यता देत आहे. याकामी ई-निविदा मागविण्यात याव्यात. यासाठी होणारे इतर अनुशांगिक खर्चास मंजुरी देण्यांत येत आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई – विरार शहर महानगरपालिका

मुख्य् कार्यालय विरार (पूर्व), जि. पालघर, पिन नं. 401305
दुरध्वनी – 0250-2525101/02/03/04 05/06 , फॅक्स् – 0250-2525107
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. २६६ **विभाग :** बांधकाम विभाग
दिनांक : १४ /१२/ 2020

प्रस्तावाचा विषय :- वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील नवीन वॉर्ड (बी) वॉर्ड ऑफीसची (जुने प्रभाग समिती (बी) /(ई) ऑफीस) स्थापत्य विषयक कामे करणे.

प्रस्तावाचा मजकूर :- सद्यस्थितीत कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव असल्याने जुने प्रभाग समिती (ई) व (बी) कार्यायातील प्रभाग समिती (ई) चे कार्यालय वृंदावन गार्डन येथे स्थलांतरीत झाले असून प्रभाग समिती (बी) चे कामकाज जुन्या कार्यालयातच होत आहे. सद्यस्थितीत पावसाळयात जुन्या कार्यालयाची तळमजला व दुसऱ्या मजल्याचे स्थापत्य विषयक कामे करणे कार्यालयीन कामकाजाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. तसेच मा. आयुक्त सो. यांनी जुने प्रभाग समिती (बी/ई) या कार्यालयाची पाहणी करून सदर काम करणेबाबत निर्देश दिले आहेत.

त्याअनुषंगाने सदर कामाचे रक्कम रू. 2,23,317 /- इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करणेत आले आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम
1.	वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील नवीन वॉर्ड (बी) वॉर्ड ऑफीसची (जुने प्रभाग समिती (बी) /(ई) ऑफीस) स्थापत्य विषयक कामे करणे.	स्थापत्य विषयक कामे रू. 2,23,317 /-

ठराव :- उपरोक्त् नमुद कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देणेत येत असून सदर कामाच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मंजूरी घेऊन् पुढील निविदा प्रक्रिया करणेस मान्यता देण्यात येत आहे.

प्रशासक उप-आयुक्त
वसई- विरार शहर महानगरपालिका

वसई – विरार शहर महानगरपालिका

मुख्य् कार्यालय विरार (पूर्व), जि. पालघर, पिन नं. 401305
दुरध्वनी – 0250-2525101/02/03/04 05/06 , फॅक्स् – 0250-2525107
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. 260 **विभाग :** बांधकाम विभाग
दिनांक : 18/12/2020

प्रस्तावाचा विषय :- वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील नालासोपारा (प) येथील नवीन (बी) कार्यालयाच्या (जुने प्रभाग समिती (बी) /(ई) ऑफीस) पहिल्या मजल्यावर फॉल्स सिलिंग, कारपेट व फर्निचरची कामे करणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- सद्यस्थितीत कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव असल्याने जुने प्रभाग समिती (ई) व (बी) कार्यायातील प्रभाग समिती (ई) चे कार्यालय वृंदावन गार्डन येथे स्थलांतरीत झाले असून प्रभाग समिती (बी) चे कामकाज जुन्या कार्यालयातच होत आहे. सद्यस्थितीत जुन्या कार्यात्याच्या पहिल्या मजल्यावर फॉल्स सिलिंग, कारपेट व फर्निचरची कामे करणे कार्यालयीन कामकाजाच्या दृष्टीने आवश्यक आहे. तसेच मा. आयुक्त सा॰ यांनी जुने प्रभाग समिती (बी/ई) या कार्यालयाची पाहणी करून सदर काम करणेबाबत निर्देश दिले आहेत.

त्याअनुषंगाने सदर कामाचे रक्कम रू. 2,94,291/- इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करणेत आले आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम
1.	वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील नालासोपारा (प) येथील नवीन (बी) कार्यालयाच्या (जुने प्रभाग समिती (बी) /(ई) ऑफीस) पहिल्या मजल्यावर फॉल्स सिलिंग, कारपेट व फर्निचरची कामे करणेबाबत.	फॉल्स सिलिंग, कारपेट व फर्निचर रू. 2,94,291/-

ठराव :- उपरोक्त् नमुद कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देणेत येत असून सदर कामाच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मंजूरी घेऊन् पुढील निविदा प्रक्रिया करणेस मान्यता देण्यात येत आहे.

Khandare
18/12

उप-आयुक्त प्रशासक
वसई- विरार शहर महानगरपालिका

वसई – विरार शहर महानगरपालिका

मुख्य् कार्यालय विरार (पूर्व), जि. पालघर, पिन नं. 401305
दुरध्वनी – 0250-2525101/02/03/04 05/06 , फॅक्स् – 0250-2525107
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. 269 **विभाग :** बांधकाम विभाग
दिनांक : 18/12/2020

प्रस्तावाचा विषय :- वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील नालासोपारा (प) येथील नवीन (बी) ऑफीसला (जुने प्रभाग समिती (बी) /(ई) ऑफीस) एम.एस.शेड व सिंटेक्स टाकी बसविणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- सद्यस्थितीत कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव असल्याने जुने प्रभाग समिती (ई) व (बी) कार्यायातील प्रभाग समिती (ई) चे कार्यालय वृंदावन गार्डन येथे स्थलांतरीत झाले असून प्रभाग समिती (बी) चे कामकाज जुन्या कार्यालयातच होत आहे. सद्यस्थितीत पावसाळ्यात जुन्या कार्यालयाचे भिंतींना गळती होत असल्याने इमारतीच्या बाहेरील बाजूस एम.एस.शेड उभारणे व आर.सी.सी. टाकी जिर्ण झाल्याने त्याऐवजी सिंटेक्स टाकी बसविण्याचे काम कार्यालयीन कामकाजाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. तसेच मा. आयुक्त सो. यांनी जुने प्रभाग समिती (बी/ई) या कार्यालयाची पाहणी करून सदर काम करणेबाबत निर्देश दिले आहेत.

त्याअनुषंगाने सदर कामाचे रक्कम रू. 2,98,130 /- इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करणेत आले आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम
1.	वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील नालासोपारा (प) येथील नवीन (बी) ऑफीसला (जुने प्रभाग समिती (बी) /(ई) ऑफीस) एम.एस.शेड व सिंटेक्स टाकी बसविणेबाबत.	एम.एस.शेड व सिंटेक्स टाकी बसविणे. रू. 2,98,130 /-

ठराव :- उपरोक्त् नमुद कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देणेत येत असून सदर कामाच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मंजूरी घेऊन् पुढील निविदा प्रक्रिया करणेस मान्यता देण्यात येत आहे.

Khandare

~~प्रशासक उप-आयुक्त~~
वसई- विरार शहर महानगरपालिका

वसई – विरार शहर महानगरपालिका

मुख्य् कार्यालय विरार (पूर्व), जि. पालघर, पिन नं. 401305
दुरध्वनी – 0250-2525101/02/03/04 05/06 , फॅक्स् – 0250-2525107
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. 262 **विभाग : बांधकाम विभाग**
दिनांक : 9 ~~8~~ /12/2020

प्रस्तावाचा विषय :- वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील नालासोपारा (प) येथील नवीन (बी) ऑफीसला (जुने प्रभाग समिती (बी) /(ई) ऑफीस) रंगरंगोटी करणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :-

सद्यस्थितीत कारोनाचा वाढता प्रादुर्भाव असल्याने जुने प्रभाग समिती (ई) व (बी) कार्यायातील प्रभाग समिती (ई) चे कार्यालय वृंदावन गार्डन येथे स्थलांतरीत झाले असून प्रभाग समिती (बी) चे कामकाज जुन्या कार्यालयातच होत आहे. सद्यस्थितीत जुन्या कार्यालयाचे भिंतींना रंगरंगोटी करणेचे काम कार्यालयीन कामकाजाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. तसेच मा. आयुक्त सो. यांनी जुने प्रभाग समिती (बी/ई) या कार्यालयाची पाहणी करून सदर काम करणेबाबत निर्देश दिले आहेत.

त्याअनुषंगाने सदर कामाचे रक्कम रू. 1,75,099 /- इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करणेत आले आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम
1.	वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील नालासोपारा (प) येथील नवीन (बी) ऑफीसला (जुने प्रभाग समिती (बी) /(ई) ऑफीस) रंगरंगोटी करणेबाबत.	रंगरंगोटी करणे. रू. 1,75,099 /-

ठराव :- उपरोक्त् नमुद कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देणेत येत असून सदर कामाच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मंजूरी घेऊन् पुढील निविदा प्रक्रिया करणेस मान्यता देण्यात येत आहे.

Khandare

~~प्रशासक~~ उप-आयुक्त
वसई- विरार शहर महानगरपालिका

वसई- विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), जि.- पालघर, पिन नं. 401 305
दूरध्वनी- 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. २७३ विभाग : वैद्यकीय आरोग्य
दिनांक : ३१/३२/2020

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिकेमध्ये कोरोना (कोव्हिड-१९) प्रतिबंधात्मक उपाय योजनेची तातडीने अमलबजावणी होत असल्याने महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोव्हिड-१९च्या कामकाजा करीता तात्पुरत्या स्वरुपात नियुक्त केलेल्या वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी वर्गाची सेवा समाप्त होत असल्याने कोव्हीड-१९ ची अत्यावश्यक सेवा लक्षात घेता वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी वर्गाची सेवा समाप्ती करणे व त्यांना पुढील ६ महिन्यासाठी मुतदवाढ देणेस प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात महानगरपालिकेचे सर.डी.एम.पेटीट रुग्णालय वसई व विजयनगर तुळींज रुग्णालय नालसोपारा ही २ रुग्णालये कार्यरत आहेत. तसेच विविध ठिकाणी २१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, ३ माता बाल संगोपन केंद्र व ९ दवाखाने कार्यरत आहेत. या सर्व रुग्णालयाचे/ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राचे व दवाखान्याचे कामकाज महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत पाहिले जाते. महानगरपालिकेने वैद्यकीय आरोग्य विभागाचे कामकाजासाठी आवश्यक अधिकारी/कर्मचारी वर्ग महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३(३) या मा. आयुक्त यांना असलेल्या अधिकारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात ६ महिन्यांच्या कालवधी साठी कंत्राटी पध्दतीने आवश्यक अधिकारी/कर्मचारी वर्ग दरमहा मानधनावर नियुक्त करणे कामी आवश्यक पद निर्मिती करणेस व आवश्यक ती प्रक्रिया करुन पुढील कार्यवाही करणेस तसेच महानगरपालिकेमध्ये पुर्वी पासुन कंत्राटी पध्दतीने कार्यरत असणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना या पदावर नियुक्ती कामी विहित केलेली वयोमर्यादेची अट न ठेवणेस मा. सर्वसाधारण सभा दि.१३/१२/२०१९ ठराव क्र.११ अन्वये मान्यता दिलेनुसार सदरच्या पदावर आवश्यक अधिकारी/कर्मचारी वर्ग वर्तमान पत्रात जाहिर सुचना प्रसिध्द करुन दि.२६/०२/२०२० ते २८/०२/२०२० रोजी थेट मुलाखती घेण्यांत आलेल्या होत्या तथापी याच दरम्यान कोव्हीड-१९ चा उद्रेक सुरु झाल्याने प्रतिबंधात्मक उपाययोजनेची तातडीने अमलबजावणीचे वैद्यकीय आरोग्य विभागाकडील अतितात्काळ महत्वाचे कामकाज सुरु असल्याने सर्व कर्मचारी वर्ग याकामी कार्यरत आहे. मा.आयुक्त यांनी दि.०६/०४/२०२० रोजीच्या मंजूर टिपणीन्वये कोव्हीड-१९ प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी मोठया प्रमाणात आरोग्य कर्मचाऱ्यांची आवश्यकता पडत असल्याने यास्तव मुलाखत प्रक्रियेच्या वेळी पालघर जिल्हातील व परिसरातील येण्यास तयार असलेल्या उमेदवारांना तातडीने ६ महिन्यासाठी तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यास व साथ रोग नियंत्रण कायदा १८९७ च्या अनुषंगाने व शासनाच्या दि.१४/०३/२०२० च्या आदेशान्वये सदर नियुक्ती करणेस मान्यता दिलेली आहे. तथापि कोव्हीड-१९ चा कालावधी असल्याने सदर कालावधीत कोणत्याही प्रकारच्या महानगरपालिकेच्या सभेचे आयोजन झालेले नसल्याने याकामी सदर कालावधीत अथवा तद्नंतर कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मान्यतेचा ठराव घेण्यांत आलेला नाही. यानुसार या कोव्हीड-१९ चे कामकाजासाठी मा. आयुक्त यांच्या दि.०६/०४/२०२० रोजीच्या मंजूर टिपणीन्वये दिलेल्या नियुक्ती आदेशानुसार दुसऱ्या टप्यात वैद्यकीय अधिकारी स्त्रीरोग तज्ञ रु.५७,८००/-, मायक्रोबायोलॉजीस्ट रु.१,१०,०००/-, एम.बी.बी.एस.रु.५४,७००/-, बी.ए.एम.एस. रु.३८,६००/-, बी.एच.एम.एस. रु.३५,०००/-, मोलेक्युलर सायनटिस्ट रु.४०,०००/-, जी.एन.एम. रु.३४,८००/-, ए.एन.एम. रु.१९,७००/-, फार्मासिस्ट रु.२०,८००/-, प्रयोगशाळा सहाय्यक रु.१८,७००/-, क्ष-किरण सहाय्यक रु.१८,७००/- प्रयोगशाळा तंत्रज्ञ रु.२०,७००/- या ठोक मानधनावर दि.१९/०५/२०२० ते दि.२१/१०/२०२० पर्यतच्या कालावधीत विविध दिनांकास ६ महिन्यासाठी कंत्राटी पध्दतीने हजर झालेले आहेत. यानुसार संबंधीतांपैकी वैद्यकीय अधिकारी मायक्रोबायोलॉजीस्ट-०१, वैद्यकीय अधिकारी (बी.ए.एम.एस.)-०८, वैद्यकीय अधिकारी (बी.एच.एम.एस.)-०८, जी.एन.एम.- ८९, ए.एन.एम.- १९, फार्मासिस्ट-१२, प्रयोगशाळा सहाय्यक-१४ व क्ष-किरण सहाय्यक- ०२, प्रयोगशाळा तंत्रज्ञ ०१ यांचा ६

महिन्याचा कालावधी हा दि.१८/१२/२०२० ते दि.२६/१२/२०२० या कालावधीत विविध दिनांकास समाप्त होत आहे. सबब कोव्हीड-१९ चे प्रतिबंधात्मक उपाययोजनेची कामकाजासाठी वैद्यकीय अधिकारी यांची आवश्यकता असल्याने याकामी खालील बाबीवंर निर्णय घेणे आवश्यक आहे.

१) कोव्हीड-१९ साठी ६ महिन्यांची कंत्राटी पध्दतीने किंवा कोव्हीड-१९ प्रादुर्भाव संपेपर्यत, जो कालावधी आधी घडेल तोपर्यत सेवा घेणेकामी थेट मुलाखती घेवून नियुक्त केलेला वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी या सर्व वैद्यकीय अधिकारी (मायक्रोबायोलॉजीस्ट-०१, बी.ए.एम.एस.-०८, बी.एच.एम.एस.- ०८), जी.एन.एम.- ८९, ए.एन.एम.- १९, फार्मासिस्ट-१२, प्रयोगशाळा सहाय्यक-१४ व क्ष-किरण सहाय्यक- ०२, प्रयोगशाळा तंत्रज्ञ ०१ हे दि.१९/०६/२०२० ते दि.२१/१०/२०२० या कालावधीत विविध दिनांकास ६ महिन्यासाठी कंत्राटी पध्दतीने हजर झालेले आहेत. सबब यानुसार या सर्व वैद्यकीय अधिकारी, मायक्रोबायोलॉजीस्ट, बी.ए.एम.एस., बी.एच.एम.एस., जी.एन.एम.-, ए.एन.एम., फार्मासिस्ट, प्रयोगशाळा सहाय्यक व क्ष-किरण सहाय्यक व प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांचा ६ महिन्यांचा कंत्राटी पध्दतीचा सेवा कालावधी हा दि.१८/१२/२०२० ते दि.१९/०४/२०२१ या कालावधीत विविध दिनांकास संपणार असल्याने या सर्वाचा समाप्तीचा कालावधी हा कोव्हीड-१९ चे अत्यावश्यक कामकाज सुरु असल्याने साधारणत: माहे १४ डिसेंबर २०२० रोजी या एकाच दिवशी समाप्त करणे आवश्यक आहे. व तसा संबंधीतांना सेवा समाप्तीचा आदेश निर्गमित करणे योग्य होईल.

२) तसेच वरील अ.क्र.१ मध्ये नमुद केलेल्या सर्व वैद्यकीय अधिकारी वर्गाची सेवा दि.१४/१२/२०२० रोजी समाप्त केलेनंतर त्यांना दि.१५/१२/२०२० रोजी एक दिवसांचा तांत्रिक खंड देणेस व संबंधीतांना दि.१६/१२/२०२० रोजी पासून पुढील ६ महिन्यांची कंत्राटी पध्दतीने सेवेसाठी किंवा कोव्हीड-१९ प्रादुर्भाव संपेपर्यत, जो कालावधी आधी घडेल तोपर्यत सेवा सुरु ठेवणेस मुदतवाढ देणे आवश्यक आहे. व तसा संबंधीतांना कामकाजकरणे कामी मुदतवाढीचा आदेश निर्गमित करणे योग्य होईल. यानुसार वरील अ.क्र. १ ते २ च्या बाबीसाठी मान्यतेची आवश्यकता असल्याने सदरच्या बाबी प्रशासकीय व वित्तीय मान्यतेस्तव सादर.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाअंतर्गत कोव्हीड-१९ साठी ६ महिन्यांची कंत्राटी पध्दतीने किंवा कोव्हीड-१९ प्रादुर्भाव संपेपर्यत, जो कालावधी आधी घडेल तोपर्यत सेवा घेणेकामी थेट मुलाखती घेवून नियुक्त केलेल्या या सर्व वैद्यकीय अधिकारी (मायक्रोबायोलॉजीस्ट-०१, बी.ए.एम.एस.-०८, बी.एच.एम.एस.- ०८), जी.एन.एम.- ८९, ए.एन.एम.- १९, फार्मासिस्ट-१२, प्रयोगशाळा सहाय्यक-१४ व क्ष-किरण सहाय्यक- ०२, प्रयोगशाळा तंत्रज्ञ ०१ हे दि.१९/०६/२०२० ते दि.२१/१०/२०२० या कालावधीत विविध दिनांकास ६ महिन्यासाठी कंत्राटी पध्दतीने हजर झालेले आहेत. सबब यानुसार या सर्व वैद्यकीय अधिकारी (मायक्रोबायोलॉजीस्ट, बी.ए.एम.एस., बी.एच.एम.एस.), जी.एन.एम., ए.एन.एम., फार्मासिस्ट, प्रयोगशाळा सहाय्यक, क्ष-किरण सहाय्यक व प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांचा ६ महिन्यांचा कंत्राटी पध्दतीचा सेवा कालावधी हा दि.१८/१२/२०२० ते दि.१९/०४/२०२१ या कालावधीत विविध दिनांकास संपणार असल्याने या सर्वाचा समाप्तीचा कालावधी हा कोव्हीड-१९ चे अत्यावश्यक कामकाज सुरु असल्याने साधारणत: माहे १४/१२/२०२० रोजी या एकाच दिवशी समाप्त करणेस व दि.१५/१२/२०२० रोजी १ दिवसाचा तांत्रिक खंड देण्यास तसेच कोव्हिड-१९ चे कामकाजाची अत्यावश्यकता लक्षात घेवून या सर्व मायक्रोबायोलॉजीस्ट-०१, बी.ए.एम.एस.-०८, बी.एच.एम.एस.- ०८, जी.एन.एम.- ८९, ए.एन.एम.- १९, फार्मासिस्ट-१२, प्रयोगशाळा सहाय्यक-१४ व क्ष-किरण सहाय्यक- ०२, प्रयोगशाळा तंत्रज्ञ ०१ यांना दि.१६/१२/२०२० पासून पुढील ६ महिन्यांच्या कंत्राटी पध्दतीने सेवेसाठी किंवा कोव्हीड-१९ प्रादुर्भाव संपेपर्यत, जो कालावधी आधी घडेल तोपर्यत सेवा सुरु ठेवणेस मुदतवाढ देणेत येत आहे. वरील सर्व कामकाजासाठी येणाऱ्या संपूर्ण खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यात येत आहे.

(गंगाथरन डी.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका
प्रभाग समिती जी

प्रशासकिय ठराव क्र २७४ दिनांक- १४/१२/२०२०

प्रस्तावावा विषय : प्रभाग समिती जी वालीव अंतर्गत येणारे तलाव ठेका पध्दतीने मत्स्य बीज शेती करण्यासाठी लिलाव द्वावारे तीन वर्षाकरीता ठेका पध्दती ने देणे बाबत.

प्रस्तावाचा मजकुर : सादर करण्यात येते की, वसई-विरार शहर महागरपालिका विभागीय कार्यालय वालीव प्रभाग समिती जी अंतर्गत येणाऱ्या खालील तलावामध्ये मत्स्यबीज सोडुन मासळी मारणेचा जाहीर लिलाव हा तीन वर्षाकरीता तलावात मासळीसोडुन मासळी मारणे साठी सन २०२१ ते२०२४ पर्यत जाहीर लिलाव द्वारे ठेकेदारास देणे आवश्यक वाटते.त्याकरीता मागील वर्षाच्या रक्कमे मध्ये १० टक्केवाढ या प्रमाणे गृहीत धरुन किमान देकार लिलाव खालिल प्रमाणे अपेक्षीत आहे.

अक्र	तलावा चे नाव	मागील वर्षाचा कालावधी	मागील मंजुर रक्कम	१० टक्के वाढ करुन येणारी रक्कम	सन २०२१ ते २०२४ पर्यत येणारी रक्कम	लिलाव प्रक्रिया न होण्याचे कारणे
१	वालीव तलाव	२०१८-१९	३,५२,५००/-	३५२५०/-	४,६९,१७८/-	कोविड-१९ मुळे तलाव लिलाव झाला नाही.
२	सातिवली तलाव	२०१०-१३	८०००/-	८००/-	१०६४८/-	सदर तलावाचे सुशो भिकरण केल्यामुळे तलाव लिलाव करत नाही.
३	गांधी तलाव ,जुचंद्र	२०१४-१५	१,३५,७५०/-	१३५७५/-	१८०६८/-	सन २०१५-१६ त्यानंतरचा तलाव लिलाव कोर्टतदावा असल्याने तलाव लिलाव केला नाही.
४	गोडे तलाव ,जुचंद्र	२०१२-१३	५६,५००/-	५६५०/-	७५२०२/-	सन २०१३-२०१४ नंतर तलावाचे सुशोभिकरण केल्यामुळे तलाव लिलाव झालेला नाही.
५	पिराचा तलाव,कामण	२०१४-१५	७३,५००/-	७३५०/-	९७२०२/-	सदर तलावाचे सुशोभिकरणाचे काम सुरु असल्याने तलाव लिलाव केलेला नाही.
६	कसराचा तलाव, कामण	२०१४-१६	२३,१००/-	२३१०	३०७४६/-	सदर तलावाचा गाळ काढण्याचा प्रस्ताव असल्याने लिलाव झाला नाही
७	आंबे तलाव, कामण	२०१९-२०	२१,७००/-	२१७०/-	२८८८३/-	कोविड-१९ मुळे तलाव लिलाव झाला नाही.
८	सोनु देवी तलाव, राजवली	२०१५-१६	२५,१०१/-	२५१०/-	३३४०९/-	सन २०१७ ते २०१९ मध्ये निविदा प्रक्रिया पुर्ण झाली नाही. त्यानंतर कोविड-१९ मुळे तलाव लिलाव झाला नाही.
९	पिराचा तलाव , राजावली	२०१५-१६	४२,५००/-	४२५०/-	५६५६८/-	सन २०१७ ते २०१९ मध्ये निविदा प्रक्रिया पुर्ण झाली नाही. त्यानंतर कोविड-१९ मुळे तलाव लिलाव झाला नाही.
१०	वनीचा तलाव, राजवली	२०१५-१६	९२,९५०/-	९२९५/-	१२३७१६/-	सन २०१७ ते २०१९ मध्ये निविदा प्रक्रिया पुर्ण झाली नाही. त्यानंतर कोविड-१९ मुळे तलाव लिलाव झाला नाही.
११	गावदेवी तलाव, राजावली	२०१५-१६	२१६०००/-	२१६००/-	२८७४९६/-	सन २०१७ ते २०१९ मध्ये निविदा प्रक्रिया पुर्ण झाली नाही. त्यानंतर कोविड-१९ मुळे तलाव लिलाव झाला नाही.
१२	गोख्रिवरे	२००८-९	७००००/-			सदर एम.एम.आर डी .ए.च्या रोड मध्ये तलावाचा आकारकमी झाल्यामुळे व सुशोभिकरणाचा प्रस्ताव असल्यामुळे तलाव लिलाव होत नाही.

उपरोक्त तलावा पैकी अनु क्र १२ हे तलाव सन २००८ ते २००९ तीन वर्षाकरीता देण्यात आले होते . त्यानंतर सदर तलावाचे एम.एम.आर डी .ए.च्या रोड मध्ये तलावाचा आकारमान कमी झाल्यामुळे मत्स्यपालन लिलाव बंद केले असल्यामुळे लिलाव करणे उचित नाही.

उपरोक्त सर्व तलावांची मंजुर रक्कम पाहता सर्व नमुद तलाव हे सन २०२१ ते २०२४ या तीन वर्षाकारीता ठेका पध्दतीने देणे सोयीचे होईल. अनु क्रमाक १ या तलावाची रक्कम तीन

लाखा पेक्षा जास्त असल्या कारणाने ई-निविदा मागविणेस व उर्वारित अनु क्र २ ते ११ या तलावांची रक्कम तीन लाख पेक्षा कमी असल्या कारणाने प्रभाग समिती स्तरावरदर पत्रक मागवीणेस व महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर व नोटीस बोर्डवर प्रसिध्द करुन लिलाव प्रक्रिया करीता होणा-या खर्चास प्रशासकिय व वित्तीय शिफारस आहे.

निर्णय : प्रस्तावातील नमुद तलाव मत्स्यसंवर्धनासाठी सन २०२१ते २०२४ या तीन वर्षाकरीता प्रतिवर्षी १०% वाढीने ठेका पध्दतीने देणेस व त्यावर नियमानुसार जी.एस.टी आकारुन ई-निविदा प्रक्रिया करणे व दरपत्रक मागविणेस प्रशासकिय मान्यता देत आहे.

मा. आयुक्त

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. २७५ विभाग :- सार्व. बांधकाम
दिनांक :- २४ / १२/२०२०

प्रस्तावाचा विषय :- वसई - विरार शहर महानगरपालिका पाणी पुरवठा योजनेच्या जलशुध्दीकरण केंद्रामधील क्लॅरिफ्लॉक्युलेटर ब्रीज (CLF Bridge) बदलणे व नव्याने बसवुन कार्यान्वीत करणे.

प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

अंदाजीत रक्कम :- रु. १,२८,३९,२२० /-

कामाची आवश्यकता :- वसई विरार शहर महानगरपालिकेस सुर्या योजना टप्पा १ व ३ अंतर्गत २०० द.ल.ली व उसगाव योजनेअंतर्गत २० द.ल.ली असा एकूण २२० द.ल.ली पाणी पुरवठा होत आहे. सदर योजनेपैकी उसगाव योजना ही सन १९९६ मध्ये व सुर्या योजना टप्पा १ ही सन २००४ मध्ये कार्यान्वीत करण्यात आली आहे. योजनेअंतर्गत जलशुध्दीकरण केंद्र असुन त्यामध्ये जलशुध्दीकरण करण्याकरीता क्लॅरिफ्लॉक्युलेटर (CLF) असतात. सदर CLF मध्ये ॲलम व क्लोरीनची डोसिंग करण्यात येऊन पाण्याची गढुळता (Turbidity) कमी करण्यात येते. सदर पाण्याची गढुळता कमी करुन पाण्यातील गाळ हा CLF च्या खालच्या बाजूस जमा होतो व (Settle Water) चांगले पाणी वरच्या बाजुच्या चॅनल मधून फिल्टर हाऊस कडे येते.

क्लॅरिफ्लॉक्युलेटर मधील पाण्यात ॲलम सर्वत्र मिसळण्यासाठी तसेच खाली जमा झालेला गाळ दररोज काढण्यासाठी पॅडल्सरहीत ब्रीज क्लॅरिफ्लॉक्युलेटर मध्ये बसविलेले असतात. सदरच्या ब्रीजचे कार्यचलन हे पाणी शुध्दीकरणासाठी अत्यंत आवश्यक असते.

सुर्या टप्पा १ योजने अंतर्गत धुकटण येथील २ दोनही ब्रीज व उसगाव योजनेअंतर्गत पारोळ येथील १ ब्रीज हे सद्य:स्थितीत पुर्णपणे नादुरुस्त असुन त्यास १५ वर्षापेक्षा जास्त कालावधी उलटुन गेला आहे. त्यामुळे सदरचे ब्रीज हे गंजले असुन वारंवार नादुरुस्त होत असल्याने ते बदलणे आवश्यक आहे. त्याकरीताचे दर म.जी.प्रा. दरसुची मध्ये उपलब्ध नसुन बाजारभाव मागविले असता प्राप्त लघुत्तम दराच्या अनुषंगाने अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन रक्कम रु. १,२८,३९,२२०/- (GST सह) इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च हा **"वि.नि.अ. सुर्या योजना भांडवली कामे"** या लेखाशिर्षाअंतर्गत भागविणे शक्य आहे.

तरी विषयांकीत कामासाठी बी/१ प्रकारची ई - निविदा मागविण्यास तसेच अनुषंगीक खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता आवश्यक आहे.

लेखाशिर्ष व तरतूद :- " वि.नि.अ सुर्या योजना भांडवली कामे"

वसई - विरार शहर महानगरपालिका पाणी पुरवठा योजनेच्या जलशुध्दीकरण केंद्रामधील क्लॅरिफ्लॉक्युलेटर ब्रीज (CLF Bridge) बदलणे व नव्याने बसवुन कार्यान्वीत करणे कामी बी/१ प्रकारची ई - निविदा मागविण्यास तसेच रक्कम रु. १,२८,३९,२२०/- (GST सह) होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त तथा प्रशासक साो. यांच्या मान्यतेस्तव सादर.

ठराव :- वसई - विरार शहर महानगरपालिका पाणी पुरवठा योजनेच्या जलशुध्दीकरण केंद्रामधील क्लॅरिफ्लॉक्युलेटर ब्रीज (CLF Bridge) बदलणे व नव्याने बसवुन कार्यान्वीत करणे कामी बी/१ प्रकारची ई - निविदा मागविण्यास तसेच रक्कम रु. १,२८,३९,२२०/- (GST सह) होणाऱ्या खर्चास मा.आयुक्त तथा प्रशासक साो, यांची प्रशासकीय व वित्तीय मंजूरी असे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. २७६ विभाग :- सार्व. बांधकाम
दिनांक :- ४३ /१२ /२०२०

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती "जी" मधील वॉर्ड नं. ७७ मध्ये फादरवाडी येथे जानकीपाडा ते विद्याविकासीनी शाळे पर्यंतचा रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे व पाईप गटार बांधणे.

प्रस्तावाचा मजकूर :-

अंदाजपत्रकीय रक्कम	:-	रु. १,१४,८९,१६३/- (पाईप गटार वगळुन रु. ९५,८२,५८३/-)
प्रशासकीय मान्यता (महानगरपालिका)	:-	मा. सर्वसाधारण सभा वि/ ठराव क्र. दि. / /
तांत्रिक मान्यता	:-	I/१२/११०/२०१९-२० दि. ०७/११/२०१९
तांत्रिकमान्यते अंती अंदाजपत्रकीय रक्कम	:-	रु. १,१४,८९,१६३/-
ई - टेंडरींग द्वारे निविदा सुचना प्रसिद्धी	:-	जा.क्र. वविशम/शअ/बांध/८४७/२०१९ दि. २०/१२/२०१९
वृत्तपत्रातील प्रथम वेळ जाहिर निविदा	:-	दै. आपला महासागर, दै. फ्रि प्रेस जर्नल, दै. प्रात:काल, दै. मिड डे, दै. प्रहार, दै. जाकरुक
ई - टेंडरींग द्वारे निविदा प्रसिद्धी	:-	टाईस्म, दै. पुर्णविराम दि. २५/१२/२०१९
ई - टेंडरींग द्वारे निविदा उघडण्याची दिनांक (प्रथम लखोटा)	:-	दि. १८/०१/२०२०
विहीत मुदतीत ऑनलाईन प्रक्रियेद्वार प्राप्त निविदा	:-	०४
ई - टेंडरींग द्वारे निविदा उघडण्याची दिनांक (व्दितीय लखोटा)	:-	०४/०३/२०२०
प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी	:-	मा. शहर अभियंता
विहीत मुदतीत ऑनलाईन प्रक्रियेद्वारे	:-	०३

प्राप्त निविदा निविदासमिती पुढे उघडल्या असता त्याचे दर खालीलप्रमाणे आहेत.

अ.क्र	निविदा धारकाचे नाव	निविदा दर
१	**मे. बालाजी कंन्स्ट्रक्शन**	**अंदाजपत्रकीय दराने (वाटाघाटी अंती २% कमी दराने)**
२	मे. आकाश एंटरप्रायजेस	४.४४% जादा दराने
३	मे. एकता कंन्स्ट्रक्शन	३.९९% जादा दराने

उपरोक्त निविदांची तुलना केली असता, **मे. बालाजी कंन्स्ट्रक्शन** यांच्या निविदेतील दर हा अंदाजपत्रकीय दरापेक्षा **२.००% कमी** दराचा असुन सदरचा देकार हा कमी व वाजवी आहे. सदर निविदेकरीता निविदा समितीने दि. / / २०२० रोजीच्या बैठकीत मंजुरीकरीता शिफारस केलेली आहे.

मे. बालाजी कंन्स्ट्रक्शन यांनी दिलेला देकार योग्य व वाजवी असल्यामुळे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार **मे. बालाजी कंन्स्ट्रक्शन** यांच्याशी कामाची संविदा करणेस मान्यता देणेसाठी व वित्तीय मान्यतेस्तव मा.आयुक्त तथा प्रशासक साो, यांच्या मान्यतेस्तव सादर.

ठराव :- उपरोक्त कामी **मे. बालाजी कंन्स्ट्रक्शन** यांच्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा **२.००% कमी** दराच्या निविदेस निविदा समितीने मान्यता दिली असून महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम ७३ (क) अन्वये मा. आयुक्त साो. यांनी मंजूरी दिली आहे. सदर कामी मनपा तर्फे कायदेशिर बाबींची पुर्तता करुन संविदा करण्यास मा.आयुक्त तथा प्रशासक साो, यांची मंजूरी असे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई- विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), जि.- पालघर, पिन नं. 401 305
दूरध्वनी- 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. २७७ विभाग : वैद्यकीय आरोग्य
दिनांक :२५/१२/2020

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या नव्याने बांधलेल्या सर.डी.एम.पेटीट रुग्णालयातील इमारतीमध्ये सेंट्रल ऑक्सिजन पाईप लाईन फिटिंग साहित्या सह करणेबाबत येणाऱ्या खर्चास प्रशासकिय मंजुरी मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेचे नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, रुग्णालये, माताबाल संगोपन केंद्रे व दवाखान्यांचे कामकाज वैद्यकीय आरोग्य विभागाकडून पाहिले जाते. या पार्श्वभूमीवर वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोरोना विषाणू संबंधी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेकरीता अलग कक्ष व विलगीकरण कक्ष स्थापन करण्यात आले असून कोरोना (COVID-19) या विषाणूच्या संसर्गात दिवसेंदिवस वाढ होत आहे. या कामी गोन्सालो गार्सिया कॉलेज, वसई येथे समर्पित कोविड-१९ रुग्णालय, कौलसिटी रुग्णालय, वसई (प.), अग्रवाल हॉस्पिटल-वसई पुर्व, वरुण इंडस्ट्रियल ईस्टेट, वसई (पू) व चंदनसार येथिल श्री जिवदानी देवी रुग्णालय येथे विलगीकरण कक्ष, तसेच म्हाडा बिल्डींग नं.१० येथे कोवीड केअर सेंटर स्थापन करण्यात आले आहेत.

कोरोना बाधित रुग्णांना वैद्यकीय उपचारा दरम्यान नियमित ऑक्सिजन देण्याची गरज भासत आहे. मे. लिओ ऑक्सिजन, वसई (प) यांनी दाखल केलेली ई-निविदा मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.४७ दि.१८/०६/२०१९ अन्वये मंजूर असून सदर निविदेस मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.१३ दि.१६/०३/२०२० अन्वये मुदतवाढ देण्यात आली असून मे.लिओ ऑक्सिजन, वसई यांच्यामार्फत सद्यस्थितीत कार्यक्षेत्रातील सर्व रुग्णालयांना ऑक्सिजन सिलिंडर रिफिलिंग सेवा पुरविली जात होती परंतू कोवीड-१९ संसर्ग झालेल्या रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेता सदर निविदाधारकावर ऑक्सिजन सेवा पुरविणेकामी अतिरिक्त भार असल्यामुळे ऑक्सिजन सेवा नियमितपणे व आवश्यकतेनुसार न पुरविल्यामुळे त्यांची मंजुर निविदा प्रशासकिय ठराव क्र.१०७ दि.१८/०९/२०२० अन्वये रद्द करण्यात आली असून उत्पादक कंपनी मे.स्पिड ट्रेडिंग इंटरप्रायझेस, नालासोपारा (पूर्व) यांना जा.क्र.वविशम/वैआवि/१०६२/२०२० दि.१८/०९/२०२० अन्वये ऑक्सिजन सिलिंडर रिफिलिंग करणेकामी पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. सदर उत्पादकामार्फत ऑक्सिजन सिलिंडर रिफिलिंगसह सेवा सुरळितपणे चालू आहे सर.डी.एम.पेटीट रुग्णालय, वसई, येथिल नविन इमारतीमध्ये सेंट्रल ऑक्सिजन पाईपलाईन यंत्रणा नव्याने बसविणे आवश्यक आहे. सदर

कामी अंदाजे अपेक्षित खर्च रक्कम रु.६,५०,०००/- इतका असून तातडीची बाब लक्षात घेता ऑक्सिजन पाईप लाईन यंत्रणेचे काम त्वरीत करणे आवश्यक आहे.

तरी नमुद रुग्णालयात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम सन १९४९ कलम ६७ (३) क अन्वये मा. आयुक्त सो. यांना असलेल्या अधिकारानुसार वसई रुग्णालयातील नविन इमारतीत सेंट्रल ऑक्सिजन पाईप लाईन यंत्रणेचे काम करणेकामी अपेक्षित खर्च रक्कम रु.६,५०,०००/- इतका असून सन २०२०-२१ या वित्तिय वर्षात "ऑक्सिजन सिलिंडर रिफिंलीगसह अन्य रुग्णालयीन उपकरणे खरेदी व देखभाल दुरुस्ती" या लेखाशिर्षाखाली नमुद तरतुदीमधून भागवीता येणे शक्य होणार आहे. तरी नविन सेंट्रल ऑक्सिजन पाईप लाईन यंत्रणा व सद्यस्थितीत असलेली ऑक्सिजन पाईपलाईन यंत्रणा अद्यावत करणेकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास प्रशासकिय मान्यता मिळणेस्तव सादर.

ठराव :- सदर ठिकाणी सर.डी.एम.पेटीट रुग्णालय, वसई, येथिल नविन इमारतीमध्ये सेंट्रल ऑक्सिजन पाईपलाईन यंत्रणा नव्याने बसविणे आवश्यक आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) (क) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार येणाऱ्या रक्कम रु.६,५०,०००/- (अक्षरी- रुपये सहा लाख पन्नास हजार मात्र) खर्चास प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे.

(गंगाथरन.डी)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई- विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), जि.- पालघर, पिन नं. 401 305
दूरध्वनी- 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. २७८ विभाग : वैद्यकीय आरोग्य

दिनांक :१५/१२/2020

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या नव्याने बांधलेल्या सर.डी.एम. पेटीट रुग्णालयातील इमारतीमध्ये सेंट्रल ऑक्सिजन पाईप लाईन फिटिंग साहित्यासह करणेस प्राप्त झालेल्या दरपत्रकास वित्तिय मंजुरी व कार्यादेश देणेकामी मान्यतेस्तव सादर.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेचे नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, रुग्णालये, माताबाल संगोपन केंद्रे व दवाखान्यांचे कामकाज वैद्यकीय आरोग्य विभागाकडून पाहिले जाते. या पार्श्वभूमीवर वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोरोना विषाणू संबंधी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेकरीता अलग कक्ष व विलगीकरण कक्ष स्थापन करण्यात आले असून कोरोना (COVID-19) या विषाणूच्या संसर्गात दिवसेंदिवस वाढ होत आहे. या कामी गोन्सालो गार्सिया कॉलेज, वसई येथे समर्पित कोविड-१९ रुग्णालय, कौलसिटी रुग्णालय, वसई (प.), अग्रवाल हॉस्पिटल-वसई पुर्व, वरुण इंडस्ट्रियल ईस्टेट, वसई (पू) व चंदनसार येथिल श्री जिवदानी देवी रुग्णालय येथे विलगीकरण कक्ष, तसेच म्हाडा बिल्डींग नं.१० येथे कोवीड केअर सेंटर स्थापन करण्यात आले आहेत.

कोरोना बाधित रुग्णांना वैद्यकीय उपचारा दरम्यान नियमित ऑक्सिजन देण्याची गरज भासत आहे. मे.लिओ ऑक्सिजन, वसई (प) यांनी दाखल केलेली ई-निविदा मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.४७ दि.१८/०६/२०१९ अन्वये मंजूर असून सदर निविदेस मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.१३ दि.१६/०३/२०२० अन्वये मुदतवाढ देण्यात आली असून मे.लिओ ऑक्सिजन, वसई यांच्यामार्फत सद्यस्थितीत कार्यक्षेत्रातील सर्व रुग्णालयांना ऑक्सिजन सिलिंडर रिफिलिंग सेवा पुरविली जात होती परंतू कोवीड-१९ संसर्ग झालेल्या रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेता सदर निविदाधारकावर ऑक्सिजन सेवा पुरविणेकामी अतिरिक्त भार असल्यामुळे ऑक्सिजन सेवा नियमितपणे व आवश्यकतेनुसार न पुरविल्यामुळे त्यांची मंजुर निविदा प्रशासकिय ठराव क्र.१०७ दि.१८/०९/२०२० अन्वये रद्द करण्यात आली असून उत्पादक कंपनी मे.स्पिड ट्रेडिंग इंटरप्रायझेस, नालासोपारा (पूर्व) यांना जा.क्र.वविशम/वैआवि/१०६२/२०२० दि.१८/०९/२०२० अन्वये ऑक्सिजन सिलिंडर रिफिलिंग करणेकामी पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. सदर उत्पादकामार्फत ऑक्सिजन सिलिंडर रिफिलिंगसह सेवा सुरळितपणे चालू आहे. सर.डी.एम.पेटीट रुग्णालय, वसई, येथिल नविन इमारतीमध्ये सेंट्रल ऑक्सिजन पाईपलाईन यंत्रणा नव्याने बसविणे आवश्यक आहे. सदर कामी होणाऱ्या रक्कम रु.६,५०,०००/- या खर्चास प्रशासकिय ठराव क्र.२६८

दि.१५/१२ /२०२० नुसार प्रशासकिय मंजुरी मिळालेली असून त्याअन्वये मे.स्पिड ट्रेडिंग इंटरप्रायझेस, नालासोपारा (पूर्व) यांच्याकडून दरपत्रक प्राप्त झालेले असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे

अ.क्र.	कामाचा तपशिल	कामाचे ठिकाण	एकूण खर्च (सर्व करारसहित)	सवलती नंतरचा एकूण खर्च
१)	1) 15mm Copper Pipeline 0.9mm 2) 12 mm Copper Pipeline 0.9mm 3) Medical Gas Outlets Downloaded SSV 4) 15 mm Isolation Valve 5) BPC Flow meter with Humidifier Bottle & L Type Adapter 6) 5 x 5 Manifold with Flexible tail pipe & NRV for Oxygen Panel 7) 1 x 1 Manifold with 3 meter. Flexible tail Pipe for Cryogenic Cylinder. 8) Area Gas Alarm Single Gas (Analogue) 9)Double Stage Double Gauge Regulator for Oxygen 10) Semi- Automatic Control Panel for Oxygen	सर.डी.एम.पेटीट रुग्णालय, वसई	रु.६,४५,५४९/-	रु.६,२६,१८३/-
		एकूण	रु.६,४५,५४९/-	रु.६,२३,१८३/-

तरी उपरोक्त ऑक्सिजन पाईप लाईन यंत्रणेचे काम करणेकामी रक्कम रु.६,२३,१८३/- खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च सन २०२०-२१ या वर्षाकरीता "ऑक्सिजन सिलिंडर रिफिलीगसह अन्य रुग्णालयीन उपकरणे खरेदी व देखभाल दुरुस्ती" या लेखाशिर्षाखाली तरतुदीमधून भागविता येणे शक्य होणार आहे. त्यानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ५९ पोटकलम ५ (२)(२) अन्वये मा.आयुक्त सो. यांना प्राप्त असलेल्या अधिकारानुसार मे.स्पिड ट्रेडिंग इंटरप्रायझेस, नालासोपारा (पूर्व) यांच्याकडून विनानिविदा उपरोक्त काम करण्यास होणाऱ्या रक्कम रु.६,२३,१८३/- खर्चास वित्तिय मंजुरी व संबंधित ठेकेदारास कार्यादेश देणेकामी मंजुरीस्तव सादर.

ठराव :- सदर सर.डी.एम.पेटीट रुग्णालय, वसई, येथिल नविन इमारतीमध्ये सेंट्रल ऑक्सिजन पाईपलाईन यंत्रणा नव्याने बसविणे आवश्यक आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ५९ पोटकलम ५ (२)(२) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार येणाऱ्या रक्कम रु.६,२३,१८३/- (अक्षरी- रुपये सहा लाख तेवीस हजार एकशे त्र्याऐंशी मात्र) खर्चास वित्तिय मान्यता व मे.स्पिड ट्रेडिंग इंटरप्रायझेस, नालासोपारा (पूर्व) यांना कार्यादेश देणेकामी मंजुरी देण्यात येत आहे.

(गंगाथरन.डी)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई- विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं.४०१३०५
दूरध्वनी – ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स- ०२५०-२५२५१०७,
ई-मेल **vasaivirarcoporation@yahoo.com**

प्रशासकीय ठराव क्र.:- २७८

विभाग : जाहिरात विभाग
दिनांक :१६/१२ /२०२०

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका जाहिरात विभागाचे ऑनलाईन ई- निविदा काढणे व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत.

संदर्भ :- १) सर्वसाधारण सभा ठराव क्र.२३ दि.१९/१२/२०१३ अन्वये प्रस्तावास मंजुरी.

२) स्थायी समिती ठराव क्र.४८४ दि.१२/१/२०१८ अन्वये निविदेस मंजुरी.

३) मे. विजास डिजिटल इं. प्रा.लि. मुंबई यांस वविशम/साप्रवि/३३/२०१८-१९ नुसार दि.१७/०४/२०१८ कामाचा कार्यादेश.

४) वविशम यांचे दि.२४/०९/२०२०, १९/१०/२०२०, १८/११/२०२० रोजीची वसुली नोटीस.

५) वविशम जाहिरात विभाग यांचा निविदा रद्द करणेबाबात प्रशासकीय ठराव क्र.२२८ दि.१८/११/२०२०.

६) वविशम जाहिरात विभाग यांचा निविदा दर निश्चित करणेबाबत प्रशासकीय ठराव क्र.२६० दि. ०९/ १२/२०२०.

प्रस्तावाचा मजकुर :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २४४,२४५,३८६ अन्वये मुंबई प्रांतिक महानगरपालिका (जाहिरात व फलक नियंत्रण) नियम २००३ नुसार महानगरपालिका कार्यक्षेत्रातील आकाशचिन्ह व दृश्य भागातील जाहिराती यांचे नियंत्रण करणे, तसेच त्यांना कर/ फी लावणे यांचे अधिकार प्राप्त आहेत. वरील संदर्भ क्र.१ अन्वये महापालिकेच्या जाहिरात धोरणास व त्याच्या अंमलबजावणीस मान्यता देण्यात आली आहे. संदर्भ क्र.२ अन्वये मा. स्थायी समितीने जाहिरात निविदेस मान्यता दिलेली असून संदर्भ क्र.३ अन्वये निविदाधारकास कार्यादेश देण्यात आलेला असून सदर निविदा /करारनामा अनुषंगाने त्यांनी रु.१,४४,०८,०००/- जाहिरात शुल्काचा भरणा केलेला नाही जाहिरात शुल्क सनदी लेखापाल यांनी प्रमाणित करुन दिले आहे.

तरी सदर निविदाधारकांस संदर्भ क्र.४ अन्वये जाहिरात शुल्क भरणेकरिता नोटीस बजविण्यात आले असुन त्यांनी निविदेची रक्कम भरणा केली नाही, तसेच समाधानकारक खुलासा सादर केलेला नाही त्यामुळे संदर्भ क्र.५ अन्वये प्रशासकीय ठराव मंजुर करुन निविदाधारकाची निविदा रद्द करणेची कार्यवाही करणेत आली आहे. महानगरपालिकेचे क्षेत्रातील जाहिरातीचे (विविध भागात होर्डिंग्ज व अन्य प्रकारच्या जाहिराती) सर्वेक्षण करुन जाहिरातीचे नविन स्त्रोत उपलब्ध करण्याकरीता व उत्पन्नात

वाढ होणा-या दृष्टीने प्रभाग समिती स्तरावर केलेल्या सर्वेक्षणाच्या अहवालानुसार नविन उत्पन्न वाढीच्या दृष्टीकोनातुन जाहिरात विभागाकडून महानगरपालिका क्षेत्रातील मनपाच्या मालकीच्या जागेवर जाहिरात आकाशचिन्ह(होर्डिंग्ज), किऑक्स, ॲडपोल, कमानी इ. संरचना (स्ट्रक्चर) उभारुन जाहिरात करणेकामी ऑनलाईन प्रक्रियेने प्रभाग समिती निहाय ई-निविदा करणे आवश्यक आहे त्याकरिताची अंदाजपत्रकीय रक्कम, फॉर्म फी, इसारा रक्कम खालीलप्रमाणे :-

अ.क्र	प्रभागाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम	फॉर्म फी	इसारा रक्कम
१	प्रभाग समिती (अे)	९,६१,०२,५३२/-	१७,७००/-	९,६१,०२५/-
२	प्रभाग समिती (बी)	३,४५,४९,४०६/-	१७,७००/	३,४५,४९४/-
३	प्रभाग समिती (सी)	१,३१,१२,५११/-	१७,७००/	१,३१,१३५/-
४	प्रभाग समिती (डी)	३,३५,६९,५०६/-	१७,७००/	३,३५,६९५/-
५	प्रभाग समिती (ई)	४,४५,२४,५२६/-	१७,७००/	४,४५,२४५/-
६	प्रभाग समिती (एफ)	१,४०,९३,४१२/-	१७,७००/	१,४०,९३४/-
७	प्रभाग समिती (जी)	१,८४,२६,९५२/-	१७,७००/	१,८४,२७०/-
८	प्रभाग समिती (एच)	१४,७३,२६,८०९/-	१७,७००/	१४,७३,२६८/-
९	प्रभाग समिती (आय)	८,४८,४०,४४६/-	१७,७००/	८,४८,४०५/-

तरी सदरील प्रभाग निहाय ई- निविदा सन २०२०-२०२१ ते २०२५-२०२६ या ६२ महिन्यांच्या कालावधीकरीता काढण्यात येणेकामी प्रशासकीय मंजुरीसाठी मा.आयुक्त तथा प्रशासक यांचेकडे मान्यतेस्तव सविनय सादर.

<u>प्रस्तावाचा ठराव</u> :- **वसई विरार शहर महानगरपालिकेच्या जाहिरात विभागाकडून महानगरपालिका क्षेत्रातील मनपाच्या मालकीच्या जागेवर आकाशचिन्ह (होर्डिंग्ज),किऑक्स, ॲडपोल, कमानी उभारुन जाहिरात करणेकामी प्रस्तावातील अंदाजपत्रकीय तक्त्यानुसार सन २०२०-२०२१ ते २०२५-२०२६ या ६२ महिन्याच्या कालावधीकरिता ई- निविदा काढणेकामी याव्दारे आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.**

16/12/2020.

आयुक्त तथा प्रशासक

वसई विरार शहर महानगरपालिका

वसई- विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), जि.- पालघर, पिन नं. 401 305
दूरध्वनी- 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. २८०

विभाग : वैद्यकीय आरोग्य
दिनांक : ३६/३२/2020

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील श्री जिवदानी देवी रुग्णालय, चंदनसार येथे कोवीड संक्रमित रुग्णांकरीता शस्त्रक्रिया विभाग व प्रसुति विभाग नव्याने सुरु करणेकामी प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेचे रुग्णालये, नागरी आरोग्य केंद्रे, माताबाल संगोपन केंद्रे, दवाखाने व कोवीड रुग्णालयांचे कामकाज वैद्यकीय आरोग्य विभागाकडून पाहिले जाते. सद्यस्थितीत देशभरात कोरोना (COVID-19) या विषाणूच्या संसर्गाचा प्रादुर्भाव झपाटयाने वाढत आहे. या पार्श्वभूमीवर वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात चंदनसार येथे १५० खाटांचे श्री जिवदानी देवी रुग्णालय सुरु करण्यात आलेले आहे. कोरोना संक्रमित गरोदर मातांची नैसर्गिक प्रसुति तसेच आवश्यकतेनुसार सिजरियनद्वारे शस्त्रक्रिया करणेकामी स्वतंत्र विभाग असणे गरजेचे आहे. कोरोना विषाणूंचा संसर्ग व प्रादुर्भाव पसरण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर नियंत्रण करणे व कोरोना विषाणूचा संसर्ग असल्यास त्यात अधिक वाढ होऊ न देता त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेकामी चंदनसार येथिल श्री जिवदानी देवी रुग्णालयात कोविड रुग्णांकरीता शस्त्रक्रिया विभाग व प्रसुति विभाग नव्याने सुरु करणे आवश्यक आहे.

सन २०१९-२०२० या वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका अंतर्गत सर्व दवाखाने, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, माताबाल संगोपन केंद्रे व रुग्णालयांकरीता उपकरणे, सर्जिकल साहित्य व तद्अनुषंगीक उपभोग्य वस्तू खरेदी करणेकामी ई-निविदा मागविण्यात आलेली असुन सदर ई-निविदेस मा.स्थायी समिती सभा ठराव क्र. ४८ दि.१८/०६/२०१९ अन्वये मंजुरी मिळालेली आहे. सदर निविदेस मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.१३ दि.१६/०३/२०२० अन्वये मुदतवाढ देण्यात आलेली आहे. श्री जिवदानी देवी रुग्णालय येथे नव्याने शस्त्रक्रिया विभाग व प्रसुति विभाग सुरु करणेकामी लागणारे उपकरणे, सर्जिकल साहित्य व तद्अनुषंगीक उपभोग्य वस्तू खरेदी करणेकामी अंदाजे रक्कम रु.८,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

सन २०२०-२१ या वित्तिय वर्षात "ऑक्सिजन सिलिंडर रिफिलिंगसह रुग्णालयीन उपकरणे खरेदी तसेच देखभाल दुरुस्ती" या लेखाशिर्षाखाली रु.५,००,००,०००/- इतकी तरतुद करण्यात आलेली असून या तरतुदीमधून सदरचा खर्च भागवीता येणे शक्य होणार आहे.

ठराव :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम सन १९४९ चे कलम ६७ (३) क अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार श्री जिवदानी देवी रुग्णालय, चंदनसार येथे नव्याने शस्त्रक्रिया विभाग व प्रसुति विभाग सुरु करणेस व याकामी येणाऱ्या रक्कम रु.८,००,०००/- (अक्षरी- आठ लाख मात्र) इतक्या खर्चास प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे.

16/12/2020

(गंगाथरन.डी)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई -विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकिय ठराव क्र. २८३ विभाग :- विदयुत विभाग
दिनांक :-१६/१२/२०२०

प्रस्तावाचा विषय :- प्रभाग समिती (ए) विरार (प), मधिल विराट नगर निदान केंद्र मध्ये सुरक्षिततेच्या दृष्टीने कंट्रोल पॅनल बसविणे, केबलिंग व्यवस्था व त्याअनुषंगिक विद्युतीय कामे करणे कामास प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकुर :-

1) **अंदाजपत्राकिय रक्कम** :- ४,९८,११०/- (सन २०१९-२० चे जिल्हा दरसुची नुसार)

2) **कामाची आवश्यकता** :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ए) कार्यक्षेत्रात विराट नगर येथे हिंदु स्मशानभुमी, निदान केंद्र व शवगृह हे एकाच जागी उभाण्यात आले होते. त्यातील कंट्रोल पॅनल व केबल नादुरुस्त व जिर्ण झाले आहे. याकरिता सदर इमारतीत विद्युतीय सुरक्षिततेच्या दृष्टीने कंट्रोल पॅनल, केबलिंग व्यवस्था व त्याअनुषंगिक विद्युतीय कामे करणे आवश्यकता आहे.

3) **जागेची मालकी** :- महानगरपालिका इमारत, विरार (प)

4) **कामाचे स्वरुप** :- आर्यन शिट मेटल वर्क-३२५ कि.ग्रॅ., लॉक-२५ नग, कॉपर वायर २x१.५ sq.mm-५० मी, कॉपर वायर २x२.५ sq.mm-५० मी, कॉपर वायर ४x१६ sq.mm-३० मी, कॉपर लग्ज-१२ नग, डिजिटल व्होल्टमीटर-२ नग, डिजिटल ॲमिटर-२ नग, सिलेक्टर स्विच-४ नग, LED टाईप पायलेट लॅम्प-१२ नग, HRC फ्युज कार्टरेज-३ नग, न्युटरल लिंक-४ नग, बस पट्टी-८८ कि.ग्रॅ., चेंज ओव्हर स्विच-२ नग, ३ पोल MCCB-८ नग, FPMCB-६ नग, DPMCB-४ नग, हॅन्डल ६३० A-२ नग, हॅन्डल २५० A-८ नग, टर्मिनल स्प्रेडर्स-८नग, बसबार-१मी, एल.टी करंट ट्रान्सफॉर्मर-६ नग, फयुज ब्रिज-२४ नग, आर्मड केबल ४x१६sq.mm-२४ मी, आर्मड केबल ४x२५sq.mm-१०५ मी, आर्मड केबल ४x५०sq.mm-१३५ मी, टेंच-१६० मी, DWC पाईप-२२५

५) लेखाशिर्षक :- इतर दिवाबत्ती व्यवस्था

उपरोक्त वर नमुद केलेल्या कामाकरिता होणारा खर्च सन २०२०-२१ या वित्तीय वर्षातील "इतर दिवाबत्ती व्यवस्था" या लेखाशिर्षकातील रक्कम १२,००,००,०००/- रुपये तरतुदी मधुन भागविण्यात येईल.

सबब सदर प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ अन्वये प्रशासकिय व वित्तीय मान्यतेस्तव सादर

प्रस्तावाचा ठराव :- प्रभाग समिती (ए) विरार (प), मधिल विराट नगर निदान केंद्र मध्ये सुरक्षिततेच्या दृष्टीने कंट्रोल पॅनल बसविणे, केबलिंग व्यवस्था व त्याअनुषंगिक विद्युतीय कामे करणेकरिता महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४९ व ६८ (१), ६९(१) व(२) मा.आयुक्तांचे आदेशान्वये मला प्रदान केलेल्या अधिकारानुसार सदर कामास तयार करणेंत आलेल्या अंदाजपत्रकिय रक्कम ४,९८,११०/- रुपये पर्यंतच्या खर्चास प्रशासकिय व वितीय मान्यता देणेंत येत आहे.

(आशिष पाटील)
अति-आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई -विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकिय ठराव क्र. २८२ विभाग :- विदयुत विभाग
दिनांक :-२५/१२/२०२०

प्रस्तावाचा विषय :- प्रभाग समिती (ए) विरार (प), मधिल दिवळईपाडा हॉस्पिटल मध्ये सुरक्षिततेच्या दृष्टीने कंट्रोल पॅनल बसविणे, केबलिंग व्यवस्था व त्याअनुषंगिक विद्युतीय कामे करणे कामास प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकुर :-

1) **अंदाजपत्राकिय रक्कम** :- ४,४४,२६४/- (सन २०१९-२० चे जिल्हा दरसुची नुसार)

2) **कामाची आवश्यकता** :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ए) कार्यक्षेत्रात कोरोना विषांणु (कोविड-१९) संसर्गिक रुग्णांच्या प्रथमोपचारासाठी दिवळईपाडा हॉस्पिटल उभाण्यात आले आहे. सदर हॉस्पिटल करिता सुरक्षिततेच्या दृष्टीने विद्युत कंट्रोल पॅनल बसविणे, केबलिंग व्यवस्था व त्याअनुषंगिक विद्युतीय कामे करणे आवश्यकता आहे.

3) **जागेची मालकी** :- महानगरपालिका इमारत, विरार (प)

4) **कामाचे स्वरुप** :- आर्यन शिट मेटल वर्क-३२५ कि.ग्रॅ., लॉक-२५ नग, कॉपर वायर २x१.५ sq.mm-५० मी, कॉपर वायर २x२.५ sq.mm-५० मी, कॉपर वायर ४x१६ sq.mm-३० मी, कॉपर लग्ज-१२ नग, डिजिटल व्होल्टमीटर-२ नग, डिजिटल ॲमिटर-२ नग, सिलेक्टर स्विच-४ नग, LED टाईप पायलेट लॅम्प-१२ नग, HRC फ्युज कार्टरेज-३ नग, न्युटरल लिंक-४ नग, बस पट्टी-९५ कि.ग्रॅ., चेंज ओव्हर स्विच-२ नग, ३ पोल MCCB-८ नग, FPMCB-४ नग, DPMCB-४ नग, हॅन्डल ६३० A-२ नग, हॅन्डल २५० A-८ नग, टर्मिनल स्प्रेडर्स-८नग, बसबार-१मी, एल.टी करंट ट्रान्सफॉर्मर-६ नग, फयुज ब्रिज-२४ नग, आर्मड केबल ४x१६sq.mm-६५ मी, आर्मड केबल ४x२५sq.mm-१४५ मी, टेंच-६५ मी, DWC पाईप-८० मी

५) **लेखाशिर्षक** :- इतर दिवाबत्ती व्यवस्था

उपरोक्त वर नमुद केलेल्या कामाकरिता होणारा खर्च सन २०२०-२१ या वित्तीय वर्षातील "इतर दिवाबत्ती व्यवस्था" या लेखाशिर्षकातील रक्कम १२,००,००,०००/- रुपये तरतुदी मधुन भागविण्यात येईल.

सबब सदर प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ अन्वये प्रशासकिय व वित्तीय मान्यतेस्तव सादर

प्रस्तावाचा ठराव :- प्रभाग समिती (ए) विरार (प), मधिल दिवळईपाडा हॉस्पिटल मध्ये सुरक्षिततेच्या दृष्टीने कंट्रोल पॅनल बसविणे, केबलिंग व्यवस्था व त्याअनुषंगिक विद्युतीय कामे कामे करणेकरिता महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४९ व ६८ (१), ६९(१) व(२) मा.आयुक्तांचे आदेशान्वये मला प्रदान केलेल्या अधिकारानुसार सदर कामास तयार करणेंत आलेल्या अंदाजपत्रकिय रक्कम रु. ४, ४४,२६४/- रुपये पर्यंतच्या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणेंत येत आहे.

(आशिष पाटील)
अति-आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

T/5

वसई- विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), जि.- पालघर, पिन नं. 401 305
दूरध्वनी- 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. २८३

विभाग : वैद्यकीय आरोग्य
दिनांक : ९६/१२/2020

प्रस्तावाचा विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील कौलसिटी वसई येथिल समर्पित कोवीड रुग्णालयातील ए.बी.जी मशिनकरीता आवश्यक असणारे रिएजंट विनानिविदा खरेदी करणेकामी प्रशासकिय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेचे २ रुग्णालये, ३ माताबाल संगोपन केंद्रे, ९ दवाखाने, व २२ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे कार्यरत आहेत. तसेच या व्यतिरिक्त कोवीड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्याकरीता महानगरपालिका कार्यक्षेत्रात अलगीकरण कक्ष, विलगीकरण कक्ष, कोवीड हेल्थ सेंटर व समर्पित कोवीड रुग्णालय सुरु करण्यात आलेले आहेत. कोवीड-१९ संक्रमित रुग्णांची संख्या लक्षात घेता सदर रुग्णांची चाचणी क्षमता वाढविण्याची आवश्यकता आहे. कौलसिटी-वसई येथे समर्पित कोवीड रुग्णालय सुरु करण्यात आलेले आहे. सदर कोवीड रुग्णालयाला दान स्वरूपात ए.बी.जी मशिन प्राप्त झालेले आहे. महानगरपालिकेच्या प्रयोगशाळा विभागात संबंधित मशिन उपलब्ध करून देण्यात आली आहे. सदर मशीनद्वारे कोवीड-१९ संक्रमित रुग्णांचे रक्तनमुने तपासणे सोयीचे होणार आहे. परंतु या मशीनकरीता लागणाऱ्या रिएजंटचा समावेश ई-निविदा यादीत नसल्याने सदरचे रिएजंट विनानिविदा खरेदी करणे गरजेचे आहे. सदर रिएजंट खरेदी करणेकामी अंदाजे रक्कम रु.२,७५,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

उपरोक्त ए.बी.जी मशिनचे रिएजंट खरेदी करणेकामी येणारा खर्च सन २०२०-२१ या वर्षाकरीता "रुग्णालय औषधे खरेदी" या लेखाशिर्षाखाली करण्यात आलेल्या तरतुदीमधून भागविता येणे शक्य होणार आहे.

ठराव :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३) (क) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील कौलसिटी वसई येथिल समर्पित कोवीड रुग्णालयातील ए.बी.जी मशिनकरीता आवश्यक असणारे रिएजंट विनानिविदा खरेदी करणेकामी येणाऱ्या रक्कम रु.२,७५,०००/- (अक्षरी- रुपये दोन लाख पंच्याहत्तर हजार मात्र) खर्चास प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे.

(गंगाथरन.डी)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई- विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), जि.- पालघर, पिन नं. 401 305
दूरध्वनी- 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. २८४

विभाग : वैद्यकीय आरोग्य
दिनांक : १६/ ९२/2020

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील माताबाल संगोपन केंद्र, जुचंद्र येथिल प्रयोगशाळा विभागातील सेल काऊंटर मशीन (Labmate) व बायो केमिस्ट्री ॲनालायझर मशीन (Cellenium-21) यांची उत्पादक कंपनीमार्फत त्रैवार्षिक देखभाल दुरुस्ती करणेकामी प्रशासकिय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकिय आरोग्य विभागामार्फत २ रुग्णालये, ३ माताबाल संगोपन केंद्रे, २२ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे व ९ दवाखाने कार्यरत असून या ठिकाणी रुग्ण दैनंदिन तपासणीसाठी येत असतात. माताबाल संगोपन केंद्र, जुचंद्र येथे दैनंदिन बाहयरुग्ण विभाग, आंतरुग्ण विभाग, शस्त्रक्रिया विभाग, सोनोग्राफी विभाग,औषध विभाग, लेबर रुम व पॅथोलॉजी विभाग असे विविध विभाग कार्यरत आहेत. रुग्णालयात येणाऱ्या गरोदर माता, बाहयरुग्ण व आंतरुग्ण यांचे विविध तपासणी करीता रक्ताचे नमुने घेण्यात येतात. सदर नमुन्यांची सेल काऊंटर मशीन व बायो केमिस्ट्री ॲनालायझर मशिनद्वारे तपासणी केली जाते. सदरचे सेल काऊंटर मशीन मॉडेल नं. (मे.ट्रिविट्रॉन हेल्थकेअर प्रा.लि.-3020ET01219) व बायो केमिस्ट्री ॲनालायझर मशीन मॉडेल नं. (मे.ट्रिविट्रॉन हेल्थकेअर प्रा.लि.-ES1001605C108) दि.१४/०८/२०१८ रोजी मे.पिनॅकल बायोमेड यांचेमार्फत मे.ट्रिविट्रॉन हेल्थकेअर प्रा.लि.या उत्पादित कंपनीचे मशीन खरेदी करण्यात आल्यापासुन दि.३१/०१/२०२० पर्यंत हमी कालावधीमध्ये देखभाल दुरुस्ती करण्यांत येत होती. सदरची मुदत दि.३१/०१/२०२० रोजी संपुष्टात आल्याने नव्याने त्रैवार्षिक देखभाल दुरुस्ती ठेका देणे गरजेचे आहे. दि.०५/११/२०२० रोजीच्या माताबाल संगोपन केंद्र, जुचंद्र यांच्या मिळालेल्या अहवालानुसार मे.ट्रिविट्रॉन हेल्थकेअर प्रा.लि. यांनी दि.०१/०२/२०२० ते दि.३१/०१/२०२३ पर्यंत देखभाल दुरुस्ती (साहित्याविना) करण्याकरीता दरपत्रक दिलेले आहे. सदर रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागात वापरण्यांत येणारी सेल काऊंटर मशीन व बायो केमिस्ट्री ॲनालायझर मशिन मे.ट्रिविट्रॉन हेल्थकेअर प्रा.लि. यांचेकडुन खरेदी केलेली असल्याने त्यांच्यामार्फतच त्रैवार्षिक देखभाल दुरुस्ती करणे योग्य होईल.. जेणेकरुन भविष्यात मशीन मध्ये बिघाड झाल्यास ते त्वरीत दुरुस्त करुन होणारी गैरसोय टाळता येणे शक्य होईल. नमुद दोन्ही मशिनच्या तीन वर्षाच्या कालावधीकरिता सी.एम.सी (साहित्यासह देखभाल दुरुस्ती) बाबत सदर उत्पादित कंपनीशी विचारणा केली असता सी.एम.सी चे दर उपलब्ध नसल्याचे सदर उत्पादित कंपनीने ई-मेल व्दारे कळविलेले आहे. वरील नमुद मशीनचा हमी कालावधी संपलेनंतर कोरोना विषाणूचा प्रादूर्भाव वाढल्याने सदर कंपनीशी करार करणे शक्य न झाल्याने दि.०१/०२/२०२० पासुन

दि.३०/११/२०२० पर्यंत कार्योत्तर कार्यादेश देणे योग्य होईल. तद्नंतर दि.०१/१२/२०२० पासुन दि.३१/०१/२०२३ पर्यंत सदर उत्पादित कंपनीस कार्यादेश देणे योग्य होईल. तरी वरील नमुद दोन्ही मशिनच्या तीन वर्षाच्या ए.एम.सी (साहित्याविना देखभाल दुरुस्ती) करीता अंदाजे रक्कम रु.१,२०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम सन १९४९ कलम ६७ (३) क अन्वये मा. आयुक्त सो. यांना असलेल्या अधिकारानुसार उपरोक्त प्रयोगशाळा विभागातील सेल काऊंटर मशीन (Labmate) व बायो केमिस्ट्री ॲनालायझर मशीन (Cellenium 21) यांची त्रैवार्षिक देखभाल दुरुस्ती करणेकामी येणारा खर्च रु.१,२०,०००/- सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात "ऑक्सिजन सिलेंडर रिफीलींगसह रुग्णालयीन उपकरणे (खरेदी) देखभाल दुरुस्ती" या लेखाशिर्षाखाली करण्यात आलेल्या रक्कम रु.५,००,००,०००/- इतक्या तरतुदीमधून भागविता येणे शक्य होणार आहे. तरी यानुसार महानगरपालिकेच्या माताबाल संगोपन केंद्र, जुचंद्र येथिल प्रयोगशाळा विभागातील सेल काऊंटर मशीन व बायो केमिस्ट्री ॲनालायझर मशीनची मे.ट्रिविट्रॉन हेल्थकेअर प्रा.लि.यांच्याकडुन त्रैवार्षिक साहित्याविना देखभाल दुरुस्ती करणेकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास प्रशासकिय मान्यता मिळणेस्तव सादर

ठराव :- सदरचे प्रयोगशाळा विभागातील सेल काऊंटर मशीन (Labmate) व बायो केमिस्ट्री ॲनालायझर मशीनची (Cellenium 21) त्रैवार्षिक साहित्याविना देखभाल दुरुस्ती करणेकामी मे.ट्रिविट्रॉन हेल्थकेअर प्रा.लि. यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम सन १९४९ कलम ६७ (३) क अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार येणाऱ्या रक्कम रु.१,२०,०००/- (अक्षरी- रुपये एक लाख वीस हजार मात्र) खर्चास प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे.

(गंगाथरन.डी)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. २८५ विभाग :- पाणी पुरवठा
दिनांक :- ४७/ ४२/ २०२०

प्रस्तावाचा विषय :- केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान अंतर्गत वसई - विरार शहर महानगरपालिकेसाठी अतिरिक्त वितरण व्यवस्था योजना.

सौर ऊर्जा प्रकल्पा अुनषंगाने महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरणाकडे निधी वर्ग करणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :-

<table>
<tr><td>१.</td><td>योजनेचे नाव</td><td>:</td><td>केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान अंतर्गत वसई-विरार शहर महानगरपालिकेसाठी अतिरिक्त वितरण व्यवस्था योजना.</td><td>रूपये कोटीत</td></tr>
<tr><td rowspan="3">२.</td><td rowspan="3">योजनेचा तपशिल</td><td rowspan="3">:</td><td>सदर योजनेअंतर्गत ३ प्रकल्पांची कामे हाती घेण्याचे प्रस्तावित करण्यात आले होते.
१) अमृत पाणी पुरवठा योजना</td><td>रु. १३०.००</td></tr>
<tr><td>२) १ मेगा वॅट सौर ऊर्जा प्रकल्प</td><td>रु. ५.७५</td></tr>
<tr><td>३) हरित क्षेत्र विकासीत करणे</td><td>रु. ०.१</td></tr>
<tr><td>३.</td><td>मनपा प्रशासकीय मान्यता</td><td>:</td><td>मा. सर्वसाधारण सभा दि. २०/०१/२०१६ ठराव क्र. १६</td><td>येणा-या खर्चास</td></tr>
<tr><td rowspan="5">४.</td><td rowspan="5">शासनाची प्रशासकीय मान्यता</td><td>:</td><td>१) शासन निर्णय क्र. अमृत - २०१५/ प्र.क्र.१९७ /नवि-३३ दि. १३/१०/२०१५ अन्वये मनपाचा परिशिष्ट "अ" अ.क्र. ८ नुसार समावेश.</td><td rowspan="4">रु.१३५.५९</td></tr>
<tr><td>:</td><td>२) शासन निर्णय क्र. अमृत - २०१६/प्र.क्र.१४५(५) /नवि-३३ दि.२३/०६/२०१६ अन्वये मान्यता व वित्तीय आकृतीबंध
<table>
<tr><td>केंद्र (५०%)</td><td>राज्य (२५%)</td><td>मनपा (२५%)</td></tr>
<tr><td>६७.७९५</td><td>३३.८९७</td><td>३३.८९७</td></tr>
</table></td></tr>
<tr><td colspan="2">१) पाणी पुरवठा प्रकल्प</td><td>रु. १३०,१७,३३,०१९</td></tr>
<tr><td colspan="2">२) १ मेगा वॅट सौर ऊर्जा प्रकल्प</td><td>रु. ५,४१,३२,०००</td></tr>
<tr><td colspan="2">एकूण</td><td>रु. १३५,५८,६५,०१९</td></tr>
</table>

		:	३) शासन निर्णय क्र. अमृत - २०१६/ प्र.क्र.१४५(५) /नवि-३३ दि.१/०२/२०१७ ने आकृतीबंधात बदल केंद्र (३३.३३%) | राज्य (१६.६७%) | मनपा (५०%) ४५.१९२२ | २२.६०२८ | ६७.७९५	
			१) पाणी पुरवठा प्रकल्प	रु. १३०,१७,३३,०१९
			२) १ मेगा वॅट सौर ऊर्जा प्रकल्प	रु. ५,४१,३२,०००
			एकूण	**रु. १३५,५८,६५,०१९**
		:	४) शासन निर्णय क्र. अमृत - २०१६/प्र.क्र.१४५(५) /नवि-३३ दि.१९/०४/२०१७ ने सुधारीत प्रशासकीय मान्यता केंद्र (३३.३३%) | राज्य (१६.६७%) | मनपा (५०%) ४६.४५२ | २३.२३३ | ६९.६८५	
			१) पाणी पुरवठा प्रकल्प	रु. १३३,९५,१८,६९२
			२) १ मेगा वॅट सौर ऊर्जा प्रकल्प	रु. ५,४१,३२,०००
			एकूण	**रु. १३९,३६,५०,६२९**
		:	५) शासन निर्णय क्र. अमृत - २०१९/प्र.क्र.२३८(१) /नवि-३३ दि.२९/०८/२०१९ (१ मेगा वॅट सौर ऊर्जा प्रकल्प)	**रू. ४,६३,००,०००**

वसई - विरार शहर महानगरपालिकेने प्राप्त मंजूरीनुसार महापालिकेच्या धुकटण जलशुध्दीकरण केंद्र येथे १ मेगा वॅट विद्यूत निर्मिती प्रकल्प उभारण्याची कार्यवाही महापालिकेस करावयाची होती त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची शासनामार्फत सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. याकामी आवश्यक पुढील कार्यवाही करुन मान्यतेचा प्रस्ताव दि. ३/०४/२०१८ अन्वये शासनास सादर करण्यात आला होता. तद्नंतर केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान अंतर्गत सौर ऊर्जा उपांगाची कामे महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (MEDA) मार्फत पुर्ण ठेव तत्वावर करण्याबाबत नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. अमृत २०१७/प्र.क्र. २८९/नवि-३३ दि. १७/१२/२०१८ पारित करण्यात आल्याचे सह.सचिव नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दि. १८/१२/२०१८ च्या पत्रान्वये कळविले असून सदर शासन निर्णयातील क्र.६ नुसार पूर्ण ठेव तत्वावर अंमलबजावणीची व्याप्ती व महाराष्ट्र ऊर्जा विकास प्राधिकरणास द्यावयाचे शुल्क ३% निश्चित केले आहेत.

महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरणामार्फत (MEDA) ने वसई विरार शहर महानगरपालिकेसाठी १ मेगा वॅट सौर ऊर्जा प्रकल्प राबविण्या अनुषंगाने रु.४,६३,००,०००/- किंमतीचा सुधारीत सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन शासनास सादर केला. त्यास महाराष्ट्र शासन , नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. अमृत - २०१९ / प्र.क्र. २३८(१)/नवि-३३ दि. २९/०८/२०१९ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात

आली असून प्राप्त मान्यतेनुसार महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरणामार्फत निविदा कार्यवाही पूर्ण करून मंजूर ठेकेदार मे.पी.व्ही. टेक्नोलॉजी प्रा.ली. यांना रु.३,५९,०३,९६०/- किंमतीचा दि.१/१०/२०२० अन्वये कार्यादेश देण्यात आला त्यानुसार सदर ठेकेदाराने कामास सुरुवात केली आहे.

महाव्यवस्थापक (सौर), महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण,पुणे यांनी त्यांचे दि.३ डिसेंबर २०२० च्या पत्रान्वये निविदेतील प्राप्त प्रकल्प किंमत रु.३,५९,०३,९६०/- अधिक महाऊर्जा कार्यान्वयन शुल्क (३% व अधिक GST १८%) रु.१२,७१,००१/- अशी एकूण रु. ३,७१,७४,९६१/- महाऊर्जाकडे RTGS/NEFT स्वरूपात वर्ग करण्याबाबत कळविले आहे. सह सचिव, नगरविकास विभाग, (नवी-३३) महाराष्ट्र शासन यांनी दि.१७/११/२०२० च्या पत्रान्वये खालील प्रमाणे रक्कम महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरणास (मेडाकडे) वर्ग करण्याचे निर्देश दिले आहेत.

अ.क्र.	शहराचे नांव	सोलार प्रकल्प क्षमता	प्रकल्पाची किंमत	प्रकल्प किंमतीपैकी ५० टक्केच्या मार्यादेत केंद्र, राज्य व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या हिश्श्यातून मेडाला प्रदान करावयाची रक्कम (लक्ष रुपये)				मेडाला प्रकल्प व्यवस्थापन खर्चापोटी ULB ने अदा करावयाची रक्कम.	प्रकल्प किंमतीच्या ५०% व व्यवस्थापन शुल्क
				केंद्र हिस्सा	राज्य हिस्सा	ULB हिस्सा	एकूण		
१	२	३	४	५	६	७	८	९	(८ +९=) १०
१	वसई विरार	१००० KW	३,५९,०३,९६०/-	६०	३०	९०	१८०	३,५९,०००/-	१,८३,५९,०००/-

सदर "अमृत सोलर योजने" अनुषंगाने महापालिकेने यापूर्वी स्वतंत्र बॅक खाते उघडले असून त्यावर शासन अनुदान रु.५७,२०,०००/- व मनपा हिस्सा रु. ५४,१०,०००/- असा एकूण १,११,३०,०००/- निधी जमा केला आहे. परंतू सदर प्रकल्प पाणी पुरवठा योजनेतीलच एक भाग असल्याने सदर खर्च अमृत पाणी पुरवठा योजने अंतर्गत टाकण्याच्या सुचना मा.उप सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय यांनी दिल्या आहेत. त्यामूळे अमृत सौरऊर्जा खात्यावरील जमा शासन अनुदानासह मनपा हिस्सा अशी एकूण रक्कम रु.१,११,३०,०००/- अमृत पाणी पुरवठा योजना या खात्यावर वळती करणे आवश्यक आहे.

शासन पत्र दि.१७/११/२०२० नुसार अमृत सौरऊर्जा प्रकल्पासाठी रु.१,८३,५९,०००/- इतका निधी महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (MEDA) कडे वर्ग करण्यासाठी सन २०२०/२१ च्या अर्थसंकल्पातील अमृत पाणी पुरवठा योजना या लेखा शिर्षावरील तरतूद रु. ५० कोटी मधील शिल्लक तरतूद मधून सदर खर्च भागविणे शक्य आहे.

या कामी शासन निर्णय क्र. अमृत - २०१९/प्र.क्र.२३८(१) /नवि-३३ दि.२९/०८/२०१९ नुसार रु.३,५९,०३,९६०/- प्रकल्पासाठी मंजूर वित्तीय आकृतीबंधानुसार प्राप्त शासन अनुदान व मनपाचा अनुज्ञ हिश्यासह खर्चास तसेच PMC म्हणून शासनाने नियूक्त केलेल्या महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण, पुणे यांना प्रकल्प खर्चाच्या ३ % निश्चित केलेल्या सेवाशुल्कानुसार येणा-या खर्चास तसचे शासन निर्णयातील अटीनुसार सदर काम प्रत्यक्ष करताना खर्चात होणरी वाढ महापालिकेस

स्व:निधीतून करण्यासाठी येणाऱ्या अपेक्षित खर्चास मनपाची प्रशासकीय मान्यता आवश्यक आहे.

तरी वरील प्रमाणे अमृत सौरऊर्जा प्रकल्पासाठी प्रशासकीय व वित्तीय मान्यतेसह महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण, पुणे यांचेकडे टप्प्या- टप्प्याने निधी वर्ग करण्यास व वरील प्रमाणे देयक मान्यतेस्त सादर.

ठराव :- १) मा. सर्वसाधारण सभा दि.२०/०१/२०१६ ठ.क्र.१६ अन्वये केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान अंतर्गत सहभाग घेण्यास मान्यता प्राप्त असून त्याअंतर्गत सादर केलेल्या पाणी पुरवठा प्रकल्प किंमत रू.१३९.३७ कोटी खर्चास शासनाने दि.१९/०४/२०१७ अन्वये प्रशासकीय मान्यता दिली असून वित्तीय आकृतीबंध निश्चित केला आहे. सदर पाणी पुरवठा प्रकल्पा अंतर्गतच १ मेगा वॅट सोलार पॉवर प्लान्ट उभारणे कामी ५.४१ कोटी खर्चास मान्यता दिली आहे.

२) शासन निर्णय दि.१७/१२/२०१८ अन्वये महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण (MEDA) ने सदर प्रकल्प पुर्ण ठेव तत्वावर राबविणे व प्रकल्प खर्चाच्या ३% सेवाशुल्क निर्णयातील क्र.६ नुसार निश्चित केले आहे. सदर शासन निर्णयातील ३ (ग) व ५ (क) नुसार सदर कामाचे कार्यादेश दिल्यानंतर संबंधीत नागरी स्थानीक स्वराज्य संस्थेने प्रकल्प निधीतून महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरणाकडे निधी वर्ग करण्याबाबत निर्देश आहेत.

३) महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरणाने वरील प्राप्त मंजूरीनुसार वसई-विरार शहर पाणी पुरवठा योजनेतील सौर उर्जा उपांगाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून शासनास सादर केला असता दि.१९/०४/२१७ च्या प्रशासकीय मान्यता आदेशातील परिच्छेद क्र.१ मधील तांत्रिक उपांगांच्या विवरण पत्रातील अ.क्र. १९ सौर उर्जा उपांगासाठी रू.४.६३ कोटी इतकी सुधारीत प्रशासकीय मान्यता दि.२९/०८/२०१९ अन्वये दिली असून MEDA ने तद्नंतर निविदा कार्यवाही पुर्ण करून मंजूर ठेकेदार मे.पी.व्ही. टेक्नोलॉजी प्रा.ली. मुंबई यांना दि.०१/१०/२०२० अन्वये कार्यादेश दिला आहे. व ठेकेदारामार्फत कामास आरंभ करण्यात आला आहे.

४) शासन पत्रक दि.१७/११/२०२० नुसार सदर प्रकल्पाअनुषांगाने MEDA कडे प्रकल्प किंमतीच्या ५०% निधी व MEDA ला सेवाशुल्क म्हणून १% अशी एकूण १,८३,५९,०००/- वर्ग करण्याबाबत निर्देश देण्यात आले असून त्यानुसार विभागाने सदर निधी वर्ग करण्याचे देयक सादर केले आहे.

५) दि.२९/०८/२०१९ च्या शासन प्रशासकीय मान्यता रू.४.६३ कोटीस अधिन राहून तसेच स्विकृत निविदा किंमत रू.३,५९,०३,९६०/- खर्चास तसेच शासन नियुक्त MEDA या संस्थेस प्रकल्प खर्चाच्या ३% सेवाशुल्कानुसार मनपा स्व:निधीतून खर्चास तसेच प्रत्यक्ष प्रकल्पाची अंमलबजावणी करताना खर्चात वाढ झाल्यास त्यानुसार येणाऱ्या एकूण संपुर्ण खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

६) MEDA च्या मागणी व शासन निर्देशानुसार प्रकल्प निधी MEDA कडे वर्ग करण्यास तसेच सदर सौरउर्जा प्रकल्प हा पाणी पुरवठा प्रकल्पाअंतर्गतच एक भाग असल्याने सदर सौरउर्जा प्रकल्पाचा खर्च अमृत पाणी पुरवठा योजना व इतर या लेखाशिर्षावरून करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

७) पाणी पुरवठा विभागाने सादर केलेल्या देयकानुसार सद्य:स्थितीत महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरणास १,८३,५९,०००/- वर्ग करण्यास मान्यता देण्यात आहे.

(गंगाथरन डी.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई -विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स -०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

मुख्यप्रशासकीय ठराव क्र. २८६

विभाग : बांधकाम
दिनांक : १७/१२/२०२०

प्रस्तावाचा विषय :- **सन २०२०-२०२१ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकामधील तरतुदीच्या पुर्नविनियोजनास मंजूरी मिळणे बाबत.**

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती A,B,C,D,E,F,G,H,I बांधकाम विभागा अंतर्गत विविध विकास कामे करण्यात आलेली असून खालील नमुद लेखाशिर्षच्या तरतुदी संपल्याने कामाची देयके अदा व प्रस्ताव सादर करणेस अडचण निर्माण झालेली आहे. लेखाविभागातुन शिल्लक तरतुदीची आकडेवारी (१५ डिसेंबर, २०२० पर्यंत) पाणीपुरवठा विभागाला दिलेली आहे.

सदरची प्रलंबित देयके करणेसाठी सन २०२०-२०२१ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात खालील नमुद केलेल्या विहित नमुन्यात तरतुद पुर्नविनयोजन करुन देणे आवश्यक आहे.

सन २०२०-२१ लेखा विभागाकडून प्राप्त झालेल्या प्रत्येक्ष खर्चाच्या तक्त्या प्रमाणे सादर केलेले पुर्नविनियोजनाचे विवरणपत्र पुढील प्रमाणे आहे.

ह्या लेखाशिर्षातुन (रु. लाखात)						ह्या लेखाशिर्षात (रु. लाखात)				
अ.क्र	लेखाशिर्ष	मुळ तरतुद	आजच्या तारखेपर्यंतचा झालेला खर्च/ प्रस्तावित खर्च	वर्ग करावयाची रक्कम	उपलब्ध शिल्लक	लेखाशिर्ष	मुळ तरतुद	आजच्या तारखेपर्यंतचा झालेला खर्च/ प्रस्तावित खर्च	प्रस्तावित वाढीची रक्कम	अभिप्राय
१	नाले सफाई /खोदाई	रु. ११००.०० लक्ष	रु. ७९३.६६ लक्ष	रु. २००.०० लक्ष	रु. ५०६.३४ लक्ष	सार्वजनिक शौचालय, मुतारी/ प्रसाधन गृह दुरुस्ती	रु. ८५.०० लक्ष	रु. ७.३२ लक्ष	रु. २००.००लक्ष (पुर्नविनियोजन अंती तरतुद रु. २८५.००लक्ष)	सदर लेखाशिर्षा अंतर्गत यापुर्वी देण्यात आलेल्या कार्यादेशानुसार देयके अदा करावयाची असलेने तसेच ODF++ चे प्रस्ताव मंजूर करणेकरीता आले आहेत. सदर लेखाशिर्षावर तरतुद करणे आवश्यक आहे.

तरि वरीलप्रमाणे सन २०२०-२१या वित्तीय वार्षिक वर्षाकरिता **नालेसफाई सफाई/खोदाई** या लेखाशिर्षा खालील शिल्लक तरतुदी मधुन **सार्वजनिक शौचालय,मुतारी/प्रसाधन गृह दुरुस्ती** या लेखाशिर्षकात **रक्कम रु. २००.०० लक्ष** तरतुद वर्ग करुन मिळण्यास सदरचा विषय मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्याकडे मंजूरीस्तव शिफारस असे.

प्रस्तावाचा निर्णय :- प्रस्तावाचा मजकुर पाहता वाढीव तरतुदीची आवश्यकता असल्याने सन २०२०-२१ या वित्तीय वार्षिक वर्षाकरिता **नाले सफाई/ खोदाई** या लेखाशिर्षा खालील शिल्लक तरतुदी मधुन **सार्वजनिक शौचालय,मुतारी/प्रसाधन गृह दुरुस्ती** या लेखाशिर्षकात **रक्कम रु. २००.०० लक्ष** तसेच या लेखाशिर्षकात **रक्कम रु.२००.०० लक्ष** सोबत जोडलेल्या नमुना नं. १० मधील लेखाशिर्षाच्या तरतुदीच्या पुर्नविनियोजनास मा.आयुक्त तथा प्रशासक मंजूरी देत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

11/4

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पूर्व, जि. -पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. २८७

विभाग:- बोळींज

दिनांक:- ३७/१२/२०२०

प्रस्तावाचा विषय:- सन २०२०-२१ हया मधील दि.१ जानेवारी २०२१ ते ३१ मार्च २०२१ व सन २०२१-२२ (१ एप्रिल २०२१ ते ३१ मार्च २०२२) एकुण १५ महिने पर्यत वित्तीय वर्षाकरीता प्रभाग समिती ऐ, बोळींज कार्याक्षेत्रातील दैनंदिन बाजार व आठवडे बाजार कर ठेका पध्दतीने देण्याकरीता प्राप्त झालेल्या जादा निविदा धारकांशी कामाची संविदा करण्यास व कार्यादेश देण्यासाठी प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर:- प्रभाग समिती ऐ, बोळींज अंतर्गत दैनंदिन बाजार व आठवडे बाजार भरविले जातात. सदर बाजार ठेका पध्दतीने देण्याकरीता मा. प्रशासकीय ठराव क्र. १५८ दि. ०९/१०/२०२० ठराव नुसार जा.क्र. ६१४ दि. १३/१०/२०२० रोजी ई-निविदा प्रसिध्दी करण्यात आली. विहीत मुदतीत २ निविदा प्राप्त झाल्याने जा.क्र. ७२९ दि. २८/१०/२०२० रोजी प्रथम मुदतवाढ देण्यात आली. त्यानंतर जा.क्र.१०२१ दि. ११/११/२०२०रोजी व्दितीय मुदतवाढ देण्यात आली. विहीत मुदती नंतर दि. २४/११/२०२० रोजी दु. ४.०० वाजता लखोटा क्र. १ उघडण्यात येऊन प्राप्त २ निविदाधाराकांच्या कागदपत्राची पडताळणी केली असता कागदपत्राची पूर्तता केल्याने लखोटा क्र. २ दि. ०२/१२/२०२० रोजी दु. १.०५ मि. उघडण्यात आला. लखोटा क्र. २ मध्ये प्राप्त झालेल्या निविदाधाराकांची नावे व दर यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे

अ.क्र.	निविदाधारक/प्रतिनिधीचे नाव	निविदेतील दर	शेरा
१	श्री.रामकैलास यादव	९०,००००० /-	पात्र
२	श्री. गजानन इंटरप्रायजेस (अजय पवार)	८५,९९,९३०/-	पात्र

वरील तुलनात्मक तक्त्याची पडताळणी केली असता अ.क्र. १ व २ मधील निविदाधारकापैकी अ.क्र. १ मधील निविदाधारक श्री. रामकैलास यादव यांची किमान देकारापेक्षा रक्कम रू. ९०,००००० /- सर्वात जादा देकाराची निविदा प्राप्त झाली असुन सदर ज्यादा देकाराच्या निविदाधारकांकडून मंजूर रक्कमेवर १८% GST रक्कम रू.१६,२०,०००/- व २% आयकर रू. १,८०,०००/- आकारण्यास व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार श्री. रामकैलास यादव यांच्याशी कामाची संविदा करण्यास व कार्यादेश देण्यासाठी सदरचा प्रस्ताव प्रशासकीय व वित्तीय मान्यतेसाठी सादर.

ठरावाचा निर्णय:- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती ए, बोळींज कार्यक्षेत्रात दैनंदिन आठवडे बाजार शुल्क वसुल करणेकामी दि.०१ जानेवारी २०२१ ते दि. ३१ मार्च २०२२ (१५ महिने) या कालावधीसाठी ठेका नियुक्ती करण्याकामी लखोटा क्र. २ मधील प्राप्त निविदाधारकांपैकी श्री. रामकैलास यादव यांच्या ज्यादा दराच्या रक्कम रू. ९०,००००० /- च्या निविदेस व मंजूर रक्कमेवर १८% GST व २% आयकर आकरण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६७ (३) (क) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार प्रभाग समिती ऐ, कार्यक्षेत्रातील दैनंदिन व आठवडे बाजार शुल्क वसुली करण्याकामी श्री. रामकैलास यादव यांना ठेका नियुक्ती करण्यासाठी दि. १ जानेवारी २०२१ ते दि. ३१ मार्च २०२२ (१५ महिने) कालावधीसाठी रक्कम रू. ९०,००००० /- व त्या रक्कमेवर १८% GST व २% आयकर आकारणी करून करारनामा संविदा करणेस व कार्यादेश देण्यासाठी प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

६	वाहन चालक	पदोन्नती	नामनिर्देशनासाठी विहीत केलेली अर्हता धारण करणाऱ्या महानगरपालिका आस्थापनेवरील क्लिनर या संवर्गातील ५ वर्षाचा अनुभव असणाऱ्या कर्मचाऱ्यांमधून पदोन्नतीने नेमणूक.	किमान अनुभव ३ वर्षे
७	कार्यकारी अभियंता (स्थापत्य)	पदोन्नती	अ) महानगरपालिका आस्थापनेवरील ज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे उप अभियंता(स्थापत्य) या पदावर नामनिर्देशनाने नियुक्त स्थापत्य अभियांत्रिकी शाखेच्या पदवी धारकास किमान ३ वर्षाचा अनुभव असल्यास २५% पदांवर पदोन्नतीस पात्र राहतील. ब) महानगरपालिका आस्थापनेवरील ज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे उप अभियंता (स्थापत्य) या पदावर पदोन्नतीने नियुक्त स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदवीधारकास ३ वर्षाचा अनुभव धारण करणारे उमेदवार ५०% पदोन्नतीस पात्र राहतील. क) महानगरपालिका आस्थापनेवरील ज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे उप अभियंता (स्थापत्य) या पदावर पदोन्नती नियुक्त, स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदवीका धारकास किमान ७ वर्षाचा अनुभव धारण करणाऱ्या उपरोक्त (अ),(ब) वजा जाता उर्वरीत २५% पदांवर पदोन्नतीस पात्र राहतील.	किमान अनुभव ३ वर्षे
८	शाखा अभियंता (विद्युत)	पदोन्नती	महानगरपालिका आस्थापनेवरील ज्येष्ठता व गुणवत्ता यांच्या आधारे कार्यरत कनिष्ठ अभियंता पदावरील किमान ५ वर्षाचा अनुभव आवश्यक.	किमान अनुभव ३ वर्षे

वरिल संवर्गातील पदोन्नती देतांना प्रस्तावित केल्यानुसार निम्न पदावरील अनुभवाची अट शिथील करणेस मान्यता देण्यात येत आहे.

तरी या संदर्भात अनुभवाची अट शिथील करणेचा प्रस्ताव लवकरात लवकर शासनाकडे पाठविण्याचे निर्देश याद्वारे प्रशासनास देण्यात येत आहेत.

आयुक्त तथा प्रशासक 12/12/2022

वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

प्रशासक ठराव क्र.:- २८९ दिनांकः- १७/१२/२०२०

विषय :- प्रभाग समिती 'एच' मधील वॉर्ड क्र. ९६ मध्ये तुळजाभवानी गार्डन ते चुळणा तलाव पर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणे बाबत.

अंदाजपत्रकीय रक्कम :- ६९४५५५८/-

प्रशासकीय मान्यता (महानगरपालिका):- मा. स्थायी समिती सभा ठराव क्र. २५९, दि.११/०९/२०१९

तांत्रिक मान्यता :- मा. शहर अभियंता,दि २६/१०/२०१८ पृष्ठनं५/३७)

तांत्रिक मान्यतेअंती अंदाजपत्रकीय रक्कम :- ६९४५५५८/-

ई-टेंडरींगव्दारे निविदा प्रसिध्दी :- :- १. वविशम/शअ/बांध/२७९ दि.०८/०८/२०१९ शहर अभियंता, वसई विरार शहर महानगरपालिका.

वृत्तपत्रातील निविदा सुचना प्रसिध्दी दिनांक :- दि. ०८/०८/२०१९

१.दै. सामना
२.दै. दि फ्री प्रेस जनरल
३. दै. पूर्णविराम

प्रथम फेरनिविदा सूचना प्रसिध्दी दिनांक :- जा.क्र.वविशम/शअ//बांध/४६६/२०१९,दि.१६/०१/२०१९

वृत्तपत्रातील नाव :- १. दै. हमारा महानगर
२. दै. नवभारत

द्वितीय फेरनिविदा सूचना प्रसिध्दी दिनांक :- जा.क्र.वविशम/शअ/बांध/४८८/२०१९,दि.११/०९/२०१९

वृत्तपत्रातील नाव :- १. दै. पूर्णविराम
२. दै. सामना
३. दै. खबरे आजतक
४. दै. जागरुक टाइम्स
५. डी.एन.ए
६. मिड डे

ई-टेण्डरींगव्दारे निविदा प्रिपरेशनची तारीख :- दि. २२/११/२०१९ दु. ३.०० पासून ते दि. ०६/१२/२०१९ दु.३.०० पर्यंत

ई-टेण्डरींग व्दारे निविदा स्विकारण्याची तारीख:- दि. २२/११/२०१९दु.३.०० पासून ते दि ७/१२/२०१९, दु. ३.२५ पर्यंत

विहीत मुदतीत ऑनलाईन प्रक्रियेव्दारे प्राप्त निविदा :- ०६

ई-टेंडरींगव्दारे निविदा उघडण्याची दिनांक (प्रथम लखोटा) :- दि. १७/१२/२०१९

ई-टेंडरींगव्दारे निविदा उघडण्याची दिनांक (व्दितीय लखोटा) :- दि. ०७/०२/२०२०

P.T.O

:- तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे :-

अ.क्र	निविदा धारकाचे नांव	निविदा दर
१	मे. जय भवानी इन्फ्राप्रोजेक्ट	१२.७५% जादा दराने
२	मे. कृतिका कंस्ट्रक्शन	१०.००% कमी दराने
३	मे. ऋष्किेश पाटील	५.५६% कमी दराने
४	मे. साई कंस्ट्र	११.५५% कमी दराने
५	मे. एस.एम.डेव्हलपर्स	१२.६०% कमी दराने
६	मे. अधिकारी प्राजेक्ट	१६.४४% कमी दराने

उपरोक्त तुलनात्मक तक्याचा अभ्यास करता मे. अधिकारी प्रोजेक्ट यांची १६.४४% कमी दराने निविदा प्राप्त झालेली आहे. सदर निविदेचे मे. अधिकारी प्रोजेक्ट यांचे दर कमी व योग्य आहे.

उपरोक्त निविदांची तुलना केली असता मे. अधिकारी प्रोजेक्ट यांच्या निविदेतील १६.४४% कमी दर हा तुलनात्मक रित्या इतर निविदांच्या तुलनेत कमी व योग्य आहे.

तरी मे. अधिकारी प्रोजेक्ट यांच्या १६.४४% कमी दराच्या निविदेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) अन्वये मान्यता देण्यास व त्यांच्या बरोबर संविदा करण्यास मान्यता मिळणे कामी प्रस्ताव मा. आयुक्त तथा प्रशासक यांचेकडे सविनय सादर.

लघुत्तम निविदा धारक व दर बाबत विभागाचा अभिप्राय :-

उपरोक्त निविदांची तुलना केली असता मे. अधिकारी प्रोजेक्ट यांच्या निविदेतील १६.४४% कमी दराने दर हा तुलनात्मकरित्या इतर निविदांच्या तुलनेत कमी व योग्य आहे.

तरी मे. अधिकारी प्रोजेक्ट यांच्या १६.४४% कमी दराच्या निविदेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार मान्यता देण्यास व त्यांच्याबरोबर संविदा करण्यांस मान्यता मिळणे कामी प्रस्ताव मा. आयुक्त तथा प्रशासक यांचेकडे मान्यतेस्तव सविनय सादर.

<u>प्रस्तावाचा निर्णय</u> :- उपरोक्त निविदांची तुलना करता मे. अधिकारी प्रोजेक्ट यांची निविदा १६.४४% कमी दराने व वाजवी आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये हया कमी दराच्या निविदेस मा. आयुक्त तथा प्रशासक संविदा करणेस मान्यता देत आहे.

13/11/2020

आयुक्त तथा प्रशासक

वसई- विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका.

मुख्य कार्यालय, विरार पूर्व, जि.पालघर. पिन. ४०१३०५.

प्रशासकीय ठराव क्र. २८०

दि. २३/१२/२०२०

प्रस्तावाचा विषय :- दि. ०१/०४/२०२१ ते दि. ३१/०३/२०२४ (३ वर्षे) करिता प्रभाग समिती "एफ" अंतर्गत बिलालपाडा, धानिव, पेल्हार, गावराईपाडा व शिरसाड हद्दीतील दै.बाजार कर वसुलीची ई- निविदा व जाहिर नोटिस प्रसिध्द करणेकरिता प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकुर :- सादर करण्यात येते की, वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती एफ धानिव/पेल्हार अंतर्गत येणाऱ्या बिलालपाडा, धानिव,पेल्हार, गावराईपाडा व शिरसाड या दै. बाजाराची मुदत संपलेली असुन सदर दै. बाजाराची ई-निविदा व जाहिर नोटिस प्रसिध्द करणे आवश्यक आहे. त्याकरिता निविदा रकमेची दि. ०१/०४/२०२१ ते ३१/०३/२०२४ या वित्तीय वर्षाकरिता मागणी खालीलप्रमाणे.

अ. क्रं.	ठिकाण	सन २०२०-२१ मुळ रक्कम	सन २०२१-२२ मागील रक्कम १० % वाढीसह	सन २०२२-२३ मागील रक्कम १० % वाढीसह	सन २०२३-२४ मागील रक्कम १० % वाढीसह
	बिलालपाडा, धानिव, पेल्हार, गावराईपाडा व शिरसाड	रु.५४,४५,९६०/-	रु.५९,९०,५५६/-	रु.६५,८९,६१२/-	रु.७२,४८,५७३/-

वरील प्रमाणे बाजार माहे १ एप्रिल २०२१ ते ३१ मार्च २०२४ या ३ वर्षाचा ई - निविदा करणेस तसेच मंजूर होणाऱ्या रकमेवर १८ % जी.एस.टी २ % आयकर घेणेस प्रशासकीय मंजूरी मिळणेस्तव सादर.

ठरावाचा निर्णय :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती एफ अंतर्गत येणाऱ्या बिलालपाडा, धानिव, पेल्हार, गावराईपाडा व शिरसाड येथील दै. बाजार वसुली करिता ठेका नियुक्त करण्यासाठी दि. १/०४/२०२१ ते दि.३१/०३/२०२४ पर्यंत या कालावधीकरिता ई-निविदा करणेस व मंजुर रकमेवर १८% जी.एस.टी व २% आयकर आकारण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) (क) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार प्रभाग समिती एफ कार्यक्षेत्रातील ई निविदा प्रसिध्द करुन ठेका नियुक्त करण्यासाठी दि.१/०४/२०२१ ते दि. ३१/०३/२०२४ (३ वर्ष) या कालावधीसाठी निविदा मागविणेस व मंजूर रकमेवर १८% जी.एस.टी व २ % आयकर आकारणीस प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

आयुक्त तथा प्रशासक

वसई विरार शहर महानगरपालिका.

वसई विरार शहर महानगरपालिका.

मुख्य कार्यालय, विरार पूर्व, जि.पालघर. पिन. ४०१३०५.

प्रशासकीय ठराव क्र. २८९

दि.२३/१२/२०२०

प्रस्तावाचा विषय :- दि. ०१/०४/२०२१ ते दि. ३१/०३/२०२४ (३ वर्षे) करिता प्रभाग समिती "एफ" अंतर्गत मांडवी आठवडा बाजार कर वसुलीची ई- निविदा व जाहिर नोटिस प्रसिध्द करणेकरिता प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकुर :- सादर करण्यात येते की, वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती एफ धानिव/पेल्हार अंतर्गत येणाऱ्या मांडवी आठवडा बाजाराची मुदत संपलेली असुन सदर आठवडा बाजाराची ई-निविदा व जाहिर नोटिस प्रसिध्द करणे आवश्यक आहे. त्याकरिता निविदा रकमेची दि. ०१/०४/२०२१ ते ३१/०३/२०२४ या वित्तीय वर्षाकरिता मागणी खालीलप्रमाणे.

अ. क्रं.	ठिकाण	सन २०२०-२१ मुळ रक्कम	सन २०२१-२२ मागील रक्कम १० % वाढीसह	सन २०२२-२३ मागील रक्कम १० % वाढीसह	सन २०२३-२४ मागील रक्कम १० % वाढीसह
	मांडवी आठवडा बाजार	रु.८,१५,८७९/-	रु.८,९७,४६७/-	रु.९,८७,२१४/-	रु.१०,८५,९३५/-

वरील प्रमाणे बाजार माहे १ एप्रिल २०२१ ते ३१ मार्च २०२४ या ३ वर्षाचा ई - निविदा करणेस तसेच मंजूर होणाऱ्या रकमेवर १८ % जी.एस.टी २ % आयकर घेणेस प्रशासकीय मंजूरी मिळणेस्तव सादर.

ठरावाचा निर्णय :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "एफ" अंतर्गत येणाऱ्या मांडवी आठवडा बाजार वसुली करिता ठेका नियुक्त करण्यासाठी दि. १/०४/२०२१ ते दि.३१/०३/२०२४ पर्यंत या कालावधीकरिता ई-निविदा करणेस व मंजुर रकमेवर १८% जी.एस.टी व २% आयकर आकारण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) (क) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार प्रभाग समिती "एफ" कार्यक्षेत्रातील ई - निविदा प्रसिध्द करुन ठेका नियुक्त करण्यासाठी दि.१/०४/२०२१ ते दि. ३१/०३/२०२४ (३ वर्ष) या कालावधीसाठी निविदा मागविणेस व मंजूर रकमेवर १८% जी.एस.टी व २ % आयकर आकारणीस प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

आयुक्त तथा प्रशासक

वसई विरार शहर महानगरपालिका.

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.- पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. २८२

विभाग:- माहिती तंत्रज्ञान
दिनांक:- २३/१२/२०२०

प्रस्तावाचा विषय:- वसई विरार शहर महानगरपालिकेतील प्रभाग समिती सी चंदनसार येथील श्री. जिवदानी देवी रुग्णालय अंतर्गत इंटरकॉम सुविधा सुरु करणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- कोरोना (covid १९) विषाणूच्या नियंत्रणाकरीता व त्याचा प्रादुर्भाव कमी करण्याकरीता वसई-विरार शहर महानगरपालिकेतील प्रभाग समिती 'सी' चंदनसार येथे नव्याने श्री. जिवदानी देवी रुग्णालय सुरु करण्यात आले आहे.

सदर ठिकाणी वसई विरार शहरातील कोरोना पॉझीटीव्ह रुग्णांना ठेवण्यात येत आहे. रुग्णांच्या स्थितीचा व इतर कामकाजाचा अहवाल प्रायवेट हॉस्पिटल मधून येणाऱ्या रुग्णांचे पत्ते तपासण्यासाठी देखील दुरध्वनी द्वारे संपर्क साधावा लागतो. तसेच दैनंदिन कामकाज विनाव्यतेय व गतिमान होण्याकरीता रुग्णालयामध्ये इंटरकॉम सुविधा असणेअत्यंत गरजेचे आहे.

त्याअनुषंगाने प्रभाग समिती 'सी' चंदनसार येथे नव्याने सुरु करण्यात आलेल्या श्री. जिवदानी देवी रुग्णालय येथे इंटरकॉम सुविधा सुरु करणे कामीचा तपशील खालील प्रमाणे.

अनु. क्र.	साहित्याचे नाव	नग	प्रति नग अंदाजित रक्कम रुपये (सर्व करांसहीत)	एकुण अंदाजित रक्कम रुपये
१	Epabx system crystal ४/१२ with all standard accessories	०१	१८,५००/-	१८,५००/-
२	Wiring with pipe and polycab wire for १२ extension	२५० mtr	८५/- per mtr	२१,२५०/-
३	Telephone Socket	०५	७००/-	३,५००/-
४	Panasonic telephone instruments	०५	१२००/-	६,०००/-
			GST १८%	८,८६५/-
			एकुण	५८,११५/-

वरील प्रमाणे साहित्य खरेदी करुन इंटरकॉम सुविधा कार्यान्वीत करणेकामी (एक वर्षाच्या देखभाल दुरुस्ती सहीत) अंदाजित रक्कम रु. ५८,११५/- इतका खर्च अपेक्षित असून सदरचा खर्च लेखासांकेतांक क्र. ०३१-२४७२-१ "मा.तं.व. संगणक मशीन (खरेदी) दुरुस्ती" या लेखाशिर्षा अंतर्गत भागवता येईल. तरी दरपत्रके मागवून इंटरकॉम खरेदी करण्यास व होणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेस्तव सादर.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिकेतील प्रभाग समिती सी चंदनसार येथील श्री. जिवदानी देवी रुग्णालय अंतर्गत इंटरकॉम सुविधा सुरु करणे कामी दरपत्रके मागवून इंटरकॉम खरेदी करण्यास व होणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

(प्रदिप जांभळे पाटील)
उपायुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.- पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. २८३

विभाग:- माहिती तंत्रज्ञान

दिनांक:- २३/१२/२०२०

प्रस्तावाचा विषय:- वसई विरार शहर महानगरपालिकेतील सर्व प्रभाग समिती अंतर्गत अतिक्रमण विभागाकरिता व इतर कामकाजासाठी कॅमेरा खरेदी करणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागामार्फत वसई विरार क्षेत्रातील अनधिकृत बांधकाम उदा. अनधिकृत बिल्डिंग, दुकाने,गाळे व इतर आस्थापना इत्यादीवर तोडक कार्यवाही करण्यात येत असते. सदर कार्यवाही करताना अतिक्रमण विभागातील कर्मचा-यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. जसे की नागरिकांचा आक्रोश व कार्यवाही दरम्यान कर्मचा-यांवर होणारे हल्ले इत्यादी.

तरी अनधिकृत बांधकामांवर व दैनंदिन कामकाजात करण्यात येणा-या कार्यवाहीचे फोटो, व्हिडिओ रेकॉर्डिग केल्यास त्या रेकॉर्डिगाच्या सहाय्याने सदर कामात अडथळा निर्माण करणाऱ्यावर गुन्हयांची नोंद करणे सोयीस्कर होईल. फोटो, व्हिडिओ रेकॉर्डिग करणेकामी आवश्यक कॅमेरा तपशिल खालीलप्रमाणे आहे

अ. क्र.	साहित्याचे नाव/ तपशिल	प्रमाण	प्रति नग अंदाजित रक्कम (सर्व करांसहीत)	एकुण अंदाजित रक्कम
1	डिजीटल कॅमेरा 20.3 Megapixel with CMOS Sensor, Built in WiFi/Bluetooth Technology	12	21,318/-	2,55,816/-

त्याअनुषंगाने प्रभाग समिती अंतर्गत अतिक्रमण विभागामार्फत अनधिकृत बांधकामांवर होणा-या कार्यवाही करीता विशेष नियोजन प्राधिकरन, अतिक्रमण व मुख्यालय PRO विभागाकरीता १ नग डिजीटल कॅमेरा खरेदी करण्यास अंदाजित रु.२१,३१८/-इतका खर्च अपेक्षित असून एकूण १२ नग कॅमेरा खरेदी करण्यास अंदाजित रक्कम रु. २,५५,८१६/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदर खर्च ०४१-४१७२-२ संगणकीय व्यवस्थापन केंद्र/संगणकीय अभिलेख कक्ष निर्मीती, व्हिडीओ कॉन्फरन्सींग व क्लोज सर्कीट कॅमेरे नियंत्रण कक्ष या लेखाशिर्षाका अंतर्गत भागवता येईल. तरी अतिक्रमण विभागामार्फत होणा-या कार्यवाहीसाठी लागणा-या कॅमेरा खरेदी करणेस व होणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेस्तव सादर.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिकेतील सर्व प्रभाग समिती अंतर्गत अतिक्रमण विभागाकरिता व इतर कामकाजासाठी प्रस्तावित केल्याप्रमाणे कॅमेरे खरेदी करणेकामी व होणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

(प्रदिप जांभळे पाटील)
उपायुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.- पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. २८४

विभाग:- माहिती तंत्रज्ञान

दिनांक:- २३/१२/२०२०

प्रस्तावाचा विषय:- वसई विरार शहर महापालिकेतील मुख्यालयातील सर्व विभागांचा महत्तवाचा डेटा संकलित /जतन (backup) करुन ठेवणेकामी Network attatched storage (NAS) स्टोरेज खरेदी करणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेत मुख्यालय येथे विविध विभागात दैनंदिन कामे संगणकामार्फत केली जातात उदा. घरपट्टी, पाणीपट्टी प्रणाली, दैनंदिन संगणकीय कामे व संकेतस्थळ इत्यादी वरील महत्वाची माहिती (डेटा) तसेच नगररचना विभागातील बांधकाम परवानगीच्या नस्ती /फाईल व कागदपत्रे डिजीटल स्कॅनींग मार्फत स्कॅन करुन संगणकात पी.डी.एफ (pdf file) स्वरुपात ठेवण्यात आलेला डेटा, तसेच बांधकाम विभाग, अग्निशमन विभाग, विधी विभाग व मुख्यालयातील विविध विभागातील दैनंदिन कामकाजाचा संगणकीकृत डेटा हा संगणकातील हार्ड डिस्क मध्ये जतन केला जातो. संगणकातील हार्ड डिस्क खराब/नादुरुस्त झाल्यास त्या हार्ड डिस्क मधील माहिती/डेटा नष्ट होतो. त्यामुळे महत्तवाची माहिती नष्ट/गहाळ (Hard Disk Corrupt) झाल्यास समस्या निर्माण होऊ शकते.

संगणकातील हार्ड डिस्क नादुरुस्त झाल्यास त्या हार्ड डिस्क मधिल डेटा /माहिती पुन्हा मिळविण्यासाठी अंदाजित २५,०००/ ते ३०,०००/- प्रती हार्ड डिस्क इतका खर्च येतो. तसेच हार्ड डिस्क वारंटी काळात नादुरुस्त झाल्यास कंपनीकडून नविन हार्ड डिस्क देण्यात येते परंतू नादुरुस्त झालेल्या हार्ड डिस्क मधिल डेटा/माहिती आपणांस मिळत नाही. तरी सर्व महत्तवाचा डेटा सर्वर वर एकाच ठिकाणी जतन करुन ठेवणे आवश्यक आहे. याकरीता Network Attached Storage (NAS) ची आवश्यकता आहे.

उपरोक्त प्रमाणे घरपट्टी, पाणीपट्टी प्रणाली, दैनंदिन संगणकीय कामे व संकेतस्थळ इत्यादी वरील महत्वाची माहिती (डेटा) तसेच मुख्यालयातील सर्व विभागांचा महत्त्वाचा डेटा (उदा. Pdf, excel, word, poowerpoint, kml, image etc.) या स्वरुपाचा आहे. सदरचा डेटा हा एकाच ठिकाणी संकलित/जतन करुन ठेवण्यासाठी खालील तपशिला प्रमाणे Network Attached storage (NAS) ची आवश्यकता आहे. सदर Network Attatched Server (NAS) चा तपशिल खालीलप्रमाणे आहेत.

अनु. क्र.	तपशिल	नग	दर प्रती नग (सर्व करांसहीत)	अंदाजित खर्च (सर्व करांसहीत)
१	Network Attached Storage Device	१	८९,०००/-	८९,०००/-
२	NAS Hard Disk ४ TB	१०	११,५००/-	१,१५,०००/-
			एकुण रक्कम	२,०४,०००/-

वरील प्रमाणे सर्वर खरेदी करणे कामी एकूण अंदाजित रक्कम रु. २,०४,०००/- इतका खर्च अपेक्षीत असुन सदर खर्च लेखासांकेतांक ०४१-४१७२-१ 'माहिती व तंत्रज्ञान विभाग संगणकीय साहीत्य खरेदी' या लेखाशिर्षा अंतर्गत भागवता येईल. तरी महापालिकेतील मुख्यालयातील विभागांचा महत्तवाचा डेटा संकलित /जतन करुन ठेवणेकामी सर्वर (NAS) खरेदी करण्यास व होणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेस मंजुरीस्तव सादर.

ठराव :- वसई विरार शहर महापालिकेतील मुख्यालयातील सर्व विभागांचा महत्तवाचा डेटा संकलित /जतन (backup) करुन ठेवणेकामी Network attatched storage (NAS) स्टोरेज खरेदी करणेकामी व होणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

(प्रदिप जोंभळे पाटील)
उपायुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.- पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. २९५

विभाग:- माहिती तंत्रज्ञान

दिनांक:- २३/१२/२०२०

प्रस्तावाचा विषय:- वसई विरार शहर महानगरपालिकेतील मुख्यालय व ९ प्रभाग समिती कार्यालयांमध्ये जन्म-मृत्यु विभाग व कार्यालयांतर्गत असलेल्या कलर प्रिंटर व झेरॉक्स मशीनचे टोनर खरेदी करणे बाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेतील मुख्यालय व ९ प्रभाग समिती कार्यालयांमध्ये जन्म-मृत्यु विभागा अंतर्गत जन्म-मृत्यु व विवाह नोंदणीचे प्रमाणपत्र नागरिकांना दिले जातात. परंतु सदर प्रमाणपत्र हे Black & White प्रिंट मध्ये देत असल्याने नागरिक कलर प्रिंट मिळणेबाबत तक्रार करत होते. तसेच जन्म-मृत्यु व विवाह नोंदणीचे प्रमाणपत्र हे महत्वाचे दस्ताएवज असल्याने सदर प्रमाणपत्र चांगल्या प्रतीचे व कलर प्रिंटर मध्ये असणे आवश्यक होते. याकारणास्तव सर्व जन्म-मृत्यु विभागामध्ये कलर प्रिंटर पुरविण्यात आले असून सदर कलर प्रिंटर सुरु ठेवणे करीता वेळोवेळी टोनर रिफिल करावे लागते तसेच वसई विरार शहर महानगरपालिकेमध्ये विविध कार्यायात महत्वाच्या दस्ताएवजांच्या प्रति मोठ्या प्रमाणात छायांकीत करणे आवश्यक असते व स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत दस्ताऐवजांच्या प्रती मोठया प्रमाणात झेरॉक्स कराव्या लागतात.तरी सदर कलर प्रिंटर करीता व झेरॉक्स मशीन करीता टोनर खरेदी करणे आवश्यक असून वर्षभरासाठी लागणा-या टोनरचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

अ. क्र	कलर प्रिंटरचे नाव	प्रभागाचे व विभागाचे नाव	रक्कम (प्रती नग)	नग	रक्कम (सर्व करांसहित)
१	HP Ink Jet ४१९ Cartridage	माहिती व तंत्रज्ञान विभाग	२१००/-	२	४,२००/-
२	HP Ink Jet ४१९ Ink Bottle		२६००/-	५	१३,०००/-
३	HP Desk Jet Advance २१३५ Cartridage (६८०) Bottle Ink	आयुक्त कार्यालय	४१००/-	५	२०,५००/-
४	HP Ink Tank Wireless ४१० Ink Bottle Set		२६००/-	१०	२६,०००/-
५	EPSON L३८० Ink Bottle Set	जन्म मृत्यू विभाग (सर्व प्रभाग)	३०००/-	४०	१,२०,०००/-
६	EPSON L३८० Ink Bottle (Black)	जन्म मृत्यू विभाग (सर्व प्रभाग)	६२०/-	२०	१२,४००/-
७	Cannon IR २००४N-NPG ५९ Toner	वैद्यकीय आरोग्य, महिला बालकल्याण विभाग	२९००/-	१०	२९,०००/-

८	Ricoh Aficio MP २०००L२	सहा.आयुक्त प्रभाग समिती सी	३०००/-	६	१८,०००/-
९	Xerox Workcenter ५०२०	नगरचना विभाग	४६००/-	३	१३,८००/-
१०	Samsung K२२००		५४१०/-	२	१०,८२०/-
			एकूण		२,६७,७२०/-

वरील प्रमाणे टोनर खरेदी करणे कामी अंदाजित रक्कम रु.२,६७,७२०/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च लेखा सांकेतांक क्र०४१-४१७२-१, संगणकीय साहित्य खरेदी या लेखाशिर्षा अंतर्गत भागवता येईल. तरी दरपत्रकाव्दारे टोनर खरेदीचे दर मंजूर करणेस व सदर कामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेस्तव सादर

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिकेतील मुख्यालय व ९ प्रभाग समिती कार्यालयांमध्ये जन्म-मृत्यु विभाग व इतर कार्यालयांतर्गत असलेल्या कलर प्रिंटर व झेरॉक्स मशीनचे टोनर खरेदी करणेकामी व होणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

(प्रदिप जांभळे पाटील)
उपायुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.- पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. २९६

विभाग:- माहिती तंत्रज्ञान

दिनांक:- २३/१२/२०२०

प्रस्तावाचा विषय:-स्वच्छ भारत अभियान व स्मार्ट सिटी अंतर्गत कामे करण्यासाठी लागणारे संगणक, प्रिंटर व इतर साहीत्य तातडीने खरेदी करणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेचा समावेश स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण व स्मार्ट सिटी अभियानात असल्याने संबंधीत आवश्यक कामे विहीत मुदतीत पर्ण होणे आवश्यक आहे व केलेल्या कामाचा अहवाल दर आठवडयात दिलेल्या उपक्रमानुसार राज्य शासनास पाठवावा लागतो. तसेच महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या MPCB पोर्टल वर दैनदिंन होणाऱ्या घनकचरेची माहिती दरोरज अद्यावत करावी लागते.

स्वच्छ भारत अभियांन अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण २०२० हगणदारी मुक्त शहर (ODF++), कचरा मुक्त शहर GFC ३ Star तसेच स्मार्ट सिटी अंतर्गत city Liveability Index, व Municipal Performance Index, यांचे स्वतंत्र सर्वेक्षण व मुल्याकंन दरवर्षी प्रमाणे या वर्षी हि होणार आहे. त्यासाठी लागणारे दस्ताऐवज विहीत मुदतीत पुर्ण करण्याकरीता ६ संगणक व ४ प्रिंटरची आवश्यकता आहे.

सदर कामासाठी लागणा-या संगणकीय साहीत्याचा तपशिल खालील प्रमाणे:

अनु.क्र	साहित्य	साहित्याचा तपशिल	प्रति नग अंदाजित खर्च	नग	एकुण खर्च
१	संगणक	All in one PC: 8th generation Core i3 Processor, 4GB DDR4 RAM, 1TB HDD, Windows 10 Pro, 19.5" LED Monitor, DVD-RW, built in Wi-Fi, Cabinet- Small form factor(7 to 13 liters), Antivirus- Quick heal/escan/Norton etc., 3 Years Onsite Warranty.	४१,०००/-	६	२,४६,०००/-

२	प्रिंटर	Printer: Laser Monochrome, Print speed- letter/A4 14ppm, Functionality – Single function (print only), print resolution- up to 600*600 DPI (1200 DPI effective output) , Duty cycle (monthly, A4)- 5000 pages, Internal memory- 2mb, paper tray capacity- 150 sheets, 3 Years Onsite Warranty.	१३,२००/-	३	३९,६००/-
३	युपीएस	600 watt, Single battery. Overload protection, automatic voltage regulation (AVR), 3 years onsite warranty.	१९००/-	६	११,४००/-
				एकुण GST सहीत	२,९७,०००/-

वरील सर्व नमुद कामे करण्याकरीता स्वच्छ भारत अभियांन कक्षाकरीता वरील नमुद तपशिलाप्रमाणे साहीत्य खरेदी करणेस अंदाजित रक्कम रु.२,९७,०००/- इतका खर्च अपेक्षित असून सदरचा खर्च लेखासांकेताक क्र ०४१-४१७२-१ संगणकीय साहीत्य खरेदी या लेखाशिर्षा अंतर्गत भागवता येईल. तरी स्वच्छ भारत अभियान व स्मार्ट सिटी अंतर्गत आवश्यक कामे विहीत मुदतीत पुर्ण करण्याकरीता आवश्यक साहीत्य दरपत्रके मागवून खरेदी करण्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेस्तव सादर.

ठराव :- स्वच्छ भारत अभियान व स्मार्ट सिटी अंतर्गत कामे करण्यासाठी लागणारे संगणक, प्रिंटर व इतर साहीत्य तातडीने खरेदी करणेकामी दरपत्रके मागवून एजन्सी निश्चित करणेस व होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

(प्रदिप जांभळे पाटील)
उपायुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई -विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स -०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. २८७ विभाग : बांधकाम

दिनांक : २४/१२/२०२०

प्रस्तावाचा विषय:- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती A,B,C,D,E,F,G,H,I मधील विविध ठिकाणी लोखंडी जाळीची झाकणे पुरविणे व बसविणेबाबत. (ठप्पा -२)

प्रस्तावाचा मजकूर :- सादर करण्यात येते की, वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात पावसाळ्या दरम्यान व या काळात भरतीची पातळी नेहमीच्या प्रमाणापेक्षा जादा असल्याने शहरातली खोलगट भागात तसेच रस्त्यावर पाणी साचून राहते. प्रभाग समिती A,B,C,D,E,F,G,H,I मधील विविध ठिकाणी रस्त्याच्या समपातळीत गटरे अथवा चेंबर कनेक्शन असून त्या ठिकाणी चेबंरवर बंदीस्त झाकणे अस्तीत्वात आहेत.

त्यामुळे पावसाळ्या दरम्यान सदर ठिकाणी पाण्याचा निचरा नैसर्गिकरित्या होऊ शकत नाही व शहरातील पाण्याची पातळी कमी होण्यास अडथळे निर्माण होतात तसेच शहरामध्ये सदर ठिकाणी वॉर्ड लॉगीग सातत्याने होत असते.

सदर ठिकाणी पाणी तुंबु नये व पाण्याचा निचरा सुरळीत होणे करीता सदर रस्त्याच्या समपातळीत गटरे अथवा चेंबर कनेक्शन असल्यास त्या चेंबरवरील बंदीस्त झाकणे बदलून त्या ठिकाणी लोखंडी जाळीची झाकणे बसविणे आवश्यक असल्याचे मा.आयुक्त सो. यांनी निर्देश दिले आहेत. यापुर्वी पावसाचे प्रमाण जादा असल्याबाबतची शक्यता व भरतीची पातळीची क्षमता कितपत असल्याबाबतचे नाकारता येणार नसल्यामुळे सदर ठिकाणी चेंबरवरील बंदीस्त झाकणे बदलून लोखंडी जाळीची झाकणे बसविणे गरजेचे आहे. त्यानुसार वसई विरार शहर महानगरपालिकेने प्रथम ठप्यात रक्कम रु. ७५,६२,४०१/- इतक्या

रक्कमेची लोखंडी झाकणे बसविण्यात आलेली असून सद्यस्थितीत सदरची झाकणे अपूर्ण पडत आहेत त्यामुळे वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती कार्यालयाकडून दितीय ष्ठ्यात खालील प्रमाणे मागणी प्राप्त झाली असुन व त्यांचे अंदाजपत्रक मुख्य कार्यालया मार्फत तयार करणेत आलेले आहे. सदर अंदाजपत्रकाची रक्कम खाली प्रमाणे आहे.

अ.क्र.	प्रभाग समिती	लोखंडी चेंबर कव्हरची साईज	संख्या (नग)	रक्कम (रुपये)
१	A TO I	१००० X १०००	५६ नग	रु. १५,५४,६५१/-
२		७५० X ७५०	१६५ नग	रु. २५,४१,४१७/-
३		६०० X ६००	८ नग	रु. ८९,१२९/-
			२२९ नग	रु.४१,८५,१९८/-
(+) १२% GST कर				रु.५,०२,२२३/-
(+) ०.५% Labour insurance				रु. २०,९२६/-
एकुण				रु. ४७,०८,३४८/-

याकरिता वर नमुद ठिकाणी दितीय ठ्यात विविध ठिकाणी लोखंडी जाळीची झाकणे बसविणे कामी सन २०१९-२०२० या वित्तीय वर्षाचे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्य दर सुचीनुसार कामाचे अंदाजपत्रके बनविणेत आली आहेत.

सदर कामाचा खर्च "गटरावर चेंबर व चेंबर व्यवस्था" या लेखाशिर्ष अंतर्गत भागविण्यात येणार आहे.

मुळ तरतुद :- रु. १५,००,००,०००/-

या पुर्वीचा खर्च :- रु. ७७,०४,०२३/-

प्रस्तावीत खर्च :- रु. ४७,०८,३४८/-

उपलब्ध शिल्लक :- रु. १३,७०,३७,७६५/-

नियंत्रण नोंदवही पृ.क्र. ९३ अ.क्र.०३ वर नोंद घेतली आहे

सबब उपरोक्त नमुद ठिकाणी तातडीने सार्व. बांधकाम विभागामार्फत वॉर्ड लॉगीग होत असलेल्या ठिकाणी समपातळीत गटरे अथवा चेंबर कनेक्शन असल्यास त्या चेंबरवरील बंदीस्त झाकणे बदलून त्या

ठिकाणी लोखंडी जाळीची झाकणे बसविणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६७ (३) (क) अन्वये मा.आयुक्तांचे अधिकार व कर्तव्य नुसार राज्य दरसुची प्रमाणे तयार केलेल्या अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणे करीता आपल्या मंजूरीस्तव शिफारस असे.

ठराव:-

वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती A,B,C,D,E,F,G,H,I मधील विविध ठिकाणी लोखंडी जाळीची झाकणे पुरविणे व बसविणे कामी द्वितीय ठप्यात होणाऱ्या एकुण रक्कम रु. ४७,०८,३४८ /- इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६७(३)(क) अन्वये मा. आयुक्त ह्यांचे अधिकार व कर्तव्य नुसार प्रशासकीय व वित्तीय मान्यता देऊन ई-निविदा कार्यप्रणालीव्दारे निविदा दर मागविणे कामी मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. २९८ विभाग :- पाणी पुरवठा
दिनांक :- २४ / ९२/ २०२०

प्रस्तावाचा विषय :- केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान अंतर्गत वसई - विरार शहर महानगरपालिकेसाठी अतिरिक्त वितरण व्यवस्था योजना.

मंजूर निविदेतील १० टाक्यांच्या कामाची व्याप्ती कमी करुन तयार केलेल्या सुधारीत अंदाजपत्रकीय खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :-

केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान अंतर्गत वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील अतीरीक्त पाणी पुरवठा वितरण व्यवस्था योजनेस शासन निर्णय पत्र अमृत-२०१६ /प्र.क्र.१४५(५)/नवि/३३ दि.२३/०६/२०१६ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली. योजनेची मंजूर किंमत रू.१३५.५८/- कोटी असून योजनेस मुख्य अभियंता यांच्या कार्यालयाचे पत्र क्र. म.जी.प्रा. मु. अ. (ठाणे) / वसई विरार /तांशा-१/७१०, दि.२७/४/२०१६ अन्वये तांत्रिक मान्यता देण्यात आली. शासन निर्णय क्र. अमृत - २०१६/प्र.क्र.१४५(५) /नवि-३३ दि.१९/०४/२०१७ अन्वये सुधारीत अंदाजपत्रक रु.१३९.३७ कोटीस सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. महानगरपालिकेमार्फत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची पी.एम.सी म्हणून नेमणूक केलेली आहे. योजनेचा वित्तीय आकृतीबंध खालील प्रमाणे असून योजनेवर उपलब्ध निधी व झालेला खर्च खालील प्रमाणे आहे.

भाग	टक्के	किंमत	प्राप्तनिधी	शिल्लक	झालेला खर्च
केंद्र शासन	३३.३३ %	४६.४५	३७.१६	९.२९	२९.७०
राज्य शासन	१६.६७ %	२३.२३	१८.५८	४.६६	१४.८५
महानगरपालिका	५०.०० %	६९.६९	५५.७४	१३.९५	४४.५५
	१००.०० %	१३९.३७	१११.४८	२७.९०	८९.११

योजनेच्या रु. ६९.९९ कोटी रक्कमेच्या कामाचा मे. आर.ए.घुले, पालघर यांचा ०.०५% कमी दराच्या निविदेस मा. स्थायी समिती दि.१४ /०९/२०१६ ठराव क्र. १४९ अन्वये मंजूरी देण्यात आली असून मा. राज्य स्तरीय तांत्रिक समितीने दि.२९/०९/२०१६ मान्यता दिली आहे. मंजूर निविदेची किंमत रू.६९,९५,४५,२६०.४० इतकी आहे. कामासंबंधी कार्यादेश मे. आर. ए. घुले, पालघर यांना दि. १.१०.२०१६ रोजी देण्यात आले आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून योजनेचे पाईप पुरविण्यात येत असून पाईपांची संपुर्ण रक्कम रु. ६५ कोटी उपलब्ध करून दिली आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून पाईप पुरवठा सुरू झाला आहे. सदर योजनेची कामे विहीत वेळेत पुर्ण करणेसाठी महानगरपालिका नेहमीच कामांतील अडचणी सोडवुन प्रगती वाढविणे बाबत प्रयत्न करीत असते.

योजनेतील १८ जलकुंभापैकी कामे सुरू न केलेल्या जलकुंभाबाबत तपशील खालील प्रमाणे.

Name of ESR	Capacity in ML	Cost as per Tender (MJP DSR 2015/16)	as per Tech. changes Staging Height	Cost as per Tech Changes	Cost give MJP DSR Year 19-20	Remark
1. Divekar	2.00	1,96,63,699.00	12.60	1,83,50,587.00	2,16,43,964.00	पायलींगचे काम झाले आहे. GST मूळे ठेकेदार काम करीत नाही.
2. Jangad	2.00	2,08,87,873.00	16.00	1,92,33,839.00	2,26,77,904.00	GL कॉलमवर २.४ मी. पर्यंत काम झाले . GST मूळे ठेकेदार काम करीत नाही.
3.Yazoo Park	2.00	1,96,63,699.00	12.00	1,85,69,933.00	2,19,02,848.00	६४ पैकी ११ पायलींगचे काम झाले. GST मूळे ठेकेदार काम करीत नाही.
4. Gokul Complex	1.50	1,60,41,463.00	14.10	1,58,30,093.00	1,86,79,703.00	पायलींगचे काम झाले आहे. GST मूळे ठेकेदार काम करीत नाही.
5. Kargil Nagar	2.00	1,75,36,199.00	13.00	1,51,25,016.00	17831,119.00	जागे अभावी काम सुरू केले नाही.
6. Evershine	1.50	1,18,76,754.00	10.00	1,38,63,145.00	1,56,31,071.00	
7.Waliv industrial area	1.50	1,27,21,914.00	11.00	1,18,86,719.00	1,40,36,580.00	GST मूळे ठेकेदार काम करीत नाही.
8.Dattani	1.50	1,59,92,804.00	14.00	1,54,62,076.00	1,83,94,473.00	GST मूळे ठेकेदार काम करीत नाही.
9.Yashwant gaurav (shreeprastha)	2.00	1,96,75,945.00	15.00	2,04,14,382.00	2,40,72,057.00	पायलींगचे काम झाले आहे. GST मूळे ठेकेदार काम करीत नाही.
10. Viva collage	2.00	2,13,54,621.00	17.00	2,02,80,220.00	2,39,22,207.00	पायलींगचे काम झाले आहे. GST मूळे ठेकेदार काम करीत नाही.
		17,54,14,971.00		**16,90,16,010.00**	**19,87,91,926.00**	

फरक **2,97,75,916.00**

महानगरपालिकेमार्फत वितरण व्यवस्थेच्या २३ विभागात २०० कि.मी. पेक्षा जास्त लांबीचे जलवाहिन्यांचे तर ४० कि.मी. पेक्षा जास्त लांबीचे मुख्य जलवाहिन्यांचे लाईन आऊट देण्यांत आलेले आहे. वसई महानगरपालिका क्षेत्रात योजनेअंतर्गत २१ जलकुंभ बांधण्याच्या कामाचा समावेश होता. जागे अभावी ३ जलकुंभ वगळण्यात

आले आहेत. सदर योजने अंतर्गत १६ जलकुंभाच्या जागा ठेकेदारास हस्तांतरण करण्यांत आलेल्या आहेत. त्यापैकी १४ ठिकाणी कामे ठेकेदारा मार्फत सुरु करण्यात आली होती. कामाची प्रगती असमाधानकारक असून वेळोवेळी घेण्यात आलेल्या आढाव्यात सदर कामाची प्रगती वाढविणे बाबत लेखी/तोंडी सुचना दिलेल्या आहेत तसेच निविदेतील अटीनुसार दंडात्मक कार्यवाही करण्यांत येईल असे सुचित केले आहे.

माहे मार्च २०२१ अखेर पर्यंत ठेकेदारामार्फत ८ टाक्यांची व जलवाहिन्या अंथरण्याची कामे पुर्ण करून घेण्यात येतील. परंतू वरील उर्वरीत १० टाक्यांपैकी २ टाक्यांच्या जागेंचे हस्तांतरणाचे प्रस्ताव जिल्हाधिकारी पालघर यांच्याकडे सादर करण्यात आले असून ८ टाक्यांची कामे पुर्ण करण्यास ठेकेदार तयार नाही. दि.२१/०१/२०१९ च्या पत्रानुसार योजनेची कामे निविदेतील अट क्र. १५ नुसार काढून घेण्याची मागणी ठेकेदाराने केलेली आहे.

सदर योजनेची मुदतवाढ सप्टेंबर २०१८ अखेर संपृष्ठात आलेली असून बाजार भावात झालेली वाढ लक्षात घेता सप्टेंबर २०१९ नंतरच्या कालावधीसाठी ठेकेदारामार्फत भाव वाढीच्या फरकाच्या रक्कमेची मागणी करण्यात आलेली आहे.

१. शासनामार्फत जूलै २०१७ पासुन GST लागू करण्यात आलेला असून त्या पोटी ठेकेदारास मोठा बोझा सहन करावा लागत असून आर्थीक अडचणीना सामोरे जावे लागते असे कळविले आहे.
२. सदर निविदेत भाववाढीची अट समाविष्ट नाही तसेच निविदेत / योजनेत GST ची तरतुद नसल्याने ठेकेदाराची आर्थिक कोंडी होत असल्याचे कळविले आहे व काम काढुन घेण्याची मागणी केलेली आहे.

सदर जलकुंभाच्या कामाची स्थितीबघता काही कामे फाऊन्डेशन स्तरावर तर काही कामे स्टेजींगच्या स्तरावर असल्याने ठेकेदाराकडूनच उर्वरीत कामे पुर्ण करण्यासाठी जास्तीचे मनुष्यबळ व मशीनरी लावणे गरजेचे आहे. अशा परिस्थितीत कलम १५ अंतर्गत काम काढुन घेण्याची ठेकेदाराची भुमीका आहे. त्यामुळे १८ टाक्यांपैकी ८ टाक्यांची व जलवाहिन्या अंथरण्याची कामे सदर ठेकेदारामार्फत पुर्ण करून घेऊन उर्वरीत १० टाक्यांसाठी स्वतंत्र निविदा कार्यवाही करून कामे पुर्ण करून घेतल्यास नागरीकांना सदर योजनेतून लवकरात लवकर लाभ होणार असल्याने सदर ठेकेदाराच्या निविदेतून वरील १० टाक्यांच्या कामांची व्याप्ती कमी करून सदर १० टाक्यांसाठी सुधारीत अंदाजपत्रक तयार करून स्वतंत्र निविदा मागविणे व कालबध्द कार्यक्रम आखुन सदर १० टाक्यांची कामे पुर्ण करून घेण्याचे मा.आयुक्त तथा प्रशासक यांनी दि.०८/१२/२०२० च्या आढावा बैठकीत निर्देश दिले होते. परंतू मे.आर.ए.घुले यांच्या निविदेस राज्य स्तरीय तांत्रिक समितीने मान्यता देताना निविदेबाबत मा.आयुक्त यांनी या योजनेचे प्रकल्प नियोजन सल्लागार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सल्ल्याने निविदेतील अटी-शर्तीनुसार निर्णय घेण्याचे निर्देश दिल्याचे दि.२१/०९/२०१६ च्या पत्राने कक्ष अधिकारी, नगरविकास विभाग यांनी कळविले आहे. त्यानुसार कार्यकारी अभियंता म.जी.प्रा. विरार यांना याबाबत अभिप्राय देण्याबाबत दि.१४/१२/२०२० च्या पत्राने कळविले असता त्यांनी त्यांचे जा.क्र.मजीप्राजव्यविभाग/विरार/तांशा/८९३

दि.१७/१२/२०२० अन्वये वरील १० जलकुंभांची कामे पुर्ण करण्याकरीता ठेकेदार असमर्थता दर्शवित असल्याने कलम ३ (क) अन्वये निविदेतील शिल्लक कामे स्वतंत्र निविदा प्रसिध्द करून अन्य ठेकेदाराकडून पुर्ण करून घेण्याचे गरजेचे असल्याचे अभिप्राय नोंदविले आहेत.

सदर १० जलकुंभांसाठी येणारा अंदाजपत्रकीय खर्च रू.१९,८७,९१,९२६/- इतका असून सदर खर्च सन २०२०-२१ व २०२१-२२ च्या अर्थसंकल्पातील अमृत पाणी पुरवठा योजना व इतर या लेखाशिर्षांतर्गत भागविणे शक्य असून शासन अनुदानासह महापालिका स्व:हिस्सा असा एकूण रू.११२.५९ कोटी (सौर उर्जा प्रकल्प निधी सह) निधी प्राप्त असून त्यातून रू.९०.९४ कोटी इतका खर्च झाला आहे व रू.२१.६४ शिल्लक आहे. सदर योजनेअंतर्गत शेवटच्या टप्प्यातील शासन अनुदान मार्च २०२१ अखेर येणे अपेक्षित आहे. त्यामुळे शासन अनुदानासह मनपा स्व:हिश्याच्या मर्यादेतच सदर खर्च होणे अपेक्षित आहे.

केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील अतिरीक्त पाणी पुरवठा वितरण व्यवस्था योजनेमध्ये समाविष्ठ असलेल्या १८ टाक्यांपैकी वरील प्रस्तावात नमुद १० टाक्यांची कामे योजनेचे मंजूर ठेकेदार पुर्ण करण्यास असमर्थता दर्शवित असल्याने सदर १० टाक्यांची व्याप्ती निविदेत कमी करून सदर १० टाक्यांची कामे करण्यासाठी सन २०१९-२० च्या मजीप्राच्या दरसूचीवर आधारीत तयार केलेल्या सुधारीत अंदाजपत्रकांनुसार येणाऱ्या खर्च रू.१९,८७,९१,९२६/- ला महापालिकेची आर्थिक व प्रशासकीय मान्यतेसह सदर योजनेच्या मंजूर वित्तीय आकृतीबंधानूसार शासनाच्या अनुदानासह महापालिकेचा स्व:हिस्सा व सुधारीत अंदाजपत्रकानुसार होणारा वाढीव खर्च महापालिका स्व:निधीतून करण्यास प्रस्ताव निर्णयास्तव मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्या पुढे सविनय सादर.

ठराव :- १) मा. सर्वसाधारण सभा दि.२०/०१/२०१६ ठ.क्र.१६ अन्वये केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान अंतर्गत सहभाग घेण्यास मान्यता प्राप्त असून त्याअंतर्गत सादर केलेल्या पाणी पुरवठा प्रकल्प किंमत रू.१३९.३७ कोटी खर्चास शासनाने दि.१९/०४/२०१७ अन्वये प्रशासकीय मान्यता दिली असून निविदेस राज्य स्तरीय तांत्रिक समितीने मान्यता देताना निविदेबाबत मा.आयुक्त यांनी या योजनेचे प्रकल्प नियोजन सल्लागार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सल्ल्याने निविदेतील अटी-शर्तीनुसार निर्णय घेण्याचे निर्देश दिले असल्याचे कक्ष अधिकारी, नगरविकास विभाग यांनी दि.२१/०९/२०१६ च्या पत्राने कळविले आहे.

दि. २३/०६/२०१६ च्या शासनाच्या प्रशासकीय मान्यता आदेशातील ४.१३ नुसार प्रकल्प मंजूर झाल्यानंतर मुळ प्रकल्प किमंतीमध्ये कोणत्याही कारणास्तव वाढ झाल्यास त्यांची सपुर्ण जबाबदारी संबंधीत कार्यान्वयन यंत्रणा म्हणजे महापालिकेची असुन शासना मार्फत त्यासाठी कोणतेही अनुदान उपलब्ध होणार नाही. तसेच ४.१४ नुसार सदर प्रकल्पाची कामे विहित कालावधीत पुर्ण करण्याची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत कार्यान्वयन यंत्रणा म्हणजेच महापालिकेची आहे.

२) सदर योजनेच्या कामाच्या प्रगतीच्या अनुषंगाने वारंवार बैठका घेवुन ठेकेदार मे. आर. ए.घुले, पालघर यांना कामाची गती वाढविण्याबाबत वेळोवळी निर्देश दिले असूनही

ठेकेदार निविदेतील १८ टाक्यांपैकी ८ टाक्यांची कामे व निविदेत अंर्तभूत जलवाहिन्या अंथरण्याची सर्व कामे माहे मार्च २०२१ अखेर पुर्ण करुन देत असल्याचे बैठकीत सांगितले असून उर्वरीत १० टाक्यांची कामे आर्थिक अडचण व जी.एस.टी च्या बोझामुळे करण्यास अमसर्थता दर्शवित असल्याचे त्यांनी यापुर्वीच दि.२१/०१/२०१९ च्या पत्राने महापालिकेस व सल्लागार म.जी.प्रा. यांना कळविले आहे.

३) ठेकेदार मे. आर. ए.घुले, पालघर हे निविदेतील १८ टाक्यांपैकी १० टाक्यांची कामे आर्थिक अडचण व जी.एस.टी च्या बोझामुळे करण्यास असर्थता दर्शवित असल्याने व सदर टाक्या शहराच्या पाणी पुरवठयाच्या दृष्टीने लवकरात लवकर पुर्ण करुन घेणे गरजेचे असल्याने मे. आर. ए.घुले, पालघर यांच्या मंजूर निविदेतील १० टाक्यांच्या कामाची व्याप्ती कमी करुन सदर १० टाक्यांच्या कामांसाठी सुधारीत अंदाजपत्रक तयार करुन स्वतंत्र निविदा कार्यवाही करण्याबाबत दि.०८/१२/२०२० च्या आढावा बैठकीत निर्देश दिले होते. त्यानुसार विभागाने म.जी.प्रा चा अभिप्राय घेऊन वरिल प्रस्तावात नमुद १० टाक्यांच्या कामांचे रु.१९,८७,९१,९२६/- चे सुधारीत अंदाजपत्रक तयार करुन मान्यतेसाठी सादर केले आहे.

४) शहराच्या पाणी पुरवठयाच्या दृष्टीने व शासन निर्णयातील निर्देशानुसार मंजूर योजनेतील सर्व टाक्यांची कामे पुर्ण होणे आवश्यक आहे. १८ पैकी १० टाक्यांची कामे ठेकेदार आर्थिक अडचण व GST च्या बोझामुळे करण्यास असर्थता दर्शवित आहे. त्यामुळे योजना मुळ विहीत कालावधीत पुर्ण झालेली नाही. सदर मंजूर निविदेत भाववाढीची अट समाविष्ट नाही तसेच निविदेत / योजनेत GST ची तरतुद नाही. त्यामुळे सदर मंजूर निविदेतून १० टाक्यांच्या कामाची व्याप्ती कमी करण्यास व सदर १० टाक्यांची कामे स्वतंत्र निविदा मागवून पुर्ण करुन घेण्यासाठी तयार करण्यात आलेल्या रु.१९,८७,९१,९२६/- च्या सुधारीत अंदाजपत्रकास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

५) सदर १० टाक्यांच्या कामांसाठी येणाऱ्या वाढिव खर्चाचे दाईत्व शासन निर्देशानुसार महापालिकेचे असल्याने सदर वाढिव खर्च महापालिका निधीतून करण्यास मान्यता देण्यात येत असून या योजनेच्या "एकूण खर्च रु. १४२.३५ कोटी खर्चास" सुधारीत आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

६) ठेकेदार मे.आर.ए.घुले यांना मंजूर निविदा मधील १० टाक्यांच्या कामाची व्याप्ती कमी करण्यात येत असल्याचे कळवून त्यांच्याकडून तसे हमीपत्र घेण्यात यावे तसेच सदरची करण्यात येणारी कार्यवाही सल्लागार म.जी.प्रा व शासनास माहितीस्तव पाठविण्यास व सदर कामी पुढील निविदा कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

७) शासन निर्णयान्वये PMC म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची "अमृत पाणी पुरवठा योजनेसाठी" नियूक्ती करण्यात आली असून सर्वसाधारण सभा दि.२०/०१/२०१६ ठ.क्र.१६ अन्वये नेमणूकीस मान्यता प्राप्त आहे.त्यानुसार सदर मंजूर योजनेतील वरील १० टाक्यांच्या कामासाठी व त्यानुसर येणा-या सेवा शुल्कच्या खर्चासही मान्यता देण्यात येत आहे.

(गंगाथरन डी.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि- पालघर, पिन नं.-४०१ ३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फक्स -०२५०-२५२५१०७
ई-मेल - vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. :- २९९

विभाग :- वाहन

दिनांक :-२४/१२/२०२०

विषय :- महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागासाठी १० नग कॉम्पॅक्टर वाहन खरेदी करणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागासाठी १० नग कॉम्पॅक्टर वाहन खरेदी करणेकामी मा. प्रशासकीय ठराव क्र. १६२ दिनांक १३/१०/२०२० अन्वये मंजूरी प्राप्त झालेली आहे. प्राप्त मंजूरीन्वये दि. १५/१०/२०२० रोजीच्या दै. जागरुक टाईम्स, दै. फ्रि प्रेस जर्नल, दै. खबरे आजतक, दै. आपला महानगर, दै. प्रहार , दै. इकोनॉमिक टाईम्स व दै. लोकसत्ता या वृत्तपत्रांमध्ये जाहिर ई-निविदा सुचना प्रसिध्द करुन इच्छूक निविदाकारांकडून ई-निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. दिलेल्या मुदतीत एकूण ०३ ई- निविदा प्राप्त झाल्या.त्याचा तांत्रिक बाबींचा लिफाफाक्र. १ दि. १२/११२०२० रोजी उघडण्यात आला. लिफाफा क्र. १ मधील कागदपत्रांची पडताळणी करणेकामी मा.निविदा समिती समोर ठेवणेत आली. प्राप्त ई-निविदांमधील ०२ ई-निविदाकारांची कागदपत्र योग्य असल्याने ०२ ई-निविदा पात्र ठरवून त्यांचा आर्थिक बाबींचा लिफाफा क्र. २ उघडणेस मा.निविदा समितीने दि. १५/१२/२०२० रोजी मंजूरी दिली. प्राप्त मंजूरीन्वये दि. १५/१२/२०२० ई-निविदेचा आर्थिक बाबींचा लिफाफा क्र. २ उघडण्यात आला. त्यातील दराचा तपशील खालीलप्रमाणे :-

अ.क्र	ई-निविदाकाराचे नांव दर	वाहनाचा तपशील व दर (सर्व करांसहीत)	
		कॉम्पेक्टर वाहन (दर - प्रती नग)	कॉम्पेक्टर वाहन (दर - १० नग)
१	मे. टाटा मोटर्स	३३५०००० /-	३३५००००० /-
३	मे. अॅन्थोनि कमर्शियल व्हेहीकल प्रा.लि.	**३२४९९९९/-**	**३२४९९९९०/-**

उपरोक्त तक्त्यात नमुद केलेल्या दरामध्ये मे. अॅन्थोनि कमर्शियल व्हेहीकल प्रा.लि. यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या कमी आहेत. करिता मा. अति.आयुक्त महोदय यांचे सुचनेनुसार दि. २१/१२/२०२० रोजी प्राप्त कमी दराचे ई-निविदाकार मे. अॅन्थोनि कमर्शियल व्हेहीकल यांना वाटाघाटी करणेकामी मा. अति.आयुक्त महोदय यांचे दालनात बोलविण्यात आलेले होते. वाटाघाटीअंती मे. अॅन्थोनि कमर्शियल व्हेहीकल प्रा.लि. यांनी सादर केलेल्या दरातच काम करण्यास सहमती दर्शविली. तरी वाटाघाटीअंती प्राप्त झालेले दर खालीलप्रमाणे :-

अ.क्र	वाहनाचा तपशील	ई-निविदाकाराचे नांव व दर (सर्व करांसहीत)	
		मे. ॲन्थोनि कमर्शियल व्हेहीकल प्रा.लि.	मे. ॲन्थोनि कमर्शियल व्हेहीकल प्रा.लि. यांचे वाटाघाटीअंती कमी केलेले दर
१	कॉम्पेक्टर वाहन	३२४९९९९/- (दर - प्रती नग)	३२४९९९९/- (दर - प्रती नग)
		३२४९९९९०/- (दर - १० नग)	३२४९९९९०/- (दर - १० नग)

वरीलप्रमाणे मे. अँन्थोनि कमर्शियल व्हेहीकल यांनी वाटाघाटीअंती दर सादर केलेले आहेत. मे. अँन्थोनि कमर्शियल व्हेहीकल यांचे कमी दरास व त्यांचे समवेत संविदा करणेस मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे मंजूरीस्तव सविनय सादर.

ठराव :- सदर विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली. वसई- विरार शहर महानगरपालिकेच्या **घनकचरा व्यवस्थापन विभागासाठी १० नग कॉम्पेक्टर खरेदी** करणेसाठी ई-निविदा मागविण्यात आलेल्या असुन ०२ ई-निविदाधारकांनी भागही घेतलेला आहे. त्यापैकी मे. ॲन्थोनि कमर्शियल व्हेहीकल प्रा.लि. यांनी वाटाघाटीअंती सादर केलेल्या दरास प्रशासकीय व वित्तीय मान्यता तसेच त्यांचेसमवेत संविदा करणेस मान्यता देत आहे.

आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई – विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. 401 305
दुरध्वनी – 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकिय ठराव क्र. ३००

विभाग :- विदयुत विभाग
दिनांक :-२४/१२/2020

प्रस्तावाचा विषय :- प्रभाग समिती (सी) विरार (पु) वैतरणा –फणसपाडा बहुद्देशीय इमारत सुरक्षिततेच्या दृष्टीने कंट्रोल पॅनल बसविणे, केबलिंग व्यवस्था व त्या अनुषंगिक विद्युतीय कामे करणे कामास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत

प्रस्तावाचा मजकुर :-

१) अंदाजपत्रकीय रक्कम :- रु.२,१२,२२१/-(सन २०१९-२० चे जिल्हा दरसुची नुसार)

२) कामाची आवश्यकता :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (सी) विरार (पु) मधील वैतरणा– फणसपाडा बहुद्देशीय इमारत मध्ये कोरोना विषाणु (कोव्हिड-१९) संसर्गिक रुग्णांच्या प्रथमोपचासाठी कोरोना केअर सेंटर सुरु करण्यात आले आहे सदर इमारतीमध्ये सुरक्षिततेच्या दृष्टीने विद्युत केट्रोल पॅनल बसविणे, केबलिंग व्यवस्था व त्या अनुषंगिक विद्युतीय कामे करणे आवश्यक आहे.

३) जागेची मालकी :- महानगरपालिका इमारत, विरार (पु)

४) कामाचे स्वरुप :- जी.आय.शिट-१८ स्के.मी, आर्यन शिट गेटल वर्क -१९५ कि.ग्रॅ, लॉक-११ नग, कॉपर वायर २x२.५ sq.mm-४५ मी, कॉपर वायर २x४ sq.mm-४५ मी,कॉपर वायर २x१० sq.mm-६० मी LED टाईप पायलेट लॅम्प -९ नग, न्युटरल लिंक -२० नग, बसबार -२० नग, बस पट्टी ॲन्ड बार- ४५ कि.ग्रॅ, चेंज ओव्हर स्विच-१ नग, ३ पोल MCCB- ३ नग, FBMCB -३ नग, DPMCB - ३ नग, SPMCB- २ नग, रोट्री हॅन्डल -२० नग, टर्मिनल स्प्रेडर्स-१ सेट ,ॲल्युमिनिअम स्ट्रीप -२० कि.ग्रॅ, अर्थिंग -२ नग.

५) लेखाशिर्षक :- इतर दिवाबत्ती व्यवस्था

उपरोक्त नमुद प्रभाग समिती सी विरार (पु) मधील वैतरणा –फणसपाडा बहुद्देशीय इमारतमध्ये सुरक्षिततेच्या दृष्टीन कंट्रोल पॅनेल बसविणे, केबलिंग व्यवस्था व त्याअनुषंगिक विद्युतीय कामे करणे करिता कामाच्या होणाऱ्या रक्कम रु. २,१२,२२१/- अदांजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळावी.

प्रस्तावाचा ठराव :- सबब उपरोक्त नमुद प्रभाग समिती सी विरार (पु) मधील वैतरणा – फणसपाडा बहुद्देशीय इमारतमध्ये सुरक्षिततेच्या दृष्टीन कंट्रोल पॅनेल बसविणे, केबलिंग व्यवस्था व त्याअनुषंगिक विद्युतीय कामे करणेकरिता महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४९ व ६८ (१), ६९(१) व(२) मा.आयुक्तांचे आदेशान्वये मला प्रदान केलेल्या अधिकारानुसार सदर कामास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

(आशिष पाटील)
अति. आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई – विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. 401 305
दुरध्वनी – 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकिय ठराव क्र. ३०१

विभाग :- विदयुत विभाग
दिनांक :-२३/१२/2020

प्रस्तावाचा विषय :- प्रभाग समिती (सी) विरार (पू) मधील दूधदर्या समाजमंदिर मध्ये सुरक्षिततेच्या दृष्टीने कंट्रोल पॅनल बसविणे, केबलिंग व्यवस्था व त्या अनुषंगिक विद्युतीय कामे करणे कामास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत

प्रस्तावाचा मजकुर :-

१) अंदाजपत्रकीय रक्कम :- रु. १, ८९,८८० (सन २०१९-२० चे जिल्हा दरसुची नुसार)

२) कामाची आवश्यकता :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (सी) विरार (पू) मधील दूधदर्या समाजमंदिर मध्ये कोरोना विषाणु (कोविड -१९) संसर्गिक रुग्णांच्या प्रथमोपचारासाठी कोरोना केअर सेंटर सुरु करण्यात आले आहे. सदर इमारतीमध्ये सुरक्षिततेच्या दृष्टीने विदयुत केट्रोल पॅनल बसविणे, केबलिंग व्यवस्था व त्याअनुषंगिक विद्युतीय कामे करणे आवश्यकता आहे.

३) जागेची मालकी :- महानगरपालिका इमारत, विरार (पु)

४) कामाचे स्वरुप :- जी.आय.शिट-१५ स्के.मी, आर्यन शिट मेटल वर्क-१७० कि.ग्रॅ., लॉक-११ नग, कॉपर वायर २ x २.५ sq.mm-४० मी, कॉपर वायर २ x ४ sq.mm -४० मी, कॉपर वायर २ x १० sq.mm-५० मी, LED टाईप पायलेट लॅम्प-९ नग, न्युटरल लिंक-२० नग,बसबार-२० नग, बस पट्टी ॲण्ड बार -४० कि.ग्रॅ, चेंज ओव्हर स्विच-१ नग, ३ पोल MCCB- ३ नग, FPMCB-३ नग, DPMCB-३ नग, SPMCB-२ नग, रोट्री हॅन्डल - ४ नग, टर्मिनल स्प्रेडर्स- १ सेट, ॲल्युमिनिअम स्ट्रीप - १५ कि.ग्रॅ, अर्थिंग -२ नग

५) लेखाशिर्षक :- इतर दिवाबत्ती व्यवस्था

उपरोक्त नमुद प्रभाग समिती सी विरार (पु) मधील दुधदर्या समाजमंदिर मध्ये सुरक्षिततेच्या दृष्टीने कंट्रोल पॅनेल बसविणे, केबलिंग व्यवस्था व त्याअनुषंगिक विद्युतीय कामे करणे करिता कामाच्या होणाऱ्या रक्कम रु.१,८९,८८० /- अदांजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळावी.

प्रस्तावाचा ठराव :- सबब उपरोक्त नमुद प्रभाग समिती सी विरार (पु) मधील दुधदर्या समाजमंदिर मध्ये सुरक्षिततेच्या दृष्टीन कंट्रोल पॅनेल बसविणे, केबलिंग व्यवस्था व त्याअनुषंगिक विद्युतीय कामे करणेकरिता महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४९ व ६८ (१), ६९(१) व(२) मा.आयुक्तांचे आदेशान्वये मला प्रदान केलेल्या अधिकारानुसार सदर कामास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

(आशिष पाटील)
अति-आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका